

# माणूस

आमशी देवस्थानच्या जमिनीत
यांच्या नांगराचे फाळ जेव्हा घुसतील तेव्हाच
त्यांच्या चेहेऱ्यावर खरे हास्य फुटेल (पृष्ठ ११

१० जून ७२ । ५० पैसे



माणस
शनिवार
१० जून १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : दोन

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.
दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

३ जून १९७२

सप्रेम नमस्कार....

☐ मुद्दाम पत्र लिहिण्याचे कारण की, गेले जवळ जवळ १ महिन्यानंतर आजच्या 'माणूस' अंकात श्री. रवींद्र पिंगे यांचा लेख वाचावयास मिळाला. फारच चटकदार व चुरचुरीत. त्याचप्रमाणे फिडेल कॅस्ट्रो-वरील श्री. अरुण साधु यांची नवीन लेखमाला रंगणार यात संशय नाही. श्री. विजय वैद्य व देविदास बागूल यांची गैरहजेरी का ?

य. दा. गोठिवरेकर, पणे

मुखपृष्ठ

१. वादाला कारण झालेली आमशी देवस्थानची आठ एकराची जमीन.
२. आमशीची हरिजन मंडळी बापूसाहेब पाटील यांच्याशी चर्चा करताना.

# मुंबई वार्ता

## पायपीट सुरू झाली....

**प्रतिनिधी**

एखादा प्रश्न वा गाऱ्हाणे असे काही अनेक वर्षे रेंगाळून पडलेले असते ,की त्याला वाचाच फोडली जात नाही. त्याच्याशी संबधीत असलेली माणसे मग त्यात भरडून निघतात. अगदी उसाच्या चिपाटाप्रमाणे त्यांची अवस्था होते. मग कोणी-तरी पुढारीपण घेऊन ते प्रकरण वेशीवर टांगायचा प्रयत्न करताच संबंधीतांची सारी शक्ती त्या व्यक्तीमागे उभी रहाते.

अशीच काही लोकांची गाऱ्हाणी होती. वर्षोनुवर्षे ती अस्तित्वात होती. त्यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. त्या लोकांची संघटना बांधण्याचा विचार कोणी केला नाही. मग एक दिवस एक कॉलेज विद्यार्थी सरसावला. जगन्नाथ त्याचे नाव. जगन्नाथ उभा रहाताच रथाला हात लावण्यासाठी असंख्य छोटे मोठे हात पुढे आले आणि मग वृत्तपत्रसृष्टीच्या ' फोर्थ एस्टेट 'ला एक प्रचंड हादरा बसला. एवढे जबरदस्त साम्राज्य हालवून सोडायचे म्हणजे काय साधी-सुधी गोष्ट नव्हे. पण जगन्नाथ कोठेकर या तरुणाने व श्री. ज. र. सहस्त्रबुद्धे या जगन्नाथाच्या वडिलकीच्या पिढीतील गृहस्थाने ही किमया केली. अर्थातच सकाळच्या प्रहरी वृत्तपत्र वाटणाऱ्या मुलांचे छोटे मोठे हात हा रथ ओढायला आले म्हणूनच हे सारे शक्य झाले.

गेल्या आठवड्यात वर्तमानपत्रे मिळत नव्हती म्हणून मुंबईतील माणूस बेचैन होता. पण वर्तमानपत्र थोडे उशीरा आले म्हणून त्या वर्तमानपत्र विक्रेत्या मुलाच्या अंगावर खेकसणाऱ्या मुंबईकराने पेपर उशीरा येण्याचे कारण वा त्याची गाऱ्हाणी याबाबत त्याला कधी आस्थेवाईकपणे विचारलेसुद्धा नाही.

काही दिवसांपूर्वी जगन्नाथ कोठेकर, श्री. सहस्त्रबुद्धे व इतर काहींनी ' बृहन मुंबई वृत्तपत्र विक्रेत्या संघा 'ची स्थापना केली. आणि मग वृत्तपत्र विक्रेत्यांना एक प्रकारचे संघटीत स्वरूप आले.

सकाळी आपल्या दारात वर्तमानपत्रे आणून टाकणाऱ्यात बहुसंख्येने शाळकरी वा कॉलेजला जाणारी मुले आहेत. घरच्या काही आर्थिक अडीअडचणी असतात म्हणून ते पेपर्सची लाईन टाकतात आणि घरखर्चाला हातभार लावतात. काहीजण आपले शाळा-कॉलेजचे शिक्षण यावरच करतात. अनेकांचा चरितार्थ यावर अवलंबून आहे तर काहीजण अर्धवेळ काम करून कुठेतरी नोकरी करतात. त्यांना भरपूर पायपीट करावी लागते. अनेक जिने चढून जावे लागतात.

इतर व्यवसायाप्रमाणे याही व्यवसायात दलाली फार. त्यातच या व्यवसायातले चार मोठे एजन्ट्स या व्यवसायात मक्तेदार होऊन बसले आहेत. त्यांचे आपापसातील व्यावसायिक संबंध फारच चांगले आहेत, त्यामुळे वृत्तपत्र-विक्रेत्यांची सहजगत्या ते पिळवणूक करू शकतात. विक्रेत्यांची गत अगदी वाऱ्यावर सोडल्याप्रमाणे होते. वृत्तपत्रे वाटण्याबद्दल त्यांना २५ टक्के कमिशन मिळते. पण साऱ्यांनाच ते तितके मिळत नाही. उदा. टाईम्सकडून टाईम्सच्या एजंटला ३३ टक्के कमिशन मिळते. यातून तो विक्रेत्याला २५ टक्के कमिशन काय कपाळ देणार ! तो आपलाच फायदा पहाणार. अनेकांना तर दिवसाला ५० पैसे ते एक रुपया या दराने फार मोठ्या विभागात पेपर्सची लाईन टाकावी लागते. ही चक्क पिळवणूक आहे. जिने चढण्या उतरण्याचे श्रम करायचे, खूप फिरायचे आणि एवढे करून चुकून माकून एखाद्या दिवशी पेपर उशीरा गेल्यास गिऱ्हाईकांच्या कपाळावरील आठ्या पहायच्या वा त्याची बोलणी खायची. पण ही पोरे पडली नडलेली, आपली दुःखे सांगणार कोणाला ? आणि ऐकणारे कोण आहे ?

कोणताही आर्थिक लाभ मिळणार नसतानाही (उलट नुकसानच होणार असूनही) झालेला मुंबईतील हा किंबहुना पहिलाच संप होता.

वृत्तपत्र विक्रेत्यांची अनेक वर्षांची अनेक गाऱ्हाणी आहेत पण यावेळी त्यांच्या दोनच मागण्या होत्या

पहिली मागणी, ५–३० वाजता पेपर्स स्टॉलवर आले पाहिजेत ही होती तर वर्षातून पाच सुट्ट्या मिळाव्यात ही दुसरी मागणी होती.

सध्या वर्षातून त्यांना फक्त दोनच सुट्ट्या मिळतात. महाराष्ट्रातील इतर शहरातील वृत्तपत्र विक्रेत्यांना वर्षातून किती सुट्ट्या मिळतात कोण जाणे. बहुदा त्या दोनच असतील. (दिवाळी आणि प्रजासत्ताक दिनाची सुट्टी असते. कारण त्या दिवशी वृत्तपत्रे निघतच नाहीत.)

इतर राज्यातील या सुट्ट्या किती असतात याची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला तर असे आढळले की पूजा उत्सवात व इतर मिळून कलकत्ता व बंगालमध्ये वृत्तपत्र विक्रेत्यांना सहा रजा मिळतात. मद्रासमध्येही त्या सहा आहेत तर केरळ राज्यात वृत्तपत्र विक्रेत्यांना आठ रजा मिळतात. त्यामुळे येथील वृत्तपत्र विक्रेत्यांची पाच रजा मिळण्याची मागणी बिलकूल गैर नाही. या रजा इतर पगारी नोकरां-

प्रमाणे भर पगारी असणार नाहीत पण फक्त विश्रांती मिळावी याच हेतूने ही रजेची मागणी करण्यात आली होती.

सर्व पेपर्स साडेपाच वाजता स्टॉलवर मिळाले पाहिजेत हीसुद्धा योग्यच मागणी होती.

## विनाकारण रखडपट्टी

इतर सर्व पेपर्स स्टॉलवर येऊनही एखादा पेपर उशीरा आला, की त्या मुलांची खूपच रखडपट्टी होते. तो पेपर येईपर्यंत त्यांना ताटकळत स्टॉलवर बसून राहवे लागते. कारण एका पेपरसाठी पुन्हा वितरणासाठी जाणे त्यांना तसे अशक्य नसले तरी फारच त्रासदायक असते. समजा एखाद्या घरात लोकसत्ता व टाईम्स किंवा एकाच साखळी गटातील एक इंग्रजी व एक मराठी वर्तमान पत्र घेतले जात असेल आणि यापैकी एखादे वर्तमानपत्र उशीरा आले तर ते घेऊन पुन्हा जाणे त्रासदायक असते. म्हणजे ते टाळण्यासाठी उशीरा येणाऱ्या वर्तमानपत्रासाठी थांबावेच लागते. यात विक्रेत्यांचा वेळ जातो. भल्या पाहाटे उठून ही मुले स्टॉलवर जमा होतात. वर्तमानपत्रांची लाईन टाकून झाल्यावर त्यांना त्यांचे इतर उद्योगव्यवसाय करायचे असतात. त्यामुळे पेपर्स वेळेवर वाटून झाले तर ते लवकर मोकळे होतात. यातील अनेक मुले पेपर्स वाटून झाले, की तडक शाळा कॉलेजमध्ये धाव घेतात. तेव्हा पेपर साडेपाच वाजता येण्याने वेळेची बचत हाच त्यांचा फायदा आहे. शिवाय पेपर उशिरा आल्यामुळे गिऱ्हाईक नाराज होते ते होतेच. वर्तमानपत्र जास्तीत जास्त लवकर वाचकांच्या हाती पडण्यात वर्तमानपत्रांचाच फायदा आहे.

पूर्वी 'टाईम्स ऑफ इंडिया' सकाळी पाच वाजता वाचकांच्या हातात पडत असे. तेव्हा साडेपाच वाजता पेपर स्टॉलवर येण्यास काहीच अडचण नाही.

असे असूनही बड्या वृत्तपत्रांच्या संचालकांनी व व्यवस्थापकांनी संपाची हेटाळणी करण्याचाच प्रकार केला. 'टाईम्स' वृत्तपत्र गटाच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स पैकी एक श्री. उमाशंकर यांनी तर म्हटले 'त्या पोरांना आम्ही ओळखत नाही. आम्हाला फक्त बड्या नेत्यांशी वाटाघाटी करण्याची सवय आहे. त्या पोरांशी काय वाटाघाटी करायच्या!'

बड्या वृत्तपत्रांनी अशी काही याबाबत आरडाओरड केली, की काही विचारू नका. म्हणे वर्तमानपत्रे साडेपाचला स्टॉलवर तयार ठेवायची म्हणजे मग वाचकांना ताज्या बातम्या द्यायलाच नको.

पण हे खोटं आहे. अनेक वर्षांतून एकदाच केव्हातरी एखादी केनेडीसारख्या खुनाची बातमी फार उशीरा मिळते किंवा क्वचितच केव्हातरी यंत्रात बिघाड होतो आणि पेपर्स उशीरा येतात. हाय स्पीड रोटरी मशीन व इतर जलद गतीने काम करणाऱ्या यंत्रामुळे या साऱ्या अडीअडचणीवर मात करून पेपर्स साडेपाचला स्टॉलवर पाठविणे शक्य आहे. याशिवाय असे झाले तर पेपर सुमारे एक

पृष्ठ ६३ वर

# मुक्काम पुणे

## वेगळ्या वातावरणात अर्धा तास

**शरद कृष्णन्**

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे ।
त्वया हिंदुभूमे सुखं वर्धि तोहम् ।

– चार पाचशे स्वयंसेवक सश्रद्ध अंतःकरणाने मातृभूमीला वंदन करत होते. संघाची ही प्रार्थना सर्वांच्या चांगली परिचयाची असली तरी या संघटनेभोवती थोडे फार गूढ वलय आहे. कार्यासंबंधी उत्सुकता आहे. संघासंबंधी बरे-वाईट बोलले जाते, लिहिले जाते, त्याकडे दुर्लक्ष करून ही मंडळी निष्ठेने ठरले कार्यक्रम पार पाडत असतात.

ऐन मे महिन्यात शहरातून चालणारी त्यांची संचलने, स. प. मैदानावरील कार्यक्रम या वर्षानुवर्षे चालणाऱ्या गोष्टी आहेत. नेमेची येतो मग पावसाळा या नात्याने पुणेकर या गोष्टीकडे बघतात आणि संघ शिस्तीच्या धाग्यात अडकलेले स्वयंसेवक, अडकलेला हा शब्द खटकेल कदाचित म्हणून असे म्हणू, की घंघशिस्त प्रमाण मानणारे स्वयंसेवक, पुण्यात राहूनही गावाशी आपला काही संबंध नसल्याच्या थाटात थोडे थोडके नव्हे चक्क महिनाभर राहातात. मनात सहज आठवण येते ती एन्. सी. सी. कॅम्पची. हा कॅम्प गावात असला – की कॅम्पवाली ही पोरे इतक्याप्रकारे आपले अस्तित्व गावकऱ्यांना जाणवून देतात, की कॅम्प उठलेला बरा अशी भावना गावात निर्माण होते. या उलट महिनाभर गावात राहूनही ज्यांचे अस्तित्व जाणवून घेतले तरच जाणवते असे हे संघवाले. आता अस्तित्व जाणवून घ्यायचे म्हणजे संपर्क आवश्यक. – संपर्क साधण्यासाठी प्रत्यक्ष भेटले तर शंका-कुशंका – त्या पेक्षा संघ संबंधिताद्वारा जावे या सूज्ञ विचाराने संघाशी घनिष्ठ संबंध असलेल्या एका ज्येष्ठ पत्रकार-मित्राच्या साहाय्याने शिबीर संपर्क साधला.

शिबीराला मी जी भेट दिली ती साधारणपणे शिबीराच्या अखेरच्या दिवसा-

मध्ये. स्वाभाविकपणे मंडळी बांधाबांध करण्याच्या तयारीत होती, तरीही शिबीरातील एक अधिकारी श्री. जोशी यांनी सर्वत्र हिंडून माहिती दिली. यावर्षी १८७ गावातून आलेल्या ४६१ स्वयंसेवकांनी शिबीरामध्ये भाग घेतला. (आहे की नाही अचूक आकडेवारी), संघ-शिक्षा वर्गाची एकूण तीन वर्षे असतात. त्यातील पहिले व दुसरे वर्ष पुण्यात करता येते आणि अखेरचे वर्ष मात्र केवळ नागपूर येथेच होते. सध्याच्या नियमीत स्वयंसेवकाला या शिबीरात प्रवेश मिळतो. प्रवेशाबाबत शैक्षणिक अट नसते. संपूर्ण महिन्याचा खर्च केवळ चाळीस रुपये असतो. त्याखेरीज वीस रुपये घेतले जातात. निष्ठावान असलेल्या एखाद्या स्वयंसेवकाला केवळ आर्थिक अडचणीमुळे येता येत नसेल तर स्थानिक शाखेमार्फत साहाय्य दिले जाते.

मुले पुण्यात दाखल झाली की त्यांची जबाबदारी शिबीरावर असते. विश्रांती आणि झोप यासाठी आवश्यक असलेला किमान वेळ सोडला तर सर्व वेळ स्वयंसेवकांना कार्यमग्न ठेवण्यात येते. दिवसभराच्या कार्यक्रमाने दमलेला स्वयंसेवक रात्री निद्राधीन होतो. सकाळी व सायंकाळी सामुदायिक शारीरिक कार्यक्रम असतात.

## बौद्धिक वर्ग

संपूर्ण शिबीराची आखणी शिस्तबद्ध केलेली असली, आणि सर्व कार्यक्रमांना पुरेसा वेळ दिला असला तरी बौद्धिक वर्ग हा शिबीरातील महत्त्वाचा भाग असतो. गोळवलकर गुरुजी प्रतिवर्षी प्रत्येक शिबिरात एकदातरी येऊन जातात आणि बौद्धिक वर्गाचे वेळी मार्गदर्शन करतात. याखेरीज संघाचे अनेक लहान मोठे कार्यकर्ते या वर्गातून हजेरी लावतात. संघाचे उद्देश, कार्य, येणाऱ्या अडचणी, कार्यक्रमांची भावी दिशा अशा विविध प्रश्नांबाबत मार्गदर्शन केले जाते. स्वयंसेवकांची बौद्धिक कुवत लक्षात घेऊन पाडण्यात आलेल्या गटांमध्ये या बाबत चर्चाही आयोजित करण्यात येतात. देशाचा इतिहास व भूगोल आणि सर्वसामान्य माहिती ही रात्रीच्या कार्यक्रमाचे वेळी देण्यात येते.

शिबीराचा संपूर्ण महिन्याचा कार्यक्रम आगाऊ आखण्यात येतो. साधारणपणे वीस स्वयंसेवकांमागे एक मार्गदर्शक शिक्षक असतो. सुमारे पाचशेएक पान रोज महिनाभर सकाळ-संध्याकाळ जेवायला घालणे सोपी गोष्ट नव्हे. शिवाय कुणाला दुखले, खुपले तर त्याची जबाबदारी शिबीरावरच. मी शिबीराला भेट दिली असतानाच एका मुलाच्या मनगटाचे हाड मोडले. परंतु तत्परतेने वैद्यकीय उपचाराची व्यवस्था करण्यात आली. संपूर्ण महिनाभर एक रुग्ण विभाग चालवला जातो आणि आजारी स्वयंसेवकांना औषधपाणी दिले जाते. आवश्यकता भासल्यास त्याला शिबीरातीलच 'हॉस्पिटल'मध्ये ठेवून घेण्यात येते. उसळत्या रक्ताच्या तरुण स्वयंसेवकांना शिबीरकालासाठी इतके शिस्तबद्ध जीवन आखून देणे आणि त्यांनी त्याचे पालन करणे, ही गोष्ट संघशिस्तीची कल्पना देते.

संघ शिक्षा शिबीरांचा हा कार्यक्रम सर्वसाधारणपणे याच कालखंडात देशभर चालू असतो आणि प्रत्येक शिबीराला गुरुजी जातीने भेट देतात. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर विदर्भ सोडून संघाच्या दृष्टीने महाराष्ट्राचे २० जिल्हे मानण्यात येतात आणि त्यांची सहा उपविभागामध्ये फोड केली जाते. त्यातील चार विभागातील स्वयंसेवक पुण्याच्या शिबीरात येतात.

शिबीरांचा हा कार्यक्रम १९२८ साली नागपूर येथे सुरू झाला. पुण्याचे पहिले शिबीर १९३५ साली भरले आणि संघबंदीचा तापदायक काळ सोडल्यास ते प्रतिवर्षी भरतच आहे.

## साशंक वातावरण

शिबीर पाहण्याची आणि काही तपशील मिळवण्यासंबंधी मी जेव्हा उत्सुकता दाखवली, त्या वेळी फारसा उत्साहाचा प्रतिसाद मिळाला नाही. कारण संघटना बळकटीच्या कार्यक्रमास त्यांना प्रसिद्धी अभिप्रेत नाही. सर्वसाधारण लोकांना या कार्यक्रमासाठी उत्सुकता आहे असे मी सांगितल्यावर व माझी 'पूर्ण ओळख' पडल्यावर शिबीर भेटीचा कार्यक्रम योजण्यात आला. स्वागत मोठे उत्साहाने झाले असे नव्हे–त्यामध्ये नापसंती नव्हती हे जितके खरे, तितकेच जिव्हाळा आणि आपुलकी यापेक्षा कर्तव्यभावना जास्त होती. विविध शिक्षकांशी, व्यवस्थापकीय मंडळींशी ओळखी झाल्या. परंतु भरपूर हिंडूनही एकाही स्वयंसेवकाशी प्रत्यक्ष बोलण्याचा योग आला नाही. मी आपण होऊन तसा प्रयत्न केला नाही आणि माझे वेगळेपण सुस्पष्ट असूनही एकही स्वयंसेवक आपण होऊन माझ्याशी बोलला नाही. कदाचित ज्येष्ठ अधिकारी बरोबर असल्याने त्यांना वेगळे बोलण्याची गरज वाटली नसावी. शिबीरप्रमुख म्हणजेच शिबीराचे सर्वाधिकारी, कोल्हापूरचे कृष्णाजी प. खासबारदार, यांच्याशी परिचय करून देण्यात आला. दोन-चार इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या आणि इथेही मी होऊन खोल पाण्यात गेलो नाही–जावे असे वाटलेही नाही आणि मुद्दाम होऊन मी विचारल्या माहितीपेक्षा जास्त माहिती देण्यात आली नाही.

समारोपासाठी समोर आलेला सरबताचा पेला रिकामा केला. सर्व मंडळींचा निरोप घेतला आणि बाहेर पडलो. एक ज्येष्ठ कार्यकर्ते बाहेरपर्यंत सोडावयास आले होते.

संघाबाबत, कार्यकर्त्यांबाबत मला काही गोष्टी जाणवल्या त्या वर नोंदवल्या आहेत. कदाचित हा माझ्या दृष्टीचा परिणाम असेल, कदाचित भूतकाळात संघाला जे अनेक कटु अनुभव आले, त्यातून तावून-सुलाखून निघालेले कार्यकर्ते कोणीही नवीन परका मनुष्य आत घेताना हेतुतः ही दक्षता घेत असावेत.

पुण्याच्या या शिबीराचा समारोप समारंभ विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य

पंडित यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. तमाम जनतेसाठी खुल्या असलेल्या या कार्यक्रमानेही 'संघ शिस्ती'चे आणखी एक दर्शन घडवले आणि सर्व हिंदुधर्मीयांना एका संघटनेमध्ये बांधून विशिष्ट दिशेने कार्यप्रवण करणाऱ्या–एका महत्त्वपूर्ण संस्थेच्या संघटन कौशल्याचे दर्शन घडवणाऱ्या शिबीराची सांगता झाली. ◻

## राम कदम रजनी

अव्वल संस्थानी काळात राजघराण्यातील विवाह कसे होत असावेत याची चुणूक दाखवणाऱ्या एका विवाह समारंभाच्या समारोपाचा भाग म्हणून राम कदम रजनी आयोजित करण्यात आली होती. रामभाऊ सध्या विनीचे संगीत दिग्दर्शक. 'सोंगाड्या'ची त्यांची गाणी जरा निवतायत तोच 'एकटा जीव' आणि विशेषतः 'पिंजरा'चा गरम गाण्याचा सेट मार्केटमध्ये आल्याने, आणि ही गीतेही तितकीच लौकप्रियता संपादन करत असल्याने राम कदम या नावाला वजन प्राप्त झाले आहे.

त्यातही आतापर्यंत रामभाऊ रजनी वगैरे करावयाच्या फंदात पडले नाहीत. खाजगी स्वरूपाचा असला तरी राम कदम रजनी या नावाने होणारा हा पहिलाच कार्यक्रम असल्याने या कार्यक्रमाला एक वजन होते.

भल्या घरच्या लग्नाचे समस्त वऱ्हाड आणि विवाह समारंभ व स्वागत समारंभाला हजेरी लावणारी समस्त मंडळी प्रेक्षक म्हणून उपस्थित असलेल्या या कार्यक्रमामध्ये जयवंत कुलकर्णी, बकुळ पंडित, रामा बाजीकर, स्वतः रामभाऊ आदि मंडळींनी भाग घेतला.

प्रारंभी बकुळ पंडित यांनी 'पिंजरा'ची चार गाणी सलग ऐकवली. बारीक सारीक सर्व जागा घेत त्यांनी गायलेल्या या गीतापैकी 'मला लागली कुणाची उचकी' व 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल, नका सोडून जाऊ रंगमहाल' ही दोन गीते विशेष रंगली. जयवंत कुलकर्णी यांच्याबरोबर त्यांनी गायलेलं 'काल रातीला सपन पडलं' हे द्वंद्वगीत मोठे झकास वाटले. रामा बाजीकर आणि जयवंत कुलकर्णी यांनी सोंगाड्याची गाजलेली गाणी सादर केली. बकुळ पंडितची नाट्यगीते आनंद देऊन गेली. पण कार्यक्रमाचा मुख्य तोल संभाळला जयवंत कुलकर्णी यांनीच. 'लबाड लांडगा ढवांग करताय' या त्यांच्या गीताला दाद मिळाल्याने त्यांनी ते पुन्हा सादर केले आणि त्या वेळी रामभाऊ कदम यांनी गीतातील प्राण्यांचे आवाज अचूक काढून दाद घेतली. 'रसिका गाऊ कोणते गीत' आणि 'संपली कहाणी' या रामभाऊंनी स्वतः सादर केलेल्या गीतांबरोबर या कार्यक्रमाची सांगता झाली.


## अजब श्रोते

सर्वसाधारणपणे संगीताच्या कार्यक्रमाला कार्यक्रम आवडला तर चांगली दाद मिळते. पण या कार्यक्रमाचे प्रेक्षक खरोखरच अजब होते. गायक जीव ओतून गाणी म्हणत होते. कार्यक्रम चांगला होत होता पण दिलखुलास दाद एकदाही मिळाली नाही. सुमारे हजार दीड हजार प्रेक्षक आपण कार्यक्रम ऐकतो म्हणजे गाणाऱ्यावर उपकार करतो अश्या थाटात बसलेले. अखेरीस न राहवून 'गाणे आवडले तर जरूर दाद द्या, म्हणजे जरा बरं वाटतं अशी विनंती गायक कुलकर्णी यांनी केली. लोकांना कंटाळा येतो आहे अशा समजुतीने त्यांनी वाद्ये लावली जात असताना, काही चांगले किस्से सुनावले. त्यातला मजेशीर वाटलेला किस्सा नोंदवतो. एकदा पाकिस्तानचे अध्यक्ष भुट्टो महाराज यांच्या कानावर 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या गर्जना आल्या. ऐकून बरे वाटल्याने भुट्टो महाशयांनी कोण गर्जना देत आहे ते पाहून येण्यास सांगितले. उत्तर आले, सर दाराबाहेर कुत्रीची विण झाली आहेत. आणि नुकतीच जन्मलेली पिले झिंदाबादच्या घोषणा देत आहेत. भुट्टो महाराज म्हणाले ठीक आहे. त्यांना अशाच घोषणा परदेशी पाहुणे येतील, त्या वेळीही द्यावयास सांगा. पण काय चमत्कार. चार सहा दिवसातच पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा ऐकू आल्या. भुट्टो महोदयांनी पुन्हा मनुष्य पाठवला. बघून येऊन त्यांनी उत्तर दिले, साहेब तीच पिले घोषणा देत आहेत. फरक इतकाच की आता त्यांनी डोळे उघडले आहेत.

कुलकर्णी यांच्या या छोट्या मोठ्या चुटक्यांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. राम कदम रजनीच्या या पहिल्या कार्यक्रमाचे स्वरूप पाहता रामभाऊंचे कार्यक्रमही जोरात जातील असा रंग दिसतो. □

## क्रिकेट शिक्षण वर्ग

भारतीय हॉकी संघ म्हणजे–पंजाबचा हॉकी संघ असे म्हटल्यास वावगे वाटू नये, इतके प्रचंड प्राबल्य या मंडळींनी हॉकी क्षेत्रात संपादन केले आहे. पुष्कळ प्रमाणात क्रिकेटच्या बाबतीतही भारतीय क्रिकेट संघ म्हणजे आपल्या मराठी खेळाडूंचा संघ (मुंबई–महाराष्ट्र असा वेगळा भेद हे विधान करताना मी धरत नाही.) असे अभिमानाने म्हणता यावे, इतकी मजबूत आघाडी आपले खेळाडू टिकवून होते. आता ही आघाडी टिकवायची असेल, तर कसून प्रयत्न केले पाहिजेत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि परिस्थितीचे आव्हान स्वीकारणाऱ्या आपल्या मंडळींनी त्या दृष्टीने प्रयत्नही सुरू केले आहेत. विशेषतः महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला अशा प्रयत्नांची गरज वाटत असल्याने असोसिएशनचे अनेक उपक्रम चालू असतात. शालेय मुलांचा शिक्षण वर्ग हा एक असाच उपक्रम. आता शिक्षणवर्ग म्हटला म्हणजे त्याचा सांगता समारंभही आलाच. तसा तो या समारंभाचाही



कसोटीवीर नाना जोशी आणि संघाचे भावी आधार

झाला. सामान्यपणे क्रीडा क्षेत्रातील हे समारंभ म्हणजे एक उपचार असतो, कारण मैदानात कर्तृत्व गाजवणारी मंडळी समारंभाच्या व्यासपीठावर कमी पडतात. तथापि यावर्षी एकदम उलटा अनुभव आला. एकेकाळी गाजलेले कसोटी वीर नाना जोशी यांनी मार्गदर्शनपर सुरेख भाषण केले. त्यांचा रोख प्रामुख्याने रणजी-करंडक जिंकण्याची स्वप्नें पाहाणाऱ्या महाराष्ट्र संघावर होता. सध्या हा संघ कमकुवत वाटत असला, तरी आजची महत्त्वाकांक्षी मुलेच या संघाची उद्याची खरी ताकद आहेत आणि खांद्यावर पडणारा भार ती समर्थपणें उचलतील. त्यांच्या भाषणातील आणखी तीन मुद्दे चांगले वाटले. कोणाच्यातरी वशिल्याचे तट्टू म्हणून संघात शिरण्यापेक्षा, स्वतःच्या कर्तृत्वाचा बंदा रुपया वाजवूनच संघात प्रवेश मिळवण्यात खरी शान आहे. या विद्यार्थ्यांना दिलेल्या सुचनेबरोबरच मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना पूर्णत्व यावे म्हणून त्यांच्यासाठीही वर्ग चालवण्यात यावेत, असे मत त्यांनी मांडले. क्रिकेट प्रसारासाठी उद्योगपतींनी पुढाकार घ्यावा हे त्यांचे आवाहनही मौलीक वाटले. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनची प्रा. देवधर, बापूसाहेब जोशी, ही मक्तेदार मंडळीही आपला नेहमीचा वाटा उचलून गेली. या क्रिकेट शिक्षण वर्गाला मार्गदर्शन करण्याचे काम धोंडू जोशी, दत्ता खेर व अविनाश जोशी यांनी केले. दिवाडकर-दाजीसाहेब नातू, आप्पासाहेब मोहनी ही नेहमीची मंडळी समारंभाची शोभा वाढविण्यास मौजूद होतीच.

पण समारंभ लक्षात राहिला—नाना जोशी यांनी केलेले मनमोकळे व मुद्देसूद भाषण आणि उत्साही विद्यार्थ्यांशी त्यांनी केलेले प्रेमळ हितगुज—यामुळेच.

। ◻ ◻

गावात विहीर आहे पण पाणी नाही
शाळा आहे पण मुलांना शिक्षण नाही
हक्काची जमीन आहे पण कसायला मिळत नाही—
आणि तरीही
अर्धपोटी राहून
संघर्ष चालू ठेवणाऱ्या

# आमशीच्या हरिजनांवरील अन्यायाची कथा

**माणूस' प्रतिनिधी**

चावडा येथील हरिजन बहिष्काराचे प्रकरण निवते न निवते तोच परभणीमधील नवीन अत्याचाराची बातमी येऊन धडकते. पुन्हा एक वादळ उठते. दलितां-वरील अत्याचाराच्या बातम्या नाहीत असा एखादा भाग्यवान आठवडा मिळणेही या निधर्मी राज्यपद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या, आणि समाजवादाचे कंकण हाती बांधलेल्या राज्यामध्ये अशक्य होऊन बसले आहे. दबलेले पाचपंचवीस अन्याय पचवल्यावर एखाद्या परभणी प्रसंगाचा स्फोट होतो. वृत्तपत्रातून गवगवा होतो. झालेला अन्याय वेशीवर टांगला जातो, दोषी माणसाला, प्रत्येक वेळी शासन मिळतेच असे नाही. परंतु निदान अन्याय तरी वेशीवर टांगला जातो. घडलेली घटना जेव्हा भडक आणि सरळ सरळ अत्याचाराची असेल त्याचवेळी अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटतात. तथापी आज माझ्या पोतडीत आहे ते प्रकरण सन्मान्य मार्गाने दलित समाजावर केलेल्या अन्यायाचे एक गंभीर प्रकरण आहे.

कोल्हापूर तसं मोठं शहर. या शहरापासून आपल्याला फार लांब जायचं नाही,

कारण मैलांच्या हिशेबात अंतर आहे केवळ सतरा अठरा मैलांचं. कुडीत्रे आणि खटांगळ ही गावं संपली की, एस. टी. ची हद्द संपते. आणि अजूनही मोगलाई अंमल असलेल्या आमशीकडे आपल्याला पायपीट करत खाजगी गाडीने अथवा बैलगाडीने जावे लागते. निसर्ग सौंदर्याने खुललेल्या आमशीच्या परीसरात काल परवापर्यंत राज्य होते भाऊ ज्योती पाटील यांचे. कोल्हापुरात आणि पश्चिम महाराष्ट्रात लोकशाही, समाजवाद, यांच्या गर्जना चालू असतानाच हा सुलतानी पाटील करीन तो कायदा अशा थाटाने आमशीच्या परिसरात राज्य करत होता. गावामध्ये हरिजनांची वस्ती ४५० ते ५००. पण या मंडळींना मान वर करून चालायची हिंमत नव्हती. ही गरीब मंडळी म्हारकीच्या वतनदारी शेतात, आणि काळमादेवी नावाच्या देवस्थानच्या जमीनीमध्ये शेतीभाती करून कशीबशी गुजराण करीत असत. या मंडळींचा पाटलावर तसा विश्वास आणि या विश्वासाच्या आधारेच पाटील मुजोर बनला. त्यांची जमीन हुसकण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यावर पाटलाची नजर देवस्थानच्या जमिनीकडे गेली आणि योग्य तिथे हात सैल सोडून त्याने ७/१२ च्या उताऱ्यात संरक्षीत कूळ म्हणून स्वतःचे नाव लावून घेतले. आणि योग्य संधी साधून हरीजनांना या जमिनीतून हुसकले. उपलब्ध असलेल्या चांगल्या बागायती जमिनीतून आपण पूर्ण हुसकले गेलो, अशी खात्री झाल्यावर हरिजन मंडळीनी कलेक्टरकडे धाव घेतली.

## धाडसी निर्णय

कलेक्टर हा वास्तविक अधिकारी; समोरचे कागदपत्र पाहून पुढे जाणारा परंतु कलेक्टरलाही हरिजनांची भूमिका पटली. पाटलाकडे सीलिंगपेक्षा जास्त जमीन उपलब्ध आहे अशी सबब सांगून कलेक्टरने २९ जून १९६३ रोजी देवस्थानची सर्व जमीन समस्त हरिजन मंडळींना परत देण्याचा हुकूम काढला. पाटलाच्या दृष्टीने हरिजनांचा हा अगाऊपणा होता. या अगाऊपणाचे प्रायश्चित म्हणून या हरीजनांना जवळ जवळ नामशेष करण्याच्या उद्देशाने त्याने हालचाल सुरू केली. हरिजनांना बाजूलाच ठेऊन त्याने कलेक्टर विरुद्ध कमिशनरकडे तक्रार करून कलेक्टरच्या निर्णयाविरुद्ध स्टे मिळवला. १० ऑगस्ट १९६३ रोजी स्टे चा कागद हातात असतानाच पाटलाने हरिजनांविरुद्ध दिवाणी दावा दाखल केला. आणि दोन वेळची खायची भ्रांत असलेल्या हरिजनांच्या कोर्टाच्या खेपा सुरू झाल्या. कोर्टाने २३ जानेवारी १९६५ रोजी समोर आलेल्या पुराव्याच्या आधारे कलेक्टरने हरीजनांना जमीन देऊ नये अशा अर्थाचा हुकूम बजावला. वातावरण चिघळले. हरीजन आणि पाटील यांच्यामधील तेढ वाढली. आणि बळेच जमीन नांगरणाऱ्या पाटलांच्या मंडळीमध्ये व हरीजनांमध्ये बाचाबाची होऊन त्याची परिणती पाटलाचे दोन मुलगे, पुतण्या व भाऊ, यांच्या खुनामध्ये झाली. दिवाणीच्या जोडीला फौजदारी येऊन बसली. आधीच हतबल झालेले हरीजन दिवाणी फौज-

दारीच्या दुहेरी पात्यात भरडले जाऊ लागले. शिवाय या खुनाचा बदला म्हणून पाटलाच्या मंडळींनी लगोलग दुसऱ्या दिवशी संबंध हरीजन वस्ती उध्वस्त करून टाकली तो भाग वेगळाच.

फौजदारी खटल्याचे कामकाज जोरात सुरू झाले. आतापर्यंत स्वस्थ असलेले शासन खडबडून जागे झाले. खुनाचे प्रकरण चांगलेच गंभीर असल्याने कसून तपास करून एकूण सदतीस मंडळींवर खटले भरण्यात आले. आता गरीब हरिजनांचे बाजूने कोण उभा राहणार? आपल्याच समाजातील कांबळे नावाचा वकील मनुष्य त्यांनी उभा केला. आता या कांबळे महाशयांना केस चांगल्या पद्धतीने लढवता आली नाही. निकाल संपूर्ण हरीजनांच्या विरुद्ध गेला. लहानसहान शिक्षापासून ते जन्मठेपेच्या शिक्षापर्यंत सर्व प्रकारच्या शिक्षा एकोणीस व्यक्तींना देण्यात आल्या. कोर्टाच्या निकालपत्रातही-हरीजनांबद्दल सहानुभुती दाखवणारे, त्यांना चांगले वकिली सहाय्य उपलब्ध झाले नाही, असे मत नोंदवणारे तपशील आहेत. फौजदारी दावा जिंकून हरीजनांची पूर्ण ससेहोलपट केल्याने आपला मार्ग निर्विघ्न झाला असा भाऊ ज्योती पाटील यांचा समज झाला. आता आपला ठिकाणा लागत नाही या भावनेने धास्तावलेले हरीजन अमशी सोडून गेले.

## दिवाणी दावा उलटला

हरीजनांनी आमशी सोडल्याने आपण पूर्ण जिंकली अशा भावनेत पाटील आमशीत मिरवू लागले. ६५ साली पाटलाने लावलेल्या दाव्याचा निकाल ३ फेब्रु-१९७१ रोजी लागून सात वर्षाच्या झुंजीनंतर पाटील मंडळींचा देवस्थान जमिनी-वरील दावा फेटाळला गेला. आणि पांगलेले हरीजन पुन्हा एकत्र आले. कोर्टाचा निर्णय झाल्यावर २८ एप्रिल ७१ रोजी देवस्थान मंडळाने हरिजन मंडळींना ताबा देण्यासंबंधीचा आदेश काढला. काहीतरी थातूर-मातूर निमित्त करून पाटील मंडळी जागा द्यायचे टाळू लागली. इतकच नव्हे तर त्यांनी स्वतःच्या दबावाचा वापर करून देवस्थान मंडळाला जमीन न देण्याचा आदेश दिला. हरीजनांनी पुन्हा जोरदार आवाज उठविला. आणि १२ जुलै १९७१ रोजी देवस्थान मंडळाने पुन्हा हरीजनांना जमीन देण्याचा हुकूम दिला. इतकी लढलेली पाटील मंडळी अशा प्रकाराला थोडीच भीक घालणार आहेत. पुन्हा नवीन उत्साहाने कोर्टाकडे धाव घेऊन ५ ऑगस्ट १९७१ रोजी देवस्थानच्या हुकमाला मनाई करणारा 'स्टे' पाटील मंडळींनी मिळवला आहे. आणि या सर्व प्रकरणाने निराश झालेले हरीजन कोल्हापुरातील संसोपाचे एक कार्यकर्ते, आणि दलित समाजाचे प्रश्न नेटाने हाताळणारे श्री. बापुसाहेब पाटील यांच्या मदतीने या जमीन प्रकरणी लढा देत आहेत.

कलेक्टर, कमिशनर, दिवाणी दावे, फौजदारी दावे, देवस्थान मंडळींचे निर्णय आणि आता पुन्हा दिवाणी दावा—या मार्गाने जाणाऱ्या या प्रकरणाने दहा वर्षांचा

काळ खाऊनही प्रश्न सोडवलेला नाही. त्यामुळे या प्रकरणांमुळे अनेक गंभीर प्रश्न उभे रहातात.

पाच पंचवीस रुपयांच्या प्रलोभनाला बळी पडण्याची भरपूर शक्यता असलेल्या तलाठी मंडळींनी केलेल्या नोंदी किती प्रमाणात खऱ्या मानाव्यात ?

चांगला वकील नसणे म्हणजे न्याय नाकारणेच. आर्थिक ताकद नसलेल्या हरीजनांना चांगला वकील उपलब्ध न करून देणे म्हणजे त्यांना बचावाची संधी नाकारणेच नाही काय ?

स्वत:चा संसार-प्रपंच मजेत चालवत, आर्थिक-बौद्धिक पातळीवर सर्वात खालच्या स्तरावर असलेल्या मंडळींशी कोर्टात झुंज देणे, त्यांना बळेच झुंजावयास लावणे अमानुष नाही काय ?

अर्ज, विनंत्या, कोर्ट कचेऱ्या करूनही आपली न्याय्य बाजू प्रकाशात येत नाही या भावनेने अस्वस्थ झालेल्या हरीजनांनी शस्त्र उचलले तर तो दोष कुणाचा ? आणि या परिस्थितीत शस्त्र उचलले की तो नक्षलवादी कसा ?

या सर्व प्रश्नांना प्राप्त परिस्थितीत काहीही उत्तर नाही. मी स्वत: या सर्व प्रकरणाची पाहणी करण्यासाठी बापुसाहेब पाटील यांच्या समवेत आमशी येथे गेलो होतो.

हक्काच्या जमिनीच्या तुकडचापायी मेटाकुटीला आलेल्या त्या केविलवाण्या चेहऱ्यांना पाहून गलबलून येते. आमशी खून खटल्यातील जन्मठेपेचे कैदी असलेले पाच लोक सोडल्यास बाकी मंडळी परत आली आहेत. आता असलेल्या या अडीच तीनशे लोकांचे जीवन कसे आहे ? ते करतात काय ? रहातात कसे ? मुला-बाळांच्या शिक्षणाची काय सोय ? एक ना अनेक प्रश्न – आणि प्रत्येक प्रश्नाचे धक्कादायक उत्तर–

या सर्व मंडळींना एकत्र बोलवून मी त्यांच्याशी बातचित केली. यांचे रोजचे जीवन कसे ? म्हारकी वतनाची जमीन ते सध्या कसतात. आता ही ३०–३२ कुटुंबे पाणी नसलेल्या जमिनीतून किती पीक घेणार ? १०–१५ खंडी भात येतो. तो हा हा म्हणता संपतो. मग चार चार मैल जाऊन रोजगार धुंडायचा. रोजगार मिळाला ठीक. न मिळाला तर फाके आहेतच.

प्यायचे पाणी. त्याची काय व्यवस्था ?

अहो, कुठली व्यवस्था न कसलं काय. १९६८ साली पन्नालाल सुराणा यांनी आमशीच्या पाण्यासाठी छोटे लक्षवेधी आंदोलन केले. आश्वासन मिळाले. पण आज १९७२ मध्ये गावात विहीर असूनही उंच डोंगरातील झरे शोधून हे हरीजन दोन-दोन तीन-तीन मैलावरून पाणी आणतात. पण विहिरीवर जात नाहीत. कारण तशी दांडगाई केली तर परिणाम काय होतात हेही त्यांना माहीत आहे.

शिक्षणासंबंधी मी प्रश्न विचारला मात्र, तुकारामने माझ्यासमोर चार पोरे

आणून उभी केली. हा तुकाराम दहावी शिकलेला समंजस मुलगा वाटला. प्रल्हाद नानू कांबळे हा सहावीत असताना शाळा सुटली. कारण मार खायची भिती. आता मिळेल त्या रोजगारावर काम करतो. शिवाजी लहू कांबळे व भिकाजी ज्ञानू भोसले हे जरा जास्त उत्साही. गावात शाळा आहे, पटावर नावे आहेत पण माराच्या भितीने जाता येत नाही. म्हणून धास्तावलेली ही पोरे दोन मैलावर असलेल्या कुंभाज येथील शाळेत जातात. आता जाण्या-येण्यात तास तास घालवायचा. घरी आल्यावर जेवणाचे फाके. अशा परिस्थितीमध्ये ही मुले काय करणार. गावाचे संरक्षण नाही. पोलीसांकडून सहानुभूती नाही. १९६५ च्या खुनाच्या वेळी पाटलांच्या घरच्या खूनाबद्दल तत्परतेने ३७ जणांवर खटले भरून १७ जणांना आत पाठवण्यात आले. आणि या खुनाच्या दुसऱ्याच दिवशी हरीजनवाडा जवळ जवळ जमीनदोस्त करणारी पाटलांची मंडळी, त्यांना सजा नाही. त्यांची चौकशी नाही. हा कसला न्याय ? बापूसाहेब पाटील यांनी या संदर्भात पोलीस खात्याकडे चौकशी केली पण पोचपावतीपुढे उत्तर नाही.

## पाटलाची अखेर

मी कुणा वर्तमानपत्राचा बातमीदार आहे हे समजल्यावर माझ्याभोवती आशेने जमा झालेली ही मंडळी समता, समाजवाद, सामाजिक न्याय यांचा घोष करणाऱ्या नेत्यांपर्यंत आपला आवाज पोचावा म्हणून खटपटीत आहेत. आज ना उद्या न्याय मिळेल. आपली जमीन आपण कसू अशी स्वप्ने पाहात आहेत. त्यांना जमीन मिळवून देण्यासाठी बापूसाहेब पाटील प्रयत्नशील आहेतच.

आता समारोप करण्यापूर्वी भाऊ ज्योती पाटलाचा एक किस्सा नोंदवतो. कोणताही अपराध नसताना वर्षानुवर्षे या हरीजनांना न्यायापासून वंचीत ठेवून हालअपेष्टा भोगायला लावणाऱ्या परमेश्वरावर आपला विश्वास नाही. परंतु काही वेळा दैवी चमत्कार जरूर पाहाण्यास मिळतात. हरीजनांची ससेहोलपट करून त्यात दुष्ट समाधान मानणाऱ्या भाऊ पाटलाची अखेर ही अशीच पोॲटीक जस्टीस देणारी आहे. जमीन-जुमला, पैसा-आडका यांना सर्वस्व मानणारा हा पाटील अखेर वेडा झाला. कपड्याची शुद्धबुद्ध त्याला राहिली नाही. अंगावरचे कपडे फाडत तो हिंडत असे. अखेरीस नातेवाईकांनी त्याला उचलून आणला. परंतु कशाचाही फारसा उपयोग न होता अर्धवट वेडावस्थेत या अमशीच्या सुलतानाची अखेर झाली आणि गंमत म्हणजे जन्मभर त्याचा दुःस्वास करणाऱ्या हरीजनांनी त्याबद्दल कणव व्यक्त केली. हा उफराटा न्याय हरीजनांना समाधान देणारा नाही. देवस्थानच्या साडेआठ एकर जमिनीत त्यांच्या नांगराचे फाळ जेव्हा घुसतील, तेव्हाच त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे खरे हास्य विलसेल.

□ □ □

# अय्यो ऽ ! मद्रास्स ! :

# चोराघरचे आमंत्रण....

**नलिनी अंबाडे**

कुणावरून असं म्हणू लागले, ते काही आपल्याला ठाऊक नाही, पण असं म्हणतात मात्र खरं की, चोराच्या घरचं आमंत्रण, जेवल्याशिवाय खरं नाही ! समजा कुणाला अशीच उपाशी आमंत्रणे मिळत गेली असली तर ते त्याचे वैयक्तिक दुर्दैव म्हणायचे, दुसरे काय ?

आता कन्याकुमारीचेच पाहाना ! 'सूर्यास्तापूर्वी परत येतो' असं सांगून शंकर भगवान सटकले. ही कुमारी कन्या नववधूचा साजश्रृंगार करून, समुद्राकडे डोळे लावून राहिली. दावणी साडी, नाकात मुरणीचा हिरा अन् हातात माला ! त्या बिचारीला विष्णूचा डाव काय ठाऊक ? ती आदी पराशक्ती पार्वती विवाहानंतर सासरी गेल्यावर, राक्षसांचा संहार कोण करणार ? काहीतरी करून हा विवाह होता कामा नये हे विष्णूंनी पक्के ठरविले व मुद्दामच शंकरास बोलावून घेतले अन् संध्याकाळ टळेपर्यन्त थांबवून ठेवले. निराश होऊन तिने पूजेचं तबक उधळून दिले. आजही किनाऱ्यावरील वाळू रंगीबेरंगी आहे. आजही ती 'दावणी' परीधान केलेली आहे. (दावणी म्हणजे कुमारिकांनी नेसावयाचा परकर ओढणी) अशा प्रकारे कन्याकुमारीच्या कथेची सांगताच मुळी खोट्या आश्वासनावर झालेली आहे !

कन्याकुमारीस जाण्याचा पहिला योग आला १९६५ मध्ये अन् दुसरा आला गेल्यावर्षी ! मद्रासच्या बाजुने तिरुनिलवेल्ली हे शेवटचे रेल्वे स्टेशन. तेथून अडीच रुपये देऊन बसने नागरकोईल येथे यायचे. तेथून बस बदलून बारा मैलांवरील कन्याकुमारीस यावयाचे. केरळच्या बाजूने जावयाचे झाल्यास रेल्वे त्रिवेंद्रम्पर्यंतच व तेथून पुढे कन्याकुमारी ५५ मैल ! अशा प्रकारे कन्याकुमारीस रेल्वे नाही. वास्तविक पूर्वीच्या त्रावणकोर संस्थानातून आणि नंतरच्या भारतीय संघराज्यातील कन्याकुमारी जिल्ह्यातून अनेक शिष्टमंडळे वरपर्यंत गेली व तोंडभरून आश्वासने घेऊन येत राहिली. स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी खुद्द जवाहरलालजींनी आश्वासन दिले होते. ह्या गोष्टीस पंचवीस वर्षांचा

काळ लोटला, नेहरूही स्वर्गवासी झाले पण कन्याकुमारीस रेल्वे काही आली नाही. आत्तापर्यंत झालेल्या प्रत्येक रेल्वेमंत्र्यानेही आश्वासन दिलेलेच आहे, पण दर वेळी कुठेतरी माशी शिंकते आणि......

एकीकडे सरकारचे खास पर्यटन खाते दरवर्षी कोटयावधी रुपये खर्चून अधिकाधिक परदेशी प्रवाशी आकर्षित केल्याचा दावा करते. १९७१ मध्ये भारताने ४० कोटी रुपयांचे परकीय चलन प्रवाशांकडून मिळवले. १९७३ मध्ये ४ लाख प्रवासी भारतात येतील असा अंदाज आहे. १९७८ मध्ये आठ लाख प्रवाशांना आकर्षित करून १०० कोटी रुपयांचे लक्ष्य पर्यटन खात्यासमोर आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन मंत्रालय एक खास योजना राबविणार आहे. प्रेक्षणीय स्थळांच्या गावांचा मास्टर प्लॅन बनविणे, पर्यटनाचे वाढीसाठी युनेस्कोतर्फे परदेशी तज्ज्ञांना बोलावणे ह्या योजना आहेत. प्रत्येक प्रेक्षणीय ठिकाणी प्रशिक्षित गाईडस्चे पथक ठेवले जाईल. पर्यटनाचे वाढीसाठी एक कमिटी नेमली जाईल. तिचे अध्यक्ष टूरिझम आणि सिव्हिल-एव्हिएशनचे मिनिस्टर असतील. सदर कमिटीच्या कामाची रूपरेषा अद्याप पक्की व्हायची आहे. हे सर्व पाहाता, मनात काय विचार येतो ? घराच्या दुभत्या गाईला साधा गोठा करायचं राहिलं बाजूला, तर तिच्यासाठी रेशमी झूल परदेशाहून खरेदी करण्याचा खटाटोप जणू !

कन्याकुमारीस दररोज हजारो प्रवासी भेट देतात. तेथे रेल्वे नाही, म्हणजे सारेजण बसेस मोटारीनीच येतात. पण प्रत्यक्ष कन्याकुमारीस बांधलेला बसस्टॅण्डच नाही, हे खरे वाटेल का ? प्रवासी एका झाडाखाली उन्हापावसात धुळमातीत ताटकळत बिचारे उभे राहातात ! आलेल्या बसवर तुटून पडतात, कारण रिझर्वेशन करायचे कुठे ? परदेशी प्रवासी किनाऱ्यावरील झोपडया उर्फ केरळीय हॉटेलांचे फोटो घेतात, रस्त्यावर मातीत बसलेल्या भारतीय प्रवाशांचे फोटो घेतात.. आणि .. त्यांच्या देशात परत जावून भारताची भरपूर बदनामी करतात. बदनामी कसली ? सत्यपरिस्थिती ! किनाऱ्यावर दुकाने, हॉटेले तर सोडाच, परंतु लोकांना सूर्योदय सूर्यास्त बघण्यासाठी साधी बाकेही नाहीत, ना सावलीसाठी वनविभागाने चार बाभळीची झाडे लावलेली दिसत नाहीत. जी काही एक-दोन हॉटेले आहेत ती पैसा कमवितात ! उकडया तांदळाचा वास मारणारा भात खा ! पोळया-पुऱ्यांचं किंवा कपभर चहाचं नाव घेऊ नका !

बिचारी देवी कन्याकुमारी किनाऱ्यावरून हे सारे पाहाते आहे. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच्या २५ वर्षांतही फारसा फरक तिला दिसलेला नाही. पर्यटन खाते फक्त परदेशी प्रवाशांचाच विचार करते. पण कन्याकुमारीस त्यांच्या-साठीही काही सोय नाही. ते त्रिवेंद्रमच्या ' ए ' ग्रेड हॉटेलसमध्ये राहातात. टॅक्सीला ७५ रु. देवून सूर्योदय पाहून मुक्कामाला परत जातात. हे सारे ' सरकारला 'ला दिसत नाही असं वाटत असेल तर लेखी पुरावा आहे बरं !

ज्या झाडाखाली प्रवासी बसची वाट बघत उभे राहातात, तेथून समोरच दोन आलीशान राजवाडे दिसतात. लाल कौलांचा जुन्या पद्धतीचा उंच राजवाडा म्हणजे केरळ सरकारी 'गेस्टहाऊस' आणि दुसरी नवी तीनमजली भव्य वास्तू म्हणजे मद्रास राज्याचे 'गेस्टहाऊस'! आपापल्या खोल्यातून समुद्र पाहू शकाल अशी रचना, नोकरचाकर, आचारी, बेअरर्स असा प्रचंड लवाजमा. खोल्या एअर-कण्डीशण्ड, फ्रीज मधून बर्फ हजर तर स्नानाला गरम पाणी, गाड्यासाठी मोठ्ठी पार्कींग जागा. त्यासाठी खास पोस्ट, पोलीसस्टेशन किनाऱ्यावर ! गेस्टहाऊसेस वर होणारा खर्च अन् जमा ह्यांची वजाबाकी करण्याचा वेडेपणा कुणी करू नये ! ह्या ठिकाणी आलेल्या मंडळीत, आत्तापर्यंतच्या २० वर्षांत कोणीही सुटला नसेल ! १९७० च्या सप्टेंबरात स्वामी विवेकानंदांचे स्मारकाचे उद्घाटनास खुद्द पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष, साऱ्या राज्यांचे मुख्यमंत्री अन् ज्यांना ज्यांना जमले ती बडीबडी मंडळी येऊन, राहून गेली ! पण स्वदेशी प्रवाशांकरिता एक पत्र्याची शेड असावी असा कुविचार कुणाला सुचला नाही, मग रेल्वे तर दूरच !

...आणि जानेवारीत रेल्वे खात्याच्या योजना विभागाने, कन्याकुमारीचा नंबर पास केला. कन्याकुमारीपासून बारा मैलांवरील नागरकोईल पर्यंत प्रथम रेल्वे होईल. म्हणजे त्रिवेंद्रम् फाटा वाढवून पुढे नेला जाईल व तसाच तिरूनिल् वेल्लीचा फाटा ! नंतर नागरकोईल ते कन्याकुमारी फाटा होईल. सुमारे १०० मैलांच्या ह्या ब्रॉडगेज रेल्वेस साडेचौदा कोटी खर्च येईल व ३ वर्षांचा अवधी लागेल. २२ स्टेशने व अठरा मोठे पूल असतील. दरवर्षी साडेसात लाख टनांची मालवाहतूक व ७० लाख प्रवाशांची ने-आण अपेक्षित आहे. ह्यामुळे दिल्ली, कलकत्त्याहून अन् 'व्हीटी' पासून कन्याकुमारीची बोगी जोडण्याची सोय होईल! पण एवढ्यात हुरळून जाऊ नका, आत्ता फक्त योजना पास झालीय ! पहिली कुदळ समारंभपूर्वक पडायची आहे, ती कुणाचे हस्ते हे ठरायचे आहे ! जोवर कन्याकुमारीच्या समोर प्रत्यक्ष इंजिन झुकझुक करीत पोहचत नाही, तोवर हे काही खरे नाही ! चोराघरचे आमंत्रण, जेवल्याशिवाय खरे नाही, असंच काहीतरी !

□ □

---

**पुढील सहा महिन्यात 'कविता' सदरात प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची निवड पूर्ण झाली आहे. कविमित्रांनी कृपया कविता पाठवू नयेत, त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. —संपादक**

---

राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याच्या तामिळनाडूच्या मागणीत काही अर्थ आहे का ?...

# स्वायत्तता आणि केंद्र-राज्य संबंध

**वा. दा. रानडे**

पंतप्रधान श्रीमती गांधींनी राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याच्या मागणीस जोरदार विरोध दर्शविला आहे. मदुराई येथे तामिळनाडू काँग्रेस राजकीय परिषदेत बोलताना त्या म्हणाल्या, ' स्वायत्तता हा धोक्याचा शब्द होऊ शकतो. देशाचे ऐक्य आणि सामर्थ्यास त्यामुळे धोका येऊ शकेल. लोकांचे लक्ष मूलभूत प्रश्नापासून दुसरीकडे वेधले जाईल. '

तामिळनाडूच्या नेत्यांनी केलेली स्वायत्ततेची मागणी कितपत योग्य आहे ? राज्यांना खरोखर अधिक स्वायत्तता देण्याची आवश्यकता आहे काय ? कोणत्या मर्यादेपर्यंत ती देता येईल ? फुटीर प्रवृत्ति वाढून देशाच्या एकतेस त्यामुळे धोका निर्माण होईल ही भीती कितपत खरी आहे ? हे प्रश्न यातून उपस्थित होतात. त्यांचा विचार तात्कालिक आणि तात्विक अशा दोन्ही दृष्टींनी केला पाहिजे.

तामिळनाडूच्या सत्तारूढ द्रवीड मुन्नेत्र कळघम पक्षाचे नेते स्वायत्ततेच्या मागणीबद्दल गेल्या काही महिन्यातच विशेष आग्रह धरीत असून त्यासाठी आंदोलनाची भाषाही बोलत आहेत. आताच या प्रश्नावर एवढा भर देण्याचे काय कारण ? द्रवीड मुन्नेत्र कळघमने इतर पक्षांशी आघाडी करून १९६७ व १९७१ च्या निवडणुका प्रचंड बहुमताने जिंकल्या. या दोन्ही निवडणुकांच्या प्रचारमोहिमेत द्रवीड मुन्नेत्र कळघम नेत्यांनी स्वायत्ततेच्या मागणीवर भर दिलेला नव्हता. द्रवीड मुन्नेत्र कळघम १९६७ साली अधिकारावर आल्यापासून विधिमंडळापुढील राज्यपालांच्या भाषणात दरवर्षी स्वायत्ततेची मागणी केलेली असे. पण या वर्षी २२ जानेवारी १९७२ ला विधिमंडळापुढे केलेल्या भाषणात राज्यपाल के. के. शहा यांनी या मागणीचा उल्लेखही केला नाही. आताच या मागणीवर भर देण्याचे कारण गेल्या

काही महिन्यातील घटनात शोधले पाहिजे. पहिली महत्त्वाची घटना म्हणजे विधानसभा निवडणुकीत इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली सत्तारूढ काँग्रेसने मिळविलेला प्रचंड विजय. एक वर्षापूर्वीच्या लोकसभा निवडणुकीत निर्णायक बहुमताची खात्री नसल्याने सत्तारूढ काँग्रेसला दहा जागांसाठी तामिळनाडूत द्रवीड मुन्नेत्र कळघमशी युति करावी लागली होती व विधानसभेच्या सर्व जागावर पाणी सोडण्याची मानहानिकारक तडजोड स्वीकारावी लागली होती. पण आता चित्र बदलले आहे. केंद्रात आपले सरकार टिकविण्यासाठी इंदिरा गांधींना द्रवीड मुन्नेत्र कळघमच्या पाठिंब्याची आता मुळीच आवश्यकता नाही. वर्षापूर्वी द्रवीड मुन्नेत्र कळघमशी केलेल्या आघाडीतून सत्तारूढ काँग्रेस व कम्युनिस्ट बाहेर पडले आहेत. द्रवीड मुन्नेत्र कळघमची पूर्वीची लोकप्रियता ओसरली आहे. काँग्रेसप्रमाणेच द्रवीड मुन्नेत्र कळघमच्या कारभारातही लाचलुचपत वाढू लागली आहे. तामिळनाडूत पुनः काँग्रेसचे बस्तान बसविण्यास ही परिस्थिती अनुकूल असून तिचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे; तर त्याला उत्तर म्हणून स्वायत्ततेच्या मागणीवर पुनः भर देऊन जनतेचा पाठिंबा टिकविण्याचा द्रवीड मुन्नेत्र कळघम नेते प्रयत्न करीत आहेत. स्वायत्ततेची मागणी म्हणजे फुटून निघण्याच्या मागणीचा पहिला टप्पा आहे असा प्रचार सत्तारूढ काँग्रेसचे नेते करीत आहेत तर आमची मागणी फक्त स्वायत्ततेची आहे, आम्हाला फुटून निघायचे नाही आणि स्वायत्ततासुद्धा केवळ तामीळनाडूला नव्हे तर सर्वच राज्यांना मिळावी अशी आमची भूमिका आहे असे तामिळनाडूचे मुख्यमंत्री करुणानिधि यांनी स्पष्ट केले आहे. असे असले तरी रामस्वामी नायकरांसारखे नेते स्वतंत्र, सार्वभौम तामिळनाडू राज्याची मागणी अजूनही करीत आहेत व त्यांच्यामागे एक गट आहे हे विसरून चालणार नाही.

## निश्चित भूमिकेची गरज

स्वायत्ततेच्या मागणीबाबत योग्य भूमिका कोणती ? आपले राष्ट्र हे आपण खऱ्या अर्थाने संघराज्य मानतो की नाही या मूलभूत प्रश्नावर एकदा निश्चित भूमिका घेतली की मग स्वायत्ततेच्या प्रश्नावर योग्य भूमिका घेता येईल. पंजाबी, बंगाली, गुजराथी, महाराष्ट्रीय वगैरे भाषिक प्रदेश एकत्र येऊन आपले राष्ट्र बनले आहे. या भाषिक प्रदेशांना स्वतःची वेगळी भाषा, संस्कृती, इतिहास व परंपरा आहे. अनेक शतके ती विकसित होत गेलेली आहे. हे भाषिक घटक म्हणजे राष्ट्रसदृश प्रदेश आहेत. ब्रिटिश राजवटीविरुद्ध झालेल्या स्वातंत्र्य लढ्यात ते एकत्र येऊन आपले एकराष्ट्रीयत्व निर्माण झाले. आपला देश मूलतः संघराज्याच्या स्वरूपाचा आहे. संघराज्यात घटकांना स्वायत्तता असते आणि संघराज्य सरकारकडे संरक्षण, परराष्ट्र धोरण, दळणवळण, चलन यासारखे संबंध देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे मर्यादित विषय सोपविलेले असतात. ब्रिटिशांची १९३५ ची घटना ही संघराज्याचीच घटना होती. आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी त्या घटनेला विरोध

केला तो संघराज्याच्या कल्पनेला विरोध नव्हता तर लोकनियुक्त प्रतिनिधींचा कारभार असलेले प्रांत आणि संस्थानिकांची अनियंत्रित सत्ता असलेली संस्थाने यांची लोकशाही विरोधी एकत्र मोट त्यात बांधली होती म्हणून त्याला आपला विरोध होता. घटनेतील प्रांतिक स्वायत्ततेचा भाग आपण स्वीकारला तेव्हाच संघराज्यातील घटकांच्या स्वायत्ततेचे तत्त्व राष्ट्रीय चळवळीने मान्य केले ही सारी पार्श्वभूमी विचारात घेता 'स्वायत्तता हा धोकेबाज शब्द आहे' असे म्हणून पंतप्रधानांनी त्या मागणीची एका झटक्यात वासलात लावणे बरोबर नाही, असे दिसून येईल. पंतप्रधानांच्या या वक्तव्यावर समाजवादी पक्षाचे नेते नानासाहेब गोरे यांनी एका लेखात योग्य टीका केली, ते म्हणतात, "स्वायत्ततेची मागणी म्हणजे पूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचाच बुरखा आहे आणि काँग्रेसची सत्ता नसलेल्या राज्यातूनच ती होत आहे असे समजून ती फेटाळून लावणे चुकीचे होईल. केंद्राविरुद्ध आपला आवाज उठविण्याचे धैर्य काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यात आज नसले तरी कालांतराने तेही अशाच मागण्या करू लागतील."

## व्याप्ती व मर्यादा

स्वायत्ततेची मागणी तत्त्वतः चूक नाही पण या स्वायत्ततेची व्याप्ती व मर्यादा कोणत्या? आपल्या घटनेत राज्यांना दिलेले अधिकार पुरेसे नाहीत काय? आपल्या घटनेचा सांगाडा संघराज्याचा असला तरी प्रत्यक्षात राज्यांना पुरेशी स्वायत्तता दिलेली नसून केंद्र सरकारकडे मोठ्या प्रमाणावर अधिकार दिलेले आहेत. घटनेतील काही तरतुदी या दृष्टीने लक्षात घेण्यासारख्या आहेत. घटनेच्या कलम २४९ (१) अन्वये राज्यसभेच्या दोन तृतीयांश सभासदांच्या मताने राज्य यादीतील एखाद्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्रास देता येतो. कलम २५० (१) अन्वये राज्याच्या यादीतील एका किंवा अनेक विषयावर कायदे करण्याचा पार्लमेंटला अधिकार आहे. अमेरिकेत व ऑस्ट्रेलियात आणीबाणीच्या काळातसुद्धा राज्ययादीतील विषयावर संघराज्य सरकारला कायदे करता येत नाहीत. राज्याच्या कक्षेतील विषयातसुद्धा काही गोष्टी करण्याबाबत राज्यांना आदेश देण्याचे अधिकार आपल्या घटनेने केंद्र सरकारला दिले आहेत. हे आदेश न पाळल्यास घटनेच्या ३५६ कलमाखाली राष्ट्रपतींना आवश्यक ते उपाय योजता येतात. डॉ. ए. के. घोषाल यांनी म्हटल्याप्रमाणे राज्यांना आदेश देण्याचा अधिकार केंद्राला असणे हेच मुळात संघराज्याच्या तत्त्वाविरुद्ध आहे आणि हे आदेश न पाळल्याबद्दल ३५६ कलमाखाली कारवाई करणे हे तर त्यापेक्षाही वाईट असून संघराज्याची मृत्युघंटा वाजविण्यासारखे आहे' शिक्षण व आरोग्याच्या बाबतीत सशर्त मदतीच्या द्वारा केंद्राचे राज्यांवर अप्रत्यक्ष नियंत्रण येते. पंचवार्षिक योजना किंवा वार्षिक योजना, केंद्रसरकारची धोरणे या निर्णयानुसारच मुख्यतः आखल्या जातात. वार्षिक अंदाजपत्रकातील योजनेवरचा खर्च ठरविण्याच्या बाबतीत राज्यांना प्रत्यक्षात फारशी स्वायत्तता रहात नाही. योजनांसंबंधी अंतिम निर्णय

राष्ट्रीय विकास मंडळ घेत असले तरी हे निर्णय जवळजवळ केंद्र सरकारचेच असतात. समाईक यादीतील विषयावर केंद्र सरकार आणि एखादे राज्य सरकार यांनी केलेल्या कायद्यात तफावत असेल तर केंद्र सरकारचाच कायदा प्रमाण मानला जाईल अशी घटनेत तरतूद आहे. राज्यांच्या स्वायत्ततेवर हा अन्याय्य निर्बंध आहे एखाद्या राज्याने केंद्रापेक्षा अधिक पुरोगामी कायदे आपल्या राज्यापुरते अंमलात आणायचे ठरविले तर त्याला तसे करता येणार नाही असा याचा अर्थ आहे. स्वायत्ततेचा दुरुपयोग राज्य सरकारे करणार नाहीत काय असा प्रश्न येथे उपस्थित होतो. पण वाटेल तसे कायदे राज्य सरकारे करू शकणार नाहीत. या कायद्या विरुद्ध सुप्रीम कोर्टात जाता येईल. सुप्रीम कोर्टाचा अंकुश त्याच्यावर राहीलच.

## राष्ट्रपतींना अमर्याद अधिकार

राज्यपाल व राष्ट्रपती यांना असलेले काही अधिकार राज्यांच्या स्वायत्ततेस बाध आणणारे आहेत. राज्यपालांनी स्वतःच्या निर्णयबुद्धीने एखादा अन्याय्य निर्णय घेतला तर त्याविरुद्ध लोकनियुक्त मंत्रिमंडळ काहीही करू शकत नाही. अशा निर्णयाविरुद्ध कोर्टात दाद मागण्यासही घटनेने बंदी केली आहे. राज्यपालांची नेमणूक, केंद्र सरकारच्या सल्ल्याने राष्ट्रपतींनी केलेली असते व केंद्र सरकारचे धोरणच ते अंमलात आणीत असल्याने त्यांच्यामार्फत राज्यांच्या कारभारात हस्तक्षेप करण्याची संधी केंद्र सरकारला मिळते. राज्यपालांच्या अधिकारांचा वापर करून केंद्राला नको असलेली राज्य मंत्रिमंडळे बडतर्फ केली जातात. अशा अन्याय्य निर्णयांविरुद्ध सुप्रीम कोर्टात दाद मागण्याची तरी तरतूद घटनेत हवी. राज्य विधिमंडळाने पास केलेल्या कोणत्याही बिलास परवानगी नाकारण्याचा अधिकार अमेरिकन घटनेत राज्यपालांना व संघराज्य सरकारला नाही. आपल्या घटनेत याबाबतीत राष्ट्रपतींना अमर्याद अधिकार दिलेले आहेत. राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे विचारासाठी पाठविलेले बिल त्यांच्या सूचनांसह विधिमंडळाकडे पुनः पाठविण्यात येते. या सूचनांसह किंवा सूचनांशिवाय विधिमंडळाने ते पास केल्यावर राष्ट्रपतींकडे पुनः मान्यतेसाठी पाठविले जाते पण त्याला मान्यता दिलीच पाहिजे असे बंधन राष्ट्रपतींवर नाही. एखाद्या राज्याने पास केलेले बिल केंद्राला नापसंत असेल तर त्याला मान्यता नाकारण्यासाठी राष्ट्रपतींच्या या अधिकारांचा वापर केला जाण्याचा संभव आहे. राज्यांच्या स्वायत्ततेस त्यामुळे बाध येतो.

राज्यांच्या स्वायत्ततेवर मर्यादा घालून केंद्र सरकारला अधिक अधिकार देणाऱ्या घटनेतील काही तरतुदींचा येथे विचार केला. या अन्याय्य तरतुदी रद्द झाल्या पाहिजेत. राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याने केंद्र सरकार दुबळे होईल अशी भीती व्यक्त करण्यात येते पण स्वायत्तता नाकारली तर राज्यात असंतोष वाढत जाऊन फुटून निघण्याची प्रवृत्ती बळावण्याचा धोका आहे, तेव्हा हे टाळावयाचे असेल तर राज्यांना खऱ्या अर्थाने स्वायत्तता देणे हाच योग्य मार्ग आहे. आपल्याला केंद्र सरकारही दुबळे नको; तसेच राज्य सरकारेही दुबळी नकोत. त्यासाठी केंद्र व

राज्यांच्या अधिकारात योग्य तोल राखला गेला पाहिजे. कोणत्याही एका बाजूस हा तोल अधिक झुकला तर संघर्ष निर्माण होऊन विकासात अडथळे निर्माण होतील.

केंद्र व राज्यांचे संबंध याचा विचार करण्यासाठी तामिळनाडू सरकारने राजमन्नार समिती नेमली होती. एक वर्षापूर्वी तिने अहवाल सादर केला. तामिळनाडूची स्वायत्ततेची मागणी या अहवालातील शिफारशींवरच मुख्यतः आधारलेली आहे. ' केंद्र म्हणजे हेडमास्तर व राज्ये म्हणजे शाळेतील मुले अशा पद्धतीने घटना अंमलात आल्यापासून आतापर्यंत राज्यांना वागवण्यात आले, पण आता परिस्थिती बदलली आहे. राज्ये प्रौढ झाली आहेत. त्यांना प्रतिष्ठेने वागविण्यात आले पाहिजे.' असे मत अहवाल सादर केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना न्या. राजमन्नार यांनी व्यक्त केले. अहवालातील शिफारशींचा येथे सविस्तर विचार करणे शक्य नाही पण राज्यांच्या स्वायत्ततेला मर्यादा घालणाऱ्या घटनेतील तरतुदींचा उल्लेख मो केला आहे, त्या रद्द करण्याची शिफारस अहवालात केली आहे. केंद्र सरकार उभारीत असलेल्या करांच्या उत्पन्नात राज्यांना अधिक वाटा मिळाला पाहिजे, अशी समितीने मागणी केली आहे. आंतर-राज्य मंडळ नेमण्याची तरतूद घटनेतच आहे. ते नेमण्याची शिफारस अहवालात केली आहे. मंडळात राज्यांचे मुख्यमंत्री किंवा त्यांचे प्रतिनिधी असावेत व पंतप्रधान त्याचे अध्यक्ष असावेत. पार्लमेंटपुढे येणारी राष्ट्रीय महत्त्वाची बिले या मंडळाकडे प्रथम छाननीसाठी पाठवावीत अशी शिफारस समितीने केली आहे. राज्यांत नवे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी परवाने देण्याचा अधिकार राज्यांना असावा असे समितीला वाटते पण देशाचा योजनाबद्ध औद्योगिक विकास होण्याच्या दृष्टीने केंद्राकडेच हा अधिकार असणे योग्य आहे. समितीच्या अशा काही शिफारशींबद्दल मतभेद होऊ शकतील त्यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र-राज्यसंबंधांचा विचार करण्याकरता केंद्रानेच एखादी समिती नेमली पाहिजे. विरोधी पक्षांनी यासाठी आग्रह धरला पाहिजे.

आज बहुतेक राज्यात काँग्रेसची सत्ता असल्याने केंद्र व राज्ये यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नाही पण ही परिस्थिती दीर्घकाल टिकेल असे नाही. केंद्र व राज्ये यात भिन्न पक्षांची सरकारे अधिकारावर येण्याची शक्यता गृहीत धरूनच केंद्र-राज्यसंबंधांचा विचार आपणास केला पाहिजे. संघराज्याच्या तत्त्वाप्रमाणे केंद्राने संबंध देशाच्या दृष्टीने महत्वाच्या प्रश्नांपुरतेच अधिकार स्वतःकडे ठेवून बाकी बाबतीत राज्यांना स्वायत्तता दिली पाहिजे. या प्रश्नासाठी समिती नेमण्याचा विचार केंद्राने लांबणीवर टाकणे योग्य होणार नाही.

□ □ □

# कविता

## काचकमळ

ओळखीचे सूर देती, नेत्र माझे ओथंबून
हिरमुसलेला थेंब दंवाचा, अजून कळीशी ओठंगून
निथळलेले विरावे अर्थ, त्याच हिरव्या पानांचे
घडावेसे वाटे सहज, वेढीता कडे भावनांचे
ओठातल्या ओठामध्ये, शब्दधारा उडलेला
कलंडला अर्थ नवा, गोंदलेल्या पानातला
रेघोटयातून रूजू याव्या, हृदयातील गंधरेखा
तटतटे हातावर ती, जाणलेली स्पर्शरेखा
वेदना गोठून जाता, यावे नभी आवर्तन
भुलभुलावणीमध्ये, जीव क्षण पिसाटून
निसटावे ज्याच्यातुनी, तेच हंस तरंगले,
काच-कमळ हृदय तुझे, स्पर्शताच निखळले
अतां फुंकावे पापणीने, अंतरीच्या देठातून
बुडले ते कमळ तुझे, तळे नेत्री साठवून

—सुभाष बाहेकर

## शून्य

कानात घुमतात—
अज्ञाताचे सांजवारे !
मनात नगारे—
मानवतेचे !!
नाद नगाऱ्यांचे—
श्रवतात सांजवारे—
शून्य राहते शेवटी—
वेड्या भोळ्या अमिबाचे !!

शिवाजीराव सावंत

## वात्रटीका

निवडणुकीतली ती
वचने तू विसरून जा !
त्या दिलेल्या भूल थापा
दाविली अमिषे तशी
आज आहे का भरवसा ?
राजीनामा या हाती !
खूप पैका कमविला
उपभोगही तो भोगला
मानपत्रे हार-गुच्छे
देउनी स्वप्नात जा !

—बाळ मनोहर

## क्षण

वात जळते
रात ढळते
पंखात स्वप्न
हळहळते
काळोख येतो
डोळ्यात न्हातो
स्मृतिमखली
भैरवी गातो
भिजले सूर
विझले दूर
अश्रू चाटती
क्षण निष्ठूर

उत्तम कोळगांवकर

---

## आस्वाद

सुभाष बाहेकर यांच्या 'काचकमळ' या कवितेत एक उत्कट भावपूर्ण मनःस्थिती सांगितलेली आहे. ओळखीच्या सुरांनी कवीचे नेत्र ओथंबून आलेले आहेत. 'हिरमुसलेला थेंब दवाचा, अजून कळीशी ओठंगून' ही कवीच्या या अवस्थेची, निसर्गातली दृश्य प्रतिमा आहे. कवीचे ओलावलेले मन हिरमुसले आहे. हिरव्या

पानांचे अर्थ विरून जावेत असे वाटते आहे खरे, पण ओठातल्या ओठातच शब्दाचा पारा उडून गेला आहे. गोंदलेल्या पानातला नवा अर्थ 'कलंडला', हृदयातील ग्रंथरेखा 'रेघोट्यातून कजू' याव्यात, स्पर्शरेषा हातावर 'टतटटे' या प्रत्येक उल्लेखातील शब्दयोजन भावनेच्या काव्यमय प्रतिमा रेखाटणारे आहे. हंस तरंगले, काचकमळ स्पर्शाने निखळले, नेत्री तळे साठवून कमळ बुडले ही परिभाषा म्हणजे तरल अनुभवाला गवसलेली अनुरूप शब्दवाहिका आहे. कवितेतील प्रत्येक ओळ नि प्रत्येक कल्पना स्वतंत्रपणे काव्यमय आहे. तथापि कविता जरा आटोपशीर असती, तर जीवंत अनुभवाची एकजीव सवेद्य आकृती अधिक परिणामकारक झाली असती.

शिवाजीराव सावंत यांच्या 'शून्य !' या कवितेत मनाला होणाऱ्या अनामिक उदात्त जाणीवा आणि प्रत्यक्ष व्यवहाराच्या अनुभवातील क्षुद्रता यांतील विरोध दाखविलेला आहे. 'अज्ञाताचे सांजवारे', 'मानवतेचे नगारे' आणि 'वेड्या भोळ्या अमिबाचे शून्य' या तीन प्रतिमांनी कवितेतील अनुभव सांगितला आहे. सांजवारे शीतल असूनही हुरहूर लावणारे असतात. कसलातरी गूढ संदेश ते देतात. हे तर अज्ञाताचे सांजवारे आहेत. माणसाच्या मनाला जाणवणाऱ्या अकल्पिताच्या संवेदना या प्रतिमेतून कवीने सहजपणे प्रतीयमान केल्या आहेत. पण हे अज्ञाताचे सांजवारे जितके खरे, तितकेच मानवतेचे नगारेही. पोकळ आवाज बडविणारे. या दोन्हीचा छेद शेवटी शून्य निर्माण करतो. साधेसुधे नाही, अमीबाचे वेडेवाकडे शून्य. या शून्याला विक्षिप्त आकार आहे, तसाच वेडेपणा नि भोळेपणाही आहे. दोन कडव्यांच्या या कवितेतून माणसाच्या जीवनवृत्तीचे भाष्य अनुभवाच्या उत्कटतेने मांडण्याचा प्रयत्न शिवाजीराव सावंत यांनी केला आहे.

बाळ मनोहर यांनी लिहिलेली 'वात्रटीका' म्हणजे विनोदी टीकात्मक कविता लिहिण्याचा एक प्रयत्न आहे. वात्रटीका म्हणजे काय हे मात्र त्यांना कळलेले नाही. वात्रटीकेत शुद्ध निर्भेळ विनोदाला प्राधान्य असते, चावट विक्षिप्तपणा असतो. टीका गौण असते. येथे नेमके उलट झाले आहे. कवीची भूमिका मात्र प्रामाणिक आहे. सद्यःस्थितीचे डोळस निरीक्षण त्यामागे आहे.

उत्तम कोळगावकर यांनी 'क्षण' या कवितेत विषण्ण अनुभव गतिमान शब्दात सांगितलेला आहे. अतिशय मोजक्या शब्दात या अनुभवाच्या एकेक पायऱ्या रचल्या आहेत. ढळत्या रात्रीच्या जागत्या वातावरणात पंखात हळहळणारे स्वप्न, डोळ्यात न्हाणारा काळोख, स्मृतीच्या भैरवीत भिजलेले सूर अशी भावचित्रे रेखाटलेली आहेत. कवीची ही भावस्थिती अत्यंत उत्कट आहे. विशेषतः भिजलेले सूर दूर विझून जातात आणि निष्ठुर क्षण अश्रू चाटत राहतात हे शेवटचे वर्णन विशेष आर्त आहे. कवितेची गती तेथे न संपणारी गुंजने निर्माण करीत संपते. स्वतःचा अपेक्षाभंग सोसत सोसत त्यातील भावोत्कटता कवीने सहजपणे उलगडून दाखविली आहे.

—रसिक



**नो**करीचा राजीनामा द्यावा असा माझ्या मनाचा कल होऊ लागलेला आहे. अलीकडे अलीकडेच हा विचार मनात सारखा डोकावून जाऊ लागलेला आहे. तसं म्हटलं तर कामही त्रासदायक नाही. पण नोकरीत काही दम नाही. नुसती चमचेगिरी आहे. तिचीच मला आता खंत वाटू लागलेली आहे. साखरकारखान्याच्या पी. आर. ओ. ची नोकरी बरी आहे. असे प्रथम प्रथम मला वाटले. पूर्वीच्या राजाच्या दरबारातला थाट आणि हल्लीचा पी. आर. ओ. यांच्यामध्ये फारसा फरक नाही हे मलादेखील आता पटायला लागलेलं आहे. कारखान्याच्या चेअरमनसाहेबांना

लहरीपणा संभाळायचा. डायरेक्टर्स लोकांची सरबराई करावयाची. चेअरमन-साहेबांच्या भाषणांची इतिवृत्त सर्वत्र पाठवावयाची. हेच काम प्रथम प्रथम त्रासाचं वाटणार पुढं पुढं अंगवळणी पडलं. पगार चांगला होता. राहायला क्वार्टर होती. फिरायला गाडी मिळत होती.

पण मन कसं स्वाभिमान शून्य बनलं होतं. चोमडेपणा करावयाचा, लुडबुडायचं आणि पोट जाळायचं ह्याला काय जीवन म्हणायचं का काय ? पण न पटूनदेखील माणसाला काही गोष्टी पत्कराव्या लागतात. त्या आटापिटा करून राबवाव्या लागतात. कारण संसार ?संसार चालवावयाचा म्हणजे कोणतीही तडजोड पत्करल्या शिवाय गत्यंतर नसते.

चेअरमनसाहेबांच्या न केलेल्या भाषणांचे रिपोर्टींग आणि ब्लॉक्स वर्तमानपत्राकडे पाठविले. आज मी गेलो नव्हतो. ही कामगिरी आमचा इस्माईल ड्रायव्हर फार चांगली करी. कारखान्याच्या पहिल्या जीपवर पहिला ड्रायव्हर म्हणून इस्माईल आला. तो एक चांगला ड्रायव्हर म्हणून गणला जायचा. तो गाडीच अशा स्टायलिशपणे चालवायचा की, गाडीत बसलेल्या माणसाच्या लक्षात त्याच्या ड्रायव्हिंगचं कौशल्य लगेच येई. मुंबईची ट्रिप असली की निघाल्यापासून सातव्या तासाला तो मुंबईत नेऊन ठेवी आणि बिनबोभाटा, कधी कंटाळा नाही, आळस नाही.

तो दिसायला अतिशय रुबाबदार की, सिनेमात गेला असता तर बेटा एखादा

---

**शंकर पाटील**

# रजीनामा

---

चांगला नट झाला असता अशी त्याची पर्सन्यालिटी होती. उभट चेहरा, कुरळे केस, रुबाबदार चाल, थोरामोठ्यांत वागण्याची सवय त्याच्या चांगलीच अंगवळणी पडलेली होती. तसा प्राणी फार रंगेल आणि उमदा होता. नवा सिनेमा लागला की हटकून जाणार. त्यातल्या नटीची स्तुती करणार.

गावी अगर भागात कुठं तमाशा आला तर त्याला त्याची हटकून हजेरी असायची...बाहेर गाडी वाजली. म्हणून मी पाहिलं तो इस्माईल परत आला होता. पण नेहमीसारखा तो हसला नाही. त्याचा चेहरा उतरला होता.

"कायरे ?"

"साऱ्या बातम्या वर्तमानपत्रात दिल्या."

"छान, तुला आता जायला हरकत नाही." मी त्याला सांगितलं. पण इस्माईल गेला नाही. त्यानं एकवेळ माझ्याकडे पाहिले, म्हणून मी त्याला विचारले.

"कायरे ? तुला काय पाहिजे का ?"

"काय नगो ?" एवढं म्हणून तो थोडा घुटमळला.

"बोल की,"

"वाईच सल्ला विचारायचा होता."

"मग मी फी मागत नाही, विचार."

"पर इचारू का नगं, ह्येचा माझा मलाच निर्णय होईना."

"सांग तरी.'

"बरं आज नगोच." एवढं म्हणून तो गेला. गाडी भर्रदिशी गेली, मला त्याच्या वागण्याचं आश्चर्य वाटलं. हा आमचा इस्माईल म्हणजे साऱ्या फॅक्टरीचा लाडका ड्रायव्हर. आपल्या कामात अतिशय तत्पर.कधीही न कंटाळणारा. सर्वांची नाडी ओळखून वागणारा. एक अतिशय समजूतदार ड्रायव्हर, कोणा डायरेक्टराला संध्याकाळी घुटका पाहिजे कुणा डायरेक्टरला हळूंच आपल्या प्रेमपात्राकडं जावयाचं आहे. कोणा डायरेक्टरला डोंबारणीच्या बैठकीची हजेरी लावावयाची आहे, हे सारं त्याला न सांगता कळतं. गाडीमध्ये चेअरमनसाहेब असले की गाडी नेमक्या वेळेला नेमक्या हॉटेलमध्ये न्यावयाची. त्यांचे चिरंजीव नंबर एक गाडीत असले की कोणते हॉटेल पकडायचं.? पुण्या–मुंबईला गेल्यावर कुठल्या लॉजवर उतरायचं, सिगरेट कोणती लागते ? हे सारं त्याला अचूक ठाऊक असते. त्यामुळे आमचे चेअरमनसाहेब तर मुंबईला जाताना इस्माईलला घेतल्याशिवाय मुळीच पुढे पाऊल टाकत नसत.

असा हा इस्माईल सगळ्यांचा लडीवाळ. त्याला पगार भरपूर होता. कामाचा त्रास काही नाही. मग हा पठ्ठ्या नोकरी का सोडतोय याचा मलादेखील उलगडा होईना, म्हणून त्या दिवशी मी तो प्रश्न तेवढ्यावर सोडून दिला. . ...

एक दिवस काय झालं ? आम्ही मुंबईला गेलो होतो. चेअरमनसाहेब दिल्लीला गेले. आम्हाला त्यांनी गाडी घेऊन परत जायला सांगितलं. सर्व दिवस आम्ही दमून गेलो होतो. इस्माईलदेखील कंटाळला होता. म्हणून नेहमीप्रमाणं आम्ही सरदारगृहात उतरलो. मी आंघोळ करून जरा आरामात पडलो. इस्माईल चेअरमन-साहेबांचं काम करायला बाहेर पडला. तो रात्री ९ वाजता आला. तो पुरा टाइट होऊन आला.

"साहेब," त्यानं झुलत मला हाक मारली.

"काय रे ?"

" माफ करा. "

" का रे ?"

" आम्ही शेण खाल्लंय्. "

" आम्ही ओळखलं. "

" रागावू नका. "

" रागावणार. "

" असं का ?"

" लेका, त्वा मला का आणली नाहीस ?"

" हात्तीच्या. आत्ता आणतो. " असं म्हणून तो निघाला.

" राहू दे आता. "

" आणतो की. सारा खर्च माझा. "

" नको बरं, गेल्याप्रमाणं साहेबांचं काम केलंस ?"

" हो. त्यानच मला मनस्ताप झाला. म्हणून मी खूप दारू प्यालो. मला साहेबांनी पाव्हण्यांकडं जा म्हणून सांगितलं. ते पाव्हणं म्हणजे कोण तुम्हाला माहीत आहे?"

" न्हाई. "

" चेअरमनसाहेबांची नवी औरत. "

" औरत असू नाही बायको असू, आपल्याला काय करायचं ?"

" हिथंच तुमचं चुकतं बघा...तुम्हास्नी कवा कवा कळत न्हाई, असं मी म्हंतो ते उगच नाही. "

" म्हणजे ?"

" आवं ती उषा चिटणीस !"




"कोण ? कुणाची ?"

"तुम्हास्नी म्हाईत नाही. बसा खाली सांगतो."

माझं कुतूहल जागृत झालं. त्याच्या म्हणण्याला मी मान दिला. त्यावर तो म्हणाला.

"अहो ! उषा चिटणीस म्हंजी माझी बाई."

"काय बकतोस ?"

"खरंच सांगतो. ह्या उषा चिटणीसचा आणि माझा गेली दहा-बारा वर्षे संबंध होता."

"अरे, पण तिचा नवरा होताना ?"

"होता की. तो नावाचा. पण ही बया कोंबडं डालल्यागत त्येला डालून बाहेर हिंडत होती. नगराध्यक्षाबरुबर हिचा संबंध हुता. त्या पाटील वकीलावरोबर फिरत हुती. आणखी एक पैलवान हुता."

"कमाल आहे."

"साहेब ! माझा पण त्यातच नंबर हुता."

"मग तो तसाच चालू राहील. तुझं बिघडलं काय ?"

"त्येच तुम्हास्नी कळंना."

"ते कसं ?"

"आवं तिनं आता साहेब ठेवला. माझी वळख इसारल्यागत करतीया."

"बरं झालं."

"पण आता ती माझी साहेबीण झालीया. मला अरेतुरे म्हणते. साहेबाला माझ्या चहाडद्या सांगू लागली. मुद्दाम हलकीसलकी कामं सांगते. साहेबदेखील कधी न चिडणारा माणूस माझ्यावर चिडू लागला. आता माझी खरी आडचण हाय. बोलावं तरी पंच्याती, न्हाई बोलावं तरी पंच्याती. ती माझा सूड घ्याला बघतीया."

"मग, मात्र पंचाईत आहे गड्या ?"

म्हणूनच म्या राजीनामा द्याचा निर्णय घेतलाय."

आम्ही परत आलो. त्यानंतर दुसरे दिवशी इस्माईल रजेवर गेला. तो परत आलाच नाही. पोस्टाने त्याचा राजीनामा आला आणि इस्माईलची कामं मी करू लागलो. इस्माईलचा स्वाभिमान मजजवळ नव्हता. तो का गेला हे मला माहीत होतं. पण सर्वांनाच ही अंदर की बात माहीत नव्हती.

□ □ □

# पुस्तके

# ॥ पैस ॥

## चिंतनशील प्रज्ञेचा भावमुग्ध अविष्कार

**निशिकांत मिरजकर**

सामान्यपणे स्वच्छनितळ विचारांचे आपल्याला वावडे असते. ती दृष्टीच आपल्यापाशी नसते. आपले अनुभव, आपल्या संवेदना आणि आपले संस्कार यांची ओळख करून घेण्याची रोकडी दृष्टी आपल्यापाशी नसते. त्यामुळे त्यांचा अविष्कार सहसा सहजमोकळा आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाशी खरे इमान राखणारा असा होत नाही. जडावाच्या रत्नांपेक्षा कोंदणेच फार होतात. दुर्गाबाईंचा 'पैस' हा या सगळ्याचा देखणा अपवाद आहे. प्रस्थापिताच्या कोरीव वाटेने आंधळी पावले न टाकता केलेली प्रस्थापिताची शुद्धसुंदर चिकित्सा, तरल स्वप्ने आणि रोखठोक वास्तव यांचा उत्कट संगम, भव्यता आणि नाजुकपणा यांचे परस्परांना खुलविणारे आकृतिबंध यांचा काव्यात्म गद्य आविष्कार म्हणजे 'पैस.' 'लेखन हे मला केव्हाच सोपे वाटलेले नाही. त्यातली माझ्या मनापुढे असलेली सिद्धी मला प्राप्तही झालेली नाही. जितकी मी झटते तितके थोडेसे लौकिक यश तेवढे मिळते. पण सिद्धी अधिकाधिक उंच जाते; ती अधिकाधिक खोल दडते.' असे दुर्गाबाई स्वतःच्या लेखनाबद्दल म्हणतात. अंतरंगाचा गाभा उलगडणारे 'पैस' मधले लेखन वाचल्यावर हा त्यांचा विनय आहे असे वाटून जाते; पण तसे नाही. उलट या भूमिकेतच दुर्गाबाईंच्या सदातरूण जिवंत लेखनशैलीचे रहस्य आहे असे मला वाटते. सिद्धीचे शिखर अधिकाधिक उंच जात राहिल्यानेच दुर्गाबाईंचे लेखन अधिकाधिक उंचउंच

बनत राहिले आहे. राहणार आहे. सिद्धी अधिकाधिक खोल दडल्यामुळे त्यांचे लेखन सतत तळाचा, ठाव धुंडाळणारे झाले आहे. वाहते राहिले आहे. त्याचा आकार कुठेच गोठलेला नाही.

दुर्गाबाईंचे मन मुळातले कविमन आहे. त्यांच्या संवेदना उत्कट आहेत. निसर्गाच्या रूपांशी आणि लहरींशी हळुवारपणे तन्मय होण्याची क्षमता त्यांच्या अनुभूतीत आहे. 'सुख सुख म्हणजे काय? असे मला कुणी विचारले तर वाऱ्याची झुळूक हळुवारपणे अधराला अनाहूत स्पर्श करते नि त्यात खेळते ते खरे सुख असे मी सांगेन.' अशी निसर्गातला एखादा क्षण अपार तन्मयतेने भोगण्याची त्यांची वृत्ती आहे. या तन्मयतेतूनच कधी त्यांचे मन विशाल जीवनाशय अनुभवते. पार्थिवातली अपार्थिवाची प्रतिबिंबे, मर्त्यामधले अमर्त्याचे कवडसे अशा मनाला दिसतात. रूप—रंग—आकारांनी मनाला वेध लावणारा निसर्ग पाहतापाहता प्रतिकात्मक बनून जातो. वास्तवाची भुलावण कायम ठेवूनही वास्तवाच्या पलिकडचे काही सांगत राहतो. गोमतीचे वाळवंट नि पलिकडचे विविध रंगांनी नटलेले स्वच्छ क्षितिज ('द्वारकेचा राणा'), चांदण्या रात्री यमुनेच्या नृत्याने सजीव केलेली कृष्णस्मृतीची रासक्रीडा ('यमुना-कालिंदी'), व्यवहाराची वस्त्रे दूर फेकून देऊन, नग्न होऊन झोपलेले जग आणि डोळे वटारून वटारून त्याच्याकडे पाहणारे ऊन ('डोंगरमाथ्यावर'), हे सगळे अनुभव या प्रकारचे आहेत. निसर्गाचे सौंदर्य टिपणारे नि पाहतापाहता त्यातून चिरंतनाशी भावनिक नाते जोडणारे. संवेदनांच्या हळव्या पावलांनी वास्तव आणि कल्पित यांच्या सीमारेषेवर वावरणारे.

## निसर्गाचे मानवीकरण

दुर्गाबाईंच्या अनुभवसृष्टीतला निसर्ग हा कचकड्याचा अथवा चित्रातला निसर्ग नाही याची साक्ष तर ओळीओळींनी साकारलेली. निसर्गातल्या विविध घटकांना स्वतःचे भावबंध असतात; त्यातून त्यांचे परस्परसंबंध निर्माण होतात; आणि दुर्गाबाईंना ते ठायीठायी जाणवतात." भयानक विरोध दाखवीत पूल तसाच हट्टीपणे उभा राहिला. गाडी मग त्याला तिथेच सोडीत शिस्तशीर गृहिणीप्रमाणे अलाहाबादच्या स्टेशनात शिरू लागली." ('नैनीच्या पुलावर')... "माती मोठी चिवट व लाघवी असते. वाड्याची ती माती निरनिराळ्या हाका मारून मला बोलवायची." ('पंढरीचा विठोबा')... "उन्हाळा, पावसाळा, नाहीतर हिवाळा असो. वारा सारखा डोंगरमाथ्याभोवती चकरा घालीत असतो. समलिंगीयांच्या प्रीतीसारखा त्याचा आवेग पिसाट असतो. दिशाहीन असतो."('डोंगरमाथ्यावर'). यासारख्या अनेक ठिकाणी निसर्गाचे असे मानवीकरण झालेले असते. हे मानवीकरण म्हणजे केवळ कल्पनाशक्तीचे कविकौशल्य नसते. एका संवेदनाशील मनाने घेतलेला तो खराखुरा उत्कट अनुभव असतो. दुर्गाबाईंचे मन आणि भोवतालचे वातावरण यांच्यातील ते सादपडसाद असतात.

## विलक्षण अनुभवांचे आलेख

सखोल चिंतनाने आणि विद्वज्जड परिशीलनाने काठोकाठ भरलेल्या दुर्गाबाईंच्या मनाला अपार विश्वातील नाना प्रकारच्या जाणिवा प्रत्ययास येताना दिसतात. एका अर्थाने हे जड प्रज्ञेचे भावमुग्ध रूप असते. विचाराच्या गंभीर क्षेत्रातल्या कितीतरी गोष्टी त्या प्रत्यक्षात हळवेपणाने अनुभवतात. जे अनाकलनीय असते, त्याला आकळू पाहतात. पुन्हा हे सगळे नेटक्या शब्दांत साकार करू शकतात. ज्ञानोबाचा खांब पाहिल्यावर महाशून्याच्या पैसाची व आकाशातीत अवकाशाची प्रतिमा त्यांच्या मनात पुंजाळते. वाळूच्या कणांचे विकट, विराट मृत्युतांडव पाहून त्या भयविस्मित होतात. मरणाची लाट यावी नि ती अशीच कुरळत्या मऊशीतल स्पर्शाने आपल्या समग्र अस्तित्वाला कायमचे शून्य करून जावी असा एक अप्राप्य वाढता ध्यास कालिंदी त्यांच्या मनात तयार करते. चर्चमध्ये त्या गुडघे टेकून प्रार्थना करू लागतात आणि 'सारे संप्रदाय दूर सरले आणि मी व विश्व यांच्यातल्या संबंधाची पृच्छा करणारे निराळेच मन शांतपणे, चौकसपणे विचारोन्मुख झाले. वर्तमान बाजूला गेला. गतकाल आणि भावी काल यांच्याबद्दलचे कल्पनातरंग विचार स्पष्ट होऊ देईनात. शिल्पे मला भूतकाळाकडे ओढीत होती, तर क्रूसाची चमक भविष्याकडे नेत होती. कल्पनांवर कल्पना आल्या नि गेल्या. हळूहळू त्या शिल्पांची दाटी इतकी गर्द झाली की त्यांच्यातले सौंदर्य फिके झाले. अगदी मामुली झाले. इतर पुतळ्यांच्या समूहात ही शिल्पे स्थिरावली. मंदिराच्या उंच साध्या भिंती आणखीच साध्या झाल्या. आता फक्त राहिल्या त्या भिंती, तो क्रूस व मी. तो क्रूस आता एक जिवंत प्रतीक बनला. त्यात नैतिक संवेदना असलेल्या ख्रिस्ताची सत्य पाहण्याची ओढ, आंतरिक सौंदर्य निर्माण करण्याचा अट्टाहास, ध्येयपूर्तीसाठी प्राणत्याग करण्याचा निर्धार आणि त्या सर्वांना पुरून उरणारे ते विशाल प्रेमाचे आवरण मला भासमान झाले. त्या भासाचा क्षण एवढासाच होता; पण त्याने मी भयभीत झाले, विस्मित झाले.' असा विलक्षण अनुभव त्यांना येतो. एका क्षणाचा परिघ जणू विश्वाला व्यापण्याइतका विस्तारत जातो. या अनुभवाला आणि त्याच्या आविष्काराला एक-ठाय लय असते. चिऱ्यावर चिरा ठेवून कमान रचावी तसे हे शब्दशिल्प आकार घेत राहते. 'डोंगरमाथ्यावर' आणि 'ऊनपारखी' हे दोन लेख म्हणजे अशा विलक्षण अनुभवांचे आलेखन आहे. बौद्धांच्या स्मशानलेण्यांनी दिलेली क्षणाच्या बीजात फुटणाऱ्या अमर जीवनांकुरांची विराट प्रतीती आणि चैत्रातल्या कडक उन्हातून सुरू होऊन जीवन, ध्यान आणि मरण यांच्या गंभीर आवर्तनात घेरून टाकणारा कैलासाच्या विराट रूपाचा थरकवणारा प्रत्यय, येथे दुर्गाबाईंच्या लेखणीने साकार केला आहे. हे दोन्ही अनुभव खरेपणाच्या उत्कट बैठकीवर ठामपणे उभे आहेत. कल्पिताची झगमग त्यांनी ल्यायिलेली नाही. सगळ्या घटकांचे एकसूत्री नाते त्यात सहज

गुंफले गेले आहे. शिळेशिळेत पडलेल्या फटा, घिरट्या घालणारी वाघळे, झडणारे सांगाडे पाठीमागे धावत येऊन मुक्याने दरडवणारा नंदी, या सगळ्या प्रतिमा जिवंत आणि आवाहक आहेत. निराळ्या पातळीवरच्या अनुभूतीची संवेदनाचित्रे रेखणाऱ्या आहेत. जीवनसत्याचे विविध अर्थ एकत्रित सांगणाऱ्या आहेत.

## अर्थवाही भाषा

या पुस्तकाच्या प्रारंभी दिलेल्या 'स्वच्छंद' चिंतनात कितीतरी साहित्यप्रबंध सहजपणे बद्ध झालेले आहेत. बीजरूपाने. पण विचार करायला लावणारे. स्वतंत्रपणाची नवी दिशा सांगणारे. दुर्गाबाईंचा 'पैस' हा त्यांचाच सुंदर कलात्मक आविष्कार आहे.

दुर्गाबाईंची भाषा मोठी अर्थवाही आहे. सहजपणे जाताजाता ती विचारांचे होन सांडत जाते. 'या टेकूचे टेकूपण अभंग आहे. कलेने ते शबलित केलेले नाही.' असे विधान त्या ज्ञानोबाच्या विनकुसरीच्या खांबासंबंधी करतात आणि बेगडी कारागिरी व ऐतिहासिक प्रतीकात्मता यांच्यातील विरोधाचा लक्ष्यभेद करतात. पंढरीच्या विठोबासंबंधी आत्मनिष्ठ सहजसंवाद करताना भावना, तत्त्वज्ञान व अभ्यास यांच्या समन्वयातून मार्मिक वेगळेपणाचे दर्शन घडवितात. प्रतिमा व प्रतीके यांच्या तळाशी बुडी घेऊन अनुभवाचा गाळ शिपतात. दुर्गाबाईंची वर्णने म्हणजे वस्तुनिष्ठ रूपांचा आत्मनिष्ठ प्रत्यय असतो. तपशीलांचे बारकावे उभे करीत त्यातून स्वतःला येणाऱ्या आगळ्या प्रत्ययाचा आलेख त्या कुशलतेने मांडत जातात. त्यामुळे वर्ण्य विषयांचे आणि लेखिकेचे व्यक्तिमत्व परस्परात प्रतिबिंबित होते. कधी माणसामाणसांतले अनोखे नाट्य त्या सहृदयतेने उभे करतात आणि तत्त्वज्ञान, विचार, निसर्ग व माणसे यांचे गुंताडणारे संघर्ष साकार करतात, तर कधी अगदी व्यावहारिक साधेपणाने प्रत्येकाच्या हृदयाला स्वतःचेच वाटणारे गूज सांगून टाकतात. लोककथांची टिपणी जितक्या जागरूक आत्मीयतेने करतात, तितक्याच संवेद्यतेने विशिष्टपणाचे स्वतःला जाणवणारे अर्थानुवाद व्यक्त करतात. पुराणे नि देवता, बुद्ध नि ख्रिस्त, जीवन आणि मरण या सगळ्याशी त्यांचे भावार्त नाते जडते. एक भावसंपन्न अनुभवविश्व तयार होते. 'पैस' म्हणजे या भावसंपन्न अनुभवविश्वातले सहजपणे लोभावणारे, कमळाच्या पाकळ्यांप्रमाणे उलगडत जाणारे आकार आहेत. एका चिंतनशील मनाचा हा भावमुग्ध आविष्कार आहे. विद्वत्ता आणि रसिकता, निरीक्षण आणि चिंतन, निसर्ग आणि भावना यांचा हा एकसंध आकृतीबंध आहे. पण अशा जोड्या तरी कशाला करायच्या? इथे आहे तो सगळ्यालाच व्यापणारा 'पैस'

( पैस – दुर्गा भागवत – मौज प्रकाशन – मूल्य साडेदहा रुपये – पृष्ठे १४४)

□ □ □

अरुण
साधू

लेखांक
दोन




शांततामय, लोकशाही मार्गाने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची दारे जेव्हा बंद होतात, तेव्हाच अन्यायाची चीड असणारे ध्येयनिष्ठ तरुण दुसरे मार्ग शोधू लागतात. आणि दुसरा मार्ग म्हणजे बंदुकीची नळी.

या नव्या विचारांच्या लाटा क्यूबन द्वीपकल्पावर वाहू लागल्या असतानाच क्यूबन क्षितीजावर फिडेल कास्ट्रोचा उदय झाला.



विद्यार्थी नेता
फिडेल कास्ट्रो

एका सुखवस्तू साखर–जमीनदाराच्या पोटी फिडेल कास्ट्रोचा १३ ऑगस्ट १९२६ रोजी क्यूबामधील ओरियेन्ते या प्रांतात बिरान येथे जन्म झाला. त्याचे वडील अँजेल कास्ट्रो स्पेनमध्ये शेतमजूर होते. १८९८ मध्ये स्पॅनिश सैन्याबरोबर क्यूबन स्वातंत्र्य युद्धाला तोंड देण्यासाठी म्हणून ते क्यूबात आले आणि युद्ध संपल्यावर तिथेच स्थायिक होण्याचे त्यांनी ठरविले.

सुरुवातीला अँजेल कास्ट्रो यांनी एका मोठ्या अमेरिकन कंपनीत सुपरवायझर म्हणून काम केले. साखर, फळे आणि इतर शेतीमालाचे उत्पादन व व्यापार करणारी ही कंपनी होती. पुढे त्यांनी स्वतःची जमीन खरेदी केली आणि तेव्हापासून त्यांचे उत्पन्न वाढले. फिडेलचा जन्म होईपर्यंत ते चांगले पैसेवाले जमीनदार झाले होते.

अँजेल कास्ट्रो यांना पहिल्या पत्नीपासून एक मुलगी व मुलगा अशी दोन अपत्ये झाली. ती मेल्यावर दुसरी पत्नी लीना रुझ. ही त्यांची सैंयपाकीण होती. तिचे पूर्वज स्पॅनिशच. हिच्यापासून सात अपत्ये–चार मुली आणि तीन मुलगे–झाली. फिडेल हा अपत्यांमध्ये चौथा आणि मुलग्यांमध्ये दुसरा. पण फिडेलचा जन्म होई-

पर्यंत त्याच्या आईबापांनी अधिकृतपणे विवाह केलेला नव्हता. फिडेल झाल्यावर लगेच त्यांनी लग्न करून टाकले. त्यांच्या एकूण आठ भावंडांपैकी त्याचा धाकटा भाऊ राऊल कास्ट्रो याने फिडेलला सतत साथ दिलेली आहे.

फिडेलला आपल्या बापाबद्दल फारसे प्रेम नव्हते. उलट थोडा तिरस्कारच होता. अँजेल कास्ट्रो हे श्रीमंत जमीनदार होते आणि इतर जमीनदारांप्रमाणेच तेही कामगारांची बेफाम पिळवणूक करीत. अँजेल स्वत:कष्ट उपसणारे होते. पण ते चिक्कू होते. बेरकी होते. अनेक हिकमती लढवून त्यांनी ओरियेन्ते प्रांतात सुमारे २३,३०० एकर जमीन मिळविली होती. त्यांना फिडेल आणि राऊल यांच्या चळवळी पसंत असणे शक्यच नव्हते. जमिनीवरील कर ते मुळीच भरीत नव्हते; आणि फिडेल तर आपल्या बापाला प्रतिगामी समजत होता. फिडेलला आणि राऊलला आपल्या जमिनीविषयी आणि संपत्तीविषयी फारसे प्रेम नव्हते. फिडेलने पुढे जेव्हा उसाचे मळे जाळून टाकण्याची चळवळ सुरू केली तेव्हा पहिल्यांदा आपल्या घराण्याचे मळे जाळले. त्याचे वडील १९५६ मध्ये वारले.

अँजेल कास्ट्रो यांचे स्वत:चे शालेय शिक्षण झाले नव्हते आणि आपल्या मुलांनाही शिक्षण देण्याची गरज त्यांना वाटत नव्हती. परंतु फिडेलला शिक्षणाची लहानपणापासून आवड- सहा-सात वर्षांचा असतानाच फिडेलने शाळेत जाण्याचा वडिलाजवळ हट्ट धरला, असे सांगतात की बापाने जेव्हा नकार दिला तेव्हा फिडेलने घर जाळून टाकण्याची धमकी दिली. मनात येईल ते करणारे हे पोरगं आहे हे अँजेलना माहिती होते. घाबरून त्यांनी पोराला शाळेत पाठविले. ही आठवण फिडेलनेच स्वत: सांगितली आहे. बंडखोरपणाची ज्योत बाळपणापासूनच त्याच्या शरीरात धगधगत होती असे दिसते.

फिडेलला सांत्यागोच्या एका जेसुईट शाळेत पाठविण्यात आले. सांत्यागोला एका घरी राहण्याची त्याची व्यवस्था करण्यात आली. घरची मंडळी इरसाल होती. फिडेलला खायला देखील भरपूर देत नसत. फिडेलच्या मागोमाग त्याचा धाकटा भाऊही शाळेत आला. शाळेतले स्पॅनिश जेसुईट्स् अन्न वाटप करताना भेदभाव करतात म्हणून फिडेलने एकदा जेवण्याच्या हॉलमध्ये संप केला होता. त्याचा परिणाम म्हणून त्याला आणि त्याच्या भावाला काही दिवस उपाशी ठेवण्याची शिक्षा झाली.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर फिडेलने आपल्या आईची मनधरणी करून वयाच्या सोळाव्या वर्षी क्युबाची राजधानी हॅवाना येथे उच्च शालेय व विद्यापीठीय शिक्षणासाठी जाण्याची परवानगी घेतली. कॉलेजमध्ये त्याचे विषय होते शेती, स्पॅनिश आणि इतिहास. शाळेत आणि कॉलेजमध्ये फिडेल हुशार मुलात गणला जात होता. तो उत्कृष्ट जलतरणपटू होता. धावण्याच्या स्पर्धेत त्याचा नेहमी पहिला नंबर असे. बास्केटबॉलमध्येही त्याचा हातखंडा होता. १९४४ साली शाळेचा

उत्कृष्ट क्रीडापटू म्हणून त्याची निवड झाली होती. पुढचेच वर्षी तो पदवीधर झाला. त्याच्या शाळेच्या शेरे-बुकात लिहिले आहे : 'भाषा व साहित्याच्या सर्व क्षेत्रात फिडेल हुशार आहे. त्याचे रेकॉर्ड उत्कृष्ट आहे. तो खरा खिलाडू वृत्तीचा आहे. सर्व स्पर्धामध्ये त्याने शाळेचा ध्वज अभिमानपूर्वक उंच ठेवला. सर्वांची मने कशी जिंकावीत आणि प्रेम कसे संपादन करावे हे त्याला चांगले ठाऊक आहे. कायद्याच्या क्षेत्रात तो पदार्पण करील आणि तेथे चांगले नाव काढून आपल्या आयुष्यातील अनेक पाने सुवर्णाक्षरांनी भरून काढील यात शंका नाही. त्याचे शरीर आणि मन पोलादी बांधणीचे आहे. त्याचे अभिनयपटुत्वही आयुष्यात चांगली साथ देईल–"

फिडेलविषयी त्याच्या शिक्षकांनी सांगितलेले भविष्य बऱ्याच प्रमाणात खरे ठरले. त्यांनी सांगितले होते की फिडेल वकिलीचा व्यवसाय पत्करेल. परंतु त्याने पत्करला क्रांतिकारकाचा पेशा. हॅवाना विद्यापीठात क्रांतिकार्याचे अभ्यासक्रम नव्हते. म्हणून त्याने विद्यापीठाच्या कायदा विभागात १९४५ आपले नाव दाखल केले एवढेच.

## हॅवान विद्यापीठात प्रवेश

हॅवाना विद्यापीठात क्रांतिकार्याचे अधिकृत अभ्यासक्रम नव्हते हे जरी खरे असले तरी त्याकाळी ते विद्यापीठ म्हणजे जहाल क्रांतिकारकांचा एक मोठा अड्डाच बनले होते. त्या काळात लॅटिन अमेरिकन देशातील सर्वच् विद्यापीठे असंतुष्ट, संतप्त तरुणांच्या वेगवेगळया विचारांच्या गटांची केन्द्रे बनलेली होती. विद्यापीठांमध्ये राजकारणाचा वरचष्मा होता. विद्यार्थ्यांच्या विविध संघटना म्हणजे वेगवेगळया राजकीय पक्षांचे गटच होते. विद्यापीठात प्रवेश करताच तरूण, बंडखोर फिडेल कास्ट्रोने आपल्या भावासह आणि सर्व गुण-वैशिष्टयांसह उडी घेतली. त्यावेळचे राजकारण आणि सामाजिक व्यवस्थाच अशी झाली होती की संवेदनाक्षम वृत्तीच्या जागरूक तरुणांना आणि विद्यार्थ्यांना राजकीय प्रवाह अपरिहार्यपणे खेचून घेत होते.

फिडेल कास्ट्रोने विद्यापीठात प्रवेश केला तेव्हा तो बेफाट शारीरिक ताकदीचा, भरभक्कम बांध्याचा, उंचापुरा असा हुशार आणि संवेदनाक्षम तरुण होता. मूळचा वृत्तीने बंडखोर–आणि बेडर. मनातल्या विचारांना मूर्त रुप देण्यासाठी धडपडणारा. आपल्या मनाप्रमाणे जग वाकविण्याची आकांक्षा धरणारा. प्रचलित सामाजिक आणि आर्थिक विषमतेविषयी संताप बाळगणारा आणि आदर्शवादाचे वेड डोक्यात घेतलेला. आवतीभोवती सर्वत्र बंडखोरीचे वारे वाहत असताना असा तरुण राजकारणात ओढला गेला नसता तरच नवल.

फिडेल कास्ट्रो हॅवाना विद्यापीठात गेला त्यावेळपर्यंत क्यूबन अर्थकारणावर आणि राजकारणावर अमेरिकेचा वरचष्मा पूर्णतया पक्का झाला होता. १८६८ ते १८९८ च्या क्रांतीची विफलता क्यूबन जनतेला आता अधिक तीव्रतेने जाणवू लागली होती.

खरे म्हणजे १८९८ साली जेव्हा अमेरिकेने क्यूबात हस्तक्षेप केला तेव्हाच क्यूबन द्वीपकल्प अमेरिकन संघराज्यास जोडून घेतले जाण्याची बऱ्याच युरोपियन राष्ट्रात अपेक्षा होती. एवढे महत्त्व संरक्षण दृष्ट्या क्यूबाचे होते. अमेरिकेच्या दक्षिण किनाऱ्यापासून हे बेट अवघे ९० मैलावर आग्नेयेला आहे. मधल्या निमुळत्या मार्गातूनच पनामा कालव्याचा आणि दक्षिण अमेरिकेचा दोन–तृतियांश सागरी व्यापार चालतो. अशा स्थितीत क्यूबा अगदी हातात आले असतानाही जोडून न घेणे हा अमेरिकेचा खरे म्हणजे मोठेपणा होता. पण मागेच सांगितल्याप्रमाणे अमेरिकेत व्यापाऱ्यांनी-आणि उद्योगपतींनी अशी परिस्थिती निर्माण केली की यापेक्षा क्यूबा अमेरिकेस संलग्न झाला असता तर बरे असे म्हणण्याची पाळी यावी.

## मचाडोची कारकीर्द

क्यूबाचा पहिला अध्यक्ष एक एस्त्रादा पामा तेवढा गरीबीत मेला. बाकीच्यांनी भ्रष्टाचाराला रान मोकळे सोडले. १९२४ ते १९२८ दरम्यान आलेला अध्यक्ष गेरादो मचाडो याने तर कमालच केली. मचाडोचे अनेक कंपन्यांमध्ये शेअर्स होते. गादीवर आल्यावर त्याने दडपशाहीचे सत्रच आरंभले. त्याच्याविरुद्ध बोलणारा, लिहिणारा वा त्याच्या स्वच्छतेविषयी संशय घेणारा हमखास कधीतरी कुठेतरी गोळी लागून रहस्यमय रीतीने मरून पडलेला आढळायचा. त्याची राजवट नुसतीच भ्रष्टाचारी नव्हती तर अत्यंत क्रूर होती. त्याच्या क्रूरपणाच्या गोष्टीवर अमेरिकनांचा विश्वास बसत नव्हता इतका तो निर्घृण होता.

अमेरिकन आणि क्यूबन भांडवलदारांचा मचाडोला भक्कम पाठिंबा होता. कारण तो त्यांचे हितसंबंध चांगलेच जपत होता. दरम्यान स्वतःचेही पोट फुटेल एवढा पैसा खात होता आणि विरोधी राजकीय पक्षीयांनाही चारीत होता. त्याने एक लॉटरी सुरू केली. लॉटरीतिकीटांचे एजंट्स् ठरविण्याचे अधिकार त्याच्याच हाती होते. लॉटरीपासून एजंटांना भरपूर नफा मिळत असे. मचाडोही ताकद वापरून सर्व राजकीय पक्षांना आपल्या खिशात ठेवी. या एजंटापासून प्रेमाखातर स्वतः मचाडोला जे कमिशन मिळे त्याचा आकडा वर्षाला तीस लाख डॉलर्सच्या आसपास जात असे.

अध्यक्षपदाची मुदत संपल्यावर मचाडो पुन्हा दुसऱ्यांदा त्या पदासाठी उभा राहिला, अनेक हिकमती करून, धाक दाखवून, धमक्या देऊन पैसे वाटून त्याने दुसरा कुणीही या निवडणुकीस उभा राहणार नाही अशी व्यवस्था केली आणि बिनविरोध निवडून आला.

गादीवर आल्यावर मचाडोने आपल्या अध्यक्षपदाची मुदत सहा वर्षेपर्यंत वाढवून घेतली आणि भयानक दडपशाहीचे सत्रच आरंभिले. विरोधाचे सर्व आवाज दाबण्यात आले, भाषण आणि लिखाण स्वातंत्र्यावर निर्बंध घातले आणि हॅवाना विद्यापीठ बंद करून टाकले. एरवी वेळोवेळी हस्तक्षेपाची भाषा बोलणारे अमेरिकन

सरकार मूग गिळून बसले. अमेरिकन भांडवलदार तर उघडपणे मचाडोची तरफदारी करीत होते.

क्यूबन जनतेची प्रतिक्रिया तीव्र होती. धुमसणाऱ्या असंतोषाला विद्यार्थ्यांच्या आणि कामगारांच्या उठावाच्या स्वरूपात १९३१ साली तोंड फुटले, हे उठाव क्रूरपणे दडपून टाकण्यात आले. त्याच सुमारास एका खटल्यात क्यूबाच्या सुप्रीम कोर्टाने मचाडोची राजवट बेकायदेशीर म्हणून निकाल दिला. त्यावर उत्तर म्हणून मचाडोने कोर्टात अपिले करण्याचा लोकांचा हक्कच रद्द केला आणि आपल्या गुप्त पोलीसांकरवी सर्वच बंडखोरांना ठार मारून टाकण्याचे सत्र आरंभले. क्यूबन क्रांतिकारक गटांना अमेरिकन वृत्तपत्रे प्रसिद्धी देऊ लागली तेव्हा त्यांच्यावर त्याने निर्बंध घातले.

अशा रीतीने क्यूबामधील परिस्थिती चिघळत असताना अमेरिकन सरकार स्वस्थ बसून राहिले. पण १९३३ मध्ये जेव्हा अमेरिकन भांडवलालाच धोका पोचतो आहे असे ध्यानात येऊ लागले तेव्हा क्यूबन सरकार आणि बंडखोर यांच्यात समझोता घडवून आणण्यासाठी अमेरिकन राजदूताला अधिकार देण्यात आले. क्यूबात स्थैर्य राखण्यासाठी मचाडोच अध्यक्षपदी असणे आवश्यक आहे असे हा राजदूत पुन्हा पुन्हा पटवून देत असतानाच सबंध क्यूबात एक प्रचंड सार्वत्रिक संप सुरू झाला. कामगारांनी साखर कारखाने ताब्यात घेण्यास सुरुवात केली. पोलीसांनी हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांना आणि कामगारांना ठार मारले. शेवटी क्यूबन लष्करालाही परिस्थिती असह्य झाली तेव्हा त्यानेही मचाडोला अध्यक्षपदावरून खेचण्याची मागणी केली.

आता माघार घेण्यावाचून मचाडोला गत्यंतर नव्हते. कोटयावधी डॉलर्स आपल्या बरोबर घेऊन, क्यूबामधील आपल्या संपत्तीवरील हक्क कायम राखून मचाडोने आपल्या कुटुंबासह अमेरिकेला ऑगस्ट १९३१ मध्ये प्रयाण केले.

## बाटीस्टाचा उठाव

त्यानंतरचा एक महिना गोंधळात गेला. तात्पुरत्या अध्यक्षपदी आलेल्या उमेदवाराला कुणी जुमानीतच नव्हते. सर्व बाजूंचे दबाव त्याच्यावर येत होते. आर्थिक परिस्थिती अधिकच खालावत चालली होती. या अराजकाचा फायदा घेऊन सैन्यातल्या काही नॉन-कमिशन्ड अधिकाऱ्यांनी काही जहाल तरुण गटांच्या मदतीने एक लहानसा उठाव घडवून आणला आणि ५ सप्टेंबर १९३३ रोजी सत्ता ताब्यात घेतली. या कनिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचा नेता होता सार्जंट फुल्जेन्शो बाटीस्टा. बाटीस्टाने जहाल तरुणांचा लोकप्रिय नेता ममोन ग्राव सान-मार्टीन याला अध्यक्षपदी बसविले.

ग्राव उणेपुरे चार महिने गादीवर टिकला कारण एकतर त्याच्या सरकारला अमेरिकेने मान्यताच दिली नाही आणि दुसरे म्हणजे ग्रावचे जहाल विचार बास्टीस्टाला नापसंत होते. शेवटी ग्राव जेव्हा अमेरिकन कंपन्यांविरुद्ध पावले टाकू

लागला तेव्हा बाटीस्टाने आणि त्यावेळच्या अमेरिकन राजदूताने त्याच्यावर दडपण आणून त्याला १५ जानेवारी १९३४ रोजी राजीनामा देण्यास भाग पाडले.

यापुढे क्यूबातील सर्व राजकारणाची सूत्रे बाटीस्टाने आपल्या हाती ठेवली. सैन्यामधल्या या साध्या सार्जंटने पडद्याआडून क्यूबातल्या अध्यक्षांच्या बाहुल्या हलविल्या. १९३६ मध्ये बाटीस्टाने खुद्द स्वतःच्या हाती सत्ता घेतली. अमेरिकन सरकारचा त्याला ताबडतोब पाठिंबा मिळाला. १९३३ च्या उठावानंतर त्याने स्वतःला कर्नल बनवून सर्व सैन्याचा सेनापती बनवून घेतले होते. आता तो जनरल झाला.

सुरुवातीला जरी बाटीस्टाने कामगारांची आणि जहाल तरुणांची मते आपल्याकडे वळविण्यासाठी त्यांना सहानुभूती दाखविण्याचा पवित्रा घेतला, तरी त्याचा कल अमेरिकन भांडवलदारांकडेच आहे हे स्पष्ट झाले होते. त्यानेही दडपशाहीची परंपरा पुढेच चालविली. १९४० च्या निवडणुकीत कम्युनिस्टांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्याने त्या पक्षाला मान्यता दिली आणि त्यांच्या मतांच्या जोरावर आपल्या अध्यक्षपदाचा मार्ग सुरक्षित करून घेतला. बाटीस्टाने क्यूबासाठी एक घटनाही तयार करून घेतली. चार वर्षात त्याने भरपूर कमाई केली.

## एक आश्चर्यकारक घटना

१९४४ साली क्यूबाच्या इतिहासात एक आश्चर्यकारक घटना घडली. अमेरिकेच्या दबावाखाली आणि आपल्याला सर्व लष्कराचा पाठिंबा आहे या आत्मविश्वासाने बाटीस्टाने पुन्हा निवडणुका घेतल्या आणि यावेळच्या निवडणुका व्यवस्थित झाल्या. डॉ. रमोन ग्राव सान मार्टीन अध्यक्ष म्हणून निवडून आला आणि बाटीस्टाने क्यूबाला काही काळ राम राम ठोकला.

ग्राव १९४८ पर्यंत अध्यक्ष राहिला. तो क्यूबन क्रांतिकारी पक्षाचा होता. व्यक्तिशः तो प्रामाणिक होता पण भोवतालच्या भ्रष्टाचारावर आणि अनागोंदी कारभारावर तो नियंत्रण ठेवू शकला नाही. अराजक वाढतच राहिले. त्याच्यानंतर येणारा त्याच पक्षाचा प्रियो सोकारास हा अधिकच भ्रष्टाचारी निघाला. सर्व तऱ्हेच्या भ्रष्टाचाराला त्याच्या राज्यात मोकळे रान होते. बाटीस्टा आणि मचाडोप्रमाणेच याचेही कोट्यावधी डॉलर्स अमेरिकन बँकांत साचले होते. १९५२ सालच्या निवडणुका जवळ आल्या तेव्हा बाटीस्टा क्यूबात परतला आणि आपण अध्यक्षपदासाठी उभे राहणार असल्याचे त्याने घोषित केले. गेल्या आठ वर्षात त्याचे क्यूबन लष्करावरील वर्चस्व कायम होते आणि क्यूबन व अमेरिकन भांडवलदारांवरील पकडही कमी झाली नव्हती.

अध्यक्षपदासाठी तीन प्रमुख उमेदवार होते. प्रियोच्याच पक्षाचा कारलो हेविया, बाटीस्टा आणि नुकतीच स्थापना झालेल्या ओर्टोडोक्सो पार्टीचा रॉबर्टो अग्रामोन्टे.

नव्या ओर्टोडोक्सो पार्टीने सरकारी भ्रष्टाचाराविरोधी एक प्रचंड मोहीम आखली होती. क्यूबातील कुप्रसिद्ध द्यूतगृहे, भ्रष्टाचारी लॉटरी आणि इतर अनेक

गलिच्छ प्रकार वेशीवर टांगण्याचे सत्रच या पक्षाने चालविले होते. त्यांच्या प्रचारातून कुणी मोकळे सुटत नव्हते. त्यामुळे सबंध क्यूबन जनतेची सहानुभूती हळूहळू या पक्षाकडे वळू लागली होती. ओर्टोडोक्सो पक्षाचा एक लोकप्रिय नेता एडुओर्डो छिवास दर रविवारी टेलीव्हिजनवर राजकीय कार्यक्रम सादर करीत असे. त्यात तो राजकीय भ्रष्टाचाराची चिरफाड करून सरकारी कारभारावर अत्यंत कठोर टीका करीत असे. बाटीस्टा परत राजकारणात उतरत आहे हे बघून त्याने एवढी हाय खाल्ली, की एके दिवशी टेलीव्हिजनवरचा कार्यक्रम लाखो प्रेक्षक बघत असतानाच त्याने नाट्यमय रीतीने आत्महत्या करून घेतली. त्यामुळे तर ओर्टोडोक्सो पार्टीचे निवडणुकीमधील चान्सेस अधिकच वाढले. याच पक्षातर्फे काँग्रेससाठी उभा असलेला एक उमेदवार होता एक तरुण वकील, ' फिडेल कास्ट्रो. निवडणुकीच्या तीन महिने आधी एक चाचणी मतांची अजमावणी घेण्यात आली. त्यात असे आढळून आले, की अध्यक्षपदासाठी सगळचात जास्ती चान्सेस होते ओर्टोडोक्सो पक्षाच्या अग्रामोन्टेला. दुसरा क्रमांक लागत होता हेविया याचा आणि बाटीस्टा तिसरा.

पण या निवडणुकी कधीच व्हायच्या नव्हत्या. मार्च १०, १९५२ रोजी अगदी पहाटे दोन वाजून चाळीस मिनिटांनी बाटीस्टा आपल्या काही साथीदारांसह क्यूबामधील सैन्याचे मुख्य ठाणे हॅवानाजवळील कँप कोलंबिया, येथे शिरला. बंदुकीची एकही गोळी न झाडता त्याने ठाण्यावर कबजा मिळविला. बारा तासांच्या आत त्याने प्रियो सोकारासला पदभ्रष्ट केले आणि स्वत: क्यूबाचा सर्व सत्ताधीश बनला.

बाटीस्टाने १९४० ची घटना स्थगित केली. सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रीत केली. सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली. शक्य त्या सर्व राजकीय नेत्यांवर पैशांचे, बंदुकींचे किंवा फटक्यांचे प्रयोग करून आपल्या जाळचात ओढले आणि या शतकातील क्यूबन इतिहासातील एक अत्यंत क्रूर, लांच्छनास्पद कालखंड सुरू झाला. आपल्या विरोधात एकही सूर उमटणार नाही याचा पक्का बंदोबस्त करायचे बाटीस्टाने ठरवून टाकले.

बाटीस्टाच्या १९५२ च्या या लष्करी उठावाला अमेरिकन सरकारचा पाठिंबा होता असा आरोप आहे. एवढेच नव्हे तर अमेरिकेच्या मदतीने आणि सल्ल्यानेच त्याने हे पाऊल उचलले असे बोलले जाते. याला पुरावा काही नाही. पण पुढे बाटीस्टाने जे निर्लज्ज अमेरिका-धार्जिणे धोरण स्वीकारले त्यावरून या संशयाला दुजोरा मिळतो. अमेरिकन भांडवलदार आणि अमेरिकन राजदूत बाटीस्टावर बेफाम खूष असत. एका अमेरिकन टेलीफोन कंपनीला बाटीस्टाने दर वाढवून देऊन एवढा फायदा करून दिला, की त्या कंपनीने बाटीस्टाला संपूर्ण सोन्याचा एक भक्कम टेलीफोन भेट म्हणून दिला.

पार्क – डेव्हीसचा

# त्रिविध फायदे देणारा

# निको साबण

## इतर कोणत्याहि साबणापेक्षा तुमच्या त्वचेची अधिक काळजी घेतो

1 निको जंतूंचा नाश करतो

2 निको शरीराचा घामटपणा घालवितो


3 निको कातडी निर्मळ करून तिचे रक्षण करतो

निकोनें केलेले स्नान म्हणजे आरोग्यमान, नितळ कांतिकरिता घेतलेली परमावधीची काळजी! निकोच्या जंतुनाशक फेसामुळे कातडीवरील जंतूंचा नाश होतो आणि तिचे आरोग्य राखले जाते. निकोच्या औषधी गुणधर्मामुळें शरीराचा घामटपणा व दुर्गंधी दूर होतात. निकोच्या प्रभावी जंतुनाशक क्रियेमुळे कातडीच्या साधारण रोगांपासून रक्षण होते व त्वचा निर्मळ धुतली जाऊन ती तजेलदार, कांतिमान व टवटवीत होते. निको पुटकुळ्या व घामोळें यापासूनही रक्षण करतो. निकोच्या नियमित वापराने डोक्यांतील खवड्यापासून बचाव होतो. तुमच्या कातडीचा तजेलदारपणा व आरोग्य राखण्यासाठीं त्रिविध फायदे देणाऱ्या निकोचा वापर आजच सुरू करा.

TRIPLE ACTION

**NEKO®**

The Original Antiseptic Soap




PARKE-DAVIS

**निकोची संवय लावून घ्या**

**आपल्या त्वचेसाठीं तो आवश्यक आहे**

Regd. Trade Mark Regd. Users—Parke Davis (India) Ltd., Bombay-72 AS.

JAISONS

अमेरिकन राजदूत आणि भांडवलदार बाटीस्टाची इतकी मुक्त कंठाने स्तुती करीत, की स्वत: बाटीस्टालाही शरम वाटावी. एकदा तर अमेरिकन राजदूत गार्डनर याच्याबद्दल बाटीस्टा जाहीरपणे म्हणाला, 'अँबॅसेडर गार्डनर यांना माझी राजवट पसंत आहे याचा मला आनंद आहे. पण त्यांनी त्याविषयी इतक्या थरावर जाऊन बोलायला नको.'

खरी परिस्थिती अशी होती की, बाटीस्टाला खूष ठेवून किंवा मलीदा चारून अमेरिकन राजदूत आणि भांडवलदार जास्तीत जास्त फायदा उपटण्याचा प्रयत्न करीत होते.

## अर्ल स्मिथ म्हणतो....

बाटीस्टाच्या राजवटीतला शेवटचा अमेरिकन राजदूत अर्ल ई. टी. स्मिथ याने पुढे १९६० मध्ये एक निवेदन केले. त्यावेळच्या राजकीय परिस्थितीचे यापेक्षा दुसरे बोलके निदर्शन देता येणार नाही.

स्मिथ म्हणतो, 'कास्ट्रोची क्रांती होईपर्यंत अमेरिकेचा क्यूबावर प्रचंड प्रभाव होता. अमेरिकन राजदूत ही क्यूबामधली नंबर दोनची महत्त्वाची व्यक्ती होती. कधी कधी तर क्यूबन अध्यक्षापेक्षाही अमेरिकन राजदूताचे महत्त्व अधिक होते –'

बाटीस्टाची क्यूबावरील लष्करी आणि पोलिसी पकड इतकी घट्ट होती की, त्याची राजवट शांततामय मार्गाने बदलणे केवळ अशक्यच बाब वाटत होती. फिडेल कास्ट्रोच्या क्रांतीनंतर वॉशिंग्टननेदेखील ही वस्तुस्थिती मान्य केली होती. अमेरिकन व्हाईट हाऊसला १९६१ मध्ये सादर केलेल्या एका श्वेत पत्रिकेत म्हटले आहे–

– क्यूबामधील बाटीस्टाच्या राजवटीचे स्वरूपच असे होते की, त्याची हिंसक प्रतिक्रीया होणे अपरिहार्य होते. राजकीय नेत्यांचे अत्याचार, सरकारचे भ्रष्टाचार, पोलीसांच्या निर्घृणपणा, शिक्षण, वैद्यकीय सोयी, घरे, सामाजिक न्याय आणि आर्थिक संधी याबाबतीतील लोकांच्या अपेक्षांकडे सरकारचे पूर्णतया दुर्लक्ष होते. ही परिस्थिती म्हणजे क्रांतीला उघड उघड आमंत्रण होते –

एक अमेरिकन इतिहास लेखक थिओडोर ड्रेपर याने तर असे म्हटले आहे की क्यूबन क्रांतीला खरा जबाबदार कोण असेल तर बाटीस्टाच. त्याने स्वतःच आपला खड्डा खणला आणि कास्ट्रोला वाट करून दिली. क्यूबन क्रांतीमधील प्रमुख व्यक्ती कास्ट्रो नसून बाटीस्टाच होय. वगैरे. अर्थात हे मत एकांगी आहे. मचाडोच्या काळात अशीच परिस्थिती होती. पण तेव्हा कोणी कास्ट्रो पुढे आला नाही. कारण क्रांतीला कास्ट्रोसारखेच जबरदस्त व्यक्तिमत्त्वही आवश्यक असते.

बाटीस्टाच्या उठावामुळे फिडेल कास्ट्रोला काही तरी जबरदस्त कृती करण्याचे निमित्त मिळाले. पण त्या काळात असंतुष्ट तरुणांच्या गटांची संख्या जरी भरपूर असली तरी राजवट उलथवून टाकण्याची महत्त्वाकांक्षा धरणारे फारच कमी

असतील. बहुसंख्य क्यूबन लोक सहनशीलतेने बाटीस्टाच्या अत्याचारापुढे मान तुकवून होते. आणि दैवावर भरवसा ठेवून होते.

या लष्करी उठावाविषयी जोरदार संताप वाटणारी, त्याविषयी काहीतरी करावेसे वाटणारी आणि ते करून दाखविण्याची जिद्द आणि नेतृत्वाचे गुण असणारी एकचव्यक्ती होती. ती म्हणजे फिडेल कास्ट्रो.

प्रचलित समाजपद्धती, प्रस्थापित राज्यव्यवस्था आणि भ्रष्टाचार व त्यातून निर्माण होणारे बाटीस्टासारखे हुकूमशाह यांच्याविरुद्ध लढण्याची तयारी फिडेल त्याच्या विद्यापीठीय जीवनापासूनच करीत होता. परकीयांच्या ताब्यात गेलेली अर्थव्यवस्था, उत्पन्नामधील भयाण विषमता आणि वाढती बेकारी यांविरुद्ध तो लढत होता. शेकडो वर्षे स्पॅनिश राजवटीविरुद्ध क्यूबनांच्या हृदयात असलेला बंडखोरीचा वारसा अमेरिकन आर्थिक वर्चस्वाविरुद्ध तो चालवीत होता. क्रांतीची ज्योत त्याच्याही छातीत तेवत होती. बाटीस्टा असो वा नसो, क्रांतीला योग्य परिस्थिती क्यूबात केव्हापासूनच निर्माण झाली होती. फक्त आता योग्य नेतृत्वाची गरज होती. कास्ट्रोने ती गरज भागविली.

## पहिले अपयश

क्रांतीचे पहिले धडे कास्ट्रोने हॅवाना विद्यापीठातच घेतले. विद्यापीठात त्याने १९४५ साली प्रवेश केला. आणि दोन वर्षांतच त्याने आपल्या भोवती बरेच अनुयायी उभे केले. डोमिनिकन रिपब्लीकमधील जनरल त्रुजिल्लो याची लष्करी राजवट उलथून पाडण्याची एक जोरदार चळवळ त्यावेळी सबंध लॅटिन अमेरिकेतील तरुणात चालू होती. त्यातही कास्ट्रोने आपल्या सर्व शक्तीनिशी भाग घेतला. बंडखोरांच्या एका गटाने बोटीतून जाऊन डोमिनिकन रिपब्लीकच्या किनाऱ्यावर उतरून सशस्त्र उठाव घडवून आणण्याचा बेत आखला होता. त्या देशातून हद्दपार झालेला डोमिनिकन जनरल जुआन रॉड्रिग्ज हा सर्व खर्च देणार होता. ही १९४७ ची गोष्ट. त्यावेळी क्यूबाचा अध्यक्ष होता ग्राव. ओरियेन्ते प्रांतात फिडेलच्या या गटाची अशी तयारी चालू असताना ग्रावने तिकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले.

पण या कटाची वार्ता कशीतरी बाहेर पडली आणि डोमिनिकन सरकारने बंडखोरांना पाठिंबा देण्याचा आरोप ग्राववर केला. तोवर अमेरिकेनेही दबाव आणून बंडखोरांना दडपून टाकण्याचा सल्ला ग्रावला दिला.

ग्रावने डोळे उघडले तेव्हा ओरियेन्ते प्रांतातील नाईपच्या उपसागरात डोमिनिकनच्या दिशेने सशस्त्र बंडखोरांनी भरलेल्या तीन बोटी निघाल्याही होत्या. एका बोटीत एका सब-मशीनगनसह फिडेल कास्ट्रो होता. प्रकरण फारच हाताबाहेर गेले आहे असे बघून ग्रावनेआपले आरमार बाहेर काढले आणि बोटी मधल्या मधे अडविल्या. फिडेलने अटक टाळण्यासाठी आपल्या मशीनगनसह बोटीतून समुद्रात उडी टाकली आणि पोहत पोहत किनारा गाठला.

फिडेलचे हे पहिले राजकीय अपयश. पुढे येणाऱ्या अनेक अपयशांप्रमाणेच फिडे-

ल्लने हेही पचविले. आणि अधिकच कडवेपणाने आणि निष्ठेने त्याने क्रांतिकार्याला स्वत:ला वाहून घेतले.

हॅवाना विद्यापीठात विद्यार्थ्यांमधील मतभेदांमुळे कास्ट्रोला खिशात पिस्तूल घेऊनच हिंडावे लागे. मारामाऱ्या, खून, चाकू हल्ले हा तेव्हाच्या क्यूबन राजकारणाचा अविभाज्य भाग होता. आयुष्याला काही किंमतच उरली नव्हती. पाहता पाहता खून पडत. त्यामुळे फिडेलला स्वसंरक्षणासाठी जपून वागावे लागे. कारण तो तेथील कायदा शाखेतील विद्यार्थ्यांच्या संघटनेचा अध्यक्ष झाला होता.

## दुसरा लढा

डोमिनिकन रिपब्लीकवरील फसलेल्या हल्ल्याच्या धाडसानंतर एक वर्षभरात फिडेल दुसऱ्या एका क्रांतीसदृश लढ्यात ओढला गेला. ऑक्टोबर १९४८ मध्ये लॅटिन अमेरिकेतील कोलंबियामध्ये बोगोटा येथे पान–अमेरिकन युनियनची कॉन्फरन्स होती. त्याच सुमारास बोगोटा येथेच वसाहतवाद व साम्राज्यवाद विरोधी एक विद्यार्थी परिषद तेथेच भरविण्यात आली होती. फिडेल कास्ट्रो आणि त्याचे सहकारी विद्यार्थी क्यूबन प्रतिनिधी म्हणून या विद्यार्थी परिषदेला हजर होते. पान–अमेरिकन युनियनच्या साम्राज्यवादी धोरणाविरुद्ध प्रचार करणे हाही या परिषदेचा एक प्रमुख उद्देश होता. आणि त्या युनियनवर बहिष्कार टाकण्यास सभासदांना प्रवृत्त करणे हाही विद्यार्थ्यांचा विचार होता.

परिषदेच्या आधीच अमेरिका विरोधी पत्रके वाटली म्हणून फिडेल कास्ट्रोला आणि त्याच्या सहकाऱ्यांना बोगोटाच्या एका भागातून हाकून लावण्यात आले. कोलंबियात तेव्हा तीन मतप्रवाह होते. प्रस्थापित व्यवस्थावादी, सुधारणावादी आणि कम्युनिस्ट. सरकार पहिल्या मतप्रवाहाचे होते. पण सुधारणावाद्यांनी सुद्धा पान-अमेरिकन कॉन्फरस उधळून लावण्याच्या विद्यार्थ्यांच्या बेताचा निषेध केला. सुधारणावाद्यांचा नेता होता जॉर्ज गैतान. निषेध करूनही विद्यार्थ्यांच्या परिषदेला चर्चेसाठी येण्याचे आमंत्रण गैतानने स्वीकारले. पण या परिषदेला येत असतानाच वाटेत गोळी झाडून त्याचा खून झाला. आजूबाजूच्या लोकांनी गैतानच्या मारेकऱ्याला तिथल्या तिथेच धरले आणि इतके बेदम मारले की तो जागच्या जागी ठार झाला.

गैतानच्या खुनाची वार्ता पसरताच बोगोटामधील सुधारणावादी विद्यार्थी पेटले. हाती शस्त्रास्त्रे घेऊन त्यांनी पान-अमेरिकन कॉन्फरन्स जेथे भरली होती त्या इमारतीलाच आग लावून दिली. शहरभर बंडखोर विद्यार्थ्यांनी लुटालुटीचे आणि जाळपोळीचे सत्र आरंभिले. या सुधारणावादी विद्यार्थ्यांबरोबरच फिडेल कास्ट्रो होता. विद्यार्थ्यांचे नेतृत्व करून त्यांना काबूत आणण्याचा त्याने प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश आले नाही.

दरम्यान कम्युनिस्ट विद्यार्थ्यांची संघटना वेगाने कामास लागली. बंडखोरीचा फायदा घेऊन त्यांनी रस्तोरस्ती कर्ण्यातून 'क्रांती सफल' झाल्याची घोषणा केली. एवढेच नव्हे तर जवळच्याच एका द्वीपावरील गव्हर्नरच्या राजवाड्यावर कम्यु-

निस्टांचे विळाकोयत्याचे लाल निशाणही चढले. कम्युनिस्ट एका बाजूला आणि सुधारणावादी दुसऱ्या अशी परिस्थिती होती. कोलंबियन सैन्य नुसते हात चोळीत स्वस्थ बसले होते. कारण त्यांना काही सूचना नव्हत्या.

प्रकरण हाताबाहेर जायच्या आत कोलंबियन अध्यक्षांनी सुधारणावादी नेत्यांना वाटाघाटीसाठी पाचारण केले आणि झटपट समझोता करून परिस्थिती आटोक्यात आणली. विद्यार्थ्यांच्या मागे पोलीस लागले. फिडेलला आणि त्याच्या साथीदारांना क्यूबन वकीलातीत आश्रय घ्यावा लागला. आणि दुसरे दिवशी गुरे वाहून नेणाऱ्या एका विमानातून गुप्तपणे क्यूबात पळून जावे लागले.

कास्ट्रोचे शत्रू असे आरोप करतात की विद्यार्थ्यांना पेटविण्यासाठी गैतानचा खून त्यानेच घडवून आणला. पण हे खरे नाही. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी कोलंबियन सरकारने स्कॉटलंड यार्डचे गुप्त पोलीस आणवले होते. त्यांनाही या आरोपात तथ्य वाटले नाही. शिवाय कम्युनिस्ट काहीतरी गडबड करणार आहेत हे गैताननेच आधी सांगून ठेवले होते.

## विवाह....घटस्फोट

बोगोटा प्रकरणानंतर सहा महिन्यात, म्हणजे बारा ऑक्टोबर १९४८ रोजी फिडेलने विद्यापीठातलीच एक विद्यार्थीनी मिर्था डायस बलार्ट हिच्याशी विवाह केला. मिर्थाच्या आईवडिलांची या लग्नाला मुळीच संमती नव्हती. कारण तिचा बाप आणि मोठा भाऊ, दोघेही सरकारी नोकरीत बड्या हुद्यांवर होते. आणि फिडेल तर एक चळवळ्या, बंडखोर क्रांतीकारक. पण प्रेमापुढे इलाज नाही. त्या दोघांना वर्षभरात एक मुलगा झाला. पुढे फिडेलचे आणि मिर्थाचे संबंध बिघडले. फिडेल तुरुंगात असताना मिर्था भावाकडून पैसे घेऊ लागली. हे जेव्हा बाटीस्टाच्या एका मंत्र्यास कळले तेव्हा फिडेलच्या बायकोला नियमितपणे सरकारी पैसे मिळतात असे त्याने जाहीर करून टाकले. फिडेलला चांगलाच धक्का बसला. पुढे मिर्थाने घटस्फोट घेतला. मुलगा नंतर फिडेलकडे आला. क्रांतिकारी आणि चळवळ्या पुरुषाच्या नशिबी विवाहसुख नसते हेच खरे.

१९५० मध्ये फिडेलला कायद्याची पदवी मिळाली. तोवर त्याने एक उत्कृष्ट वक्ता म्हणून चांगलीच प्रसिद्धी मिळविली होती. जगातल्या अत्युत्कृष्ठ वक्त्यांपैकी फिडेल एक मानला जातो. आपल्या भाषणाने तासन् तास तो श्रोत्यांना खिळवून ठेवतो. उपहास, टिंगल, राग, द्वेष, आवेश, कारुण्य, विनोद यांचे बेमालूम मिश्रण त्याच्या भाषणांमध्ये असते. फिडेलच्या चुंबकीय व्यक्तित्वाबरोबरच त्याच्या वक्तृत्वानेही भारावून त्याला अनुयायी मिळतात.

आपल्या असामान्य वक्तृत्वाच्या जोरावर फिडेल वकिलीमध्ये अमाप पैसा मिळवू शकला असता. पण त्याला वकिली करायचीच नव्हती. केवळ राजकीय खटलेच त्याने काही काळ लढविले. तेही फारसे पैसे न घेता. आपल्या वकिली ज्ञानाचा उत्कृष्ट उपयोग त्याने मोंकाडा खटल्याच्या वेळी करून घेतला.

[ पृष्ट ५२ वर ]

# हरे कृष्ण हरे राम....!

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

माणूस या जगात किती काळ जगेल ?—माणूस नाहीसा झाला तर तो कशामुळे नाहीसा होईल ? माणूस खरोखरच अवतार समाप्तिच्या वाटेने वाटचाल करतो आहे का ?

शास्त्रज्ञ काय वाटेल त्या विषयावर संशोधन करतात. संशोधनाचे विषय विचित्र असतात. संशोधनासाठी होणारा प्रयोगही अनेकदा विलक्षण असतो. डॉ. जे. सी. कॅलहाडस हा खरा जीवशास्त्राचा प्राध्यापक, पण त्याच्या घरात नको ती गोष्ट घडली. त्याचा तरुण मुलगा प्रथम बिटल बनला.. नंतर तो 'हरे कृष्ण' पंथात सामील झाला. त्याच वेळी कॅलहाडसच्या लक्षात एक गोष्ट आली. त्याच्या मुलाचे अनेक तरुण मित्रही असेच अँग्री यंग मॅनसारखे अमेरिकेभर भटकताहेत. या साऱ्या तरुण पिढीला कसल्यातरी भयंकर मानसिक रोगानी पछाडलय ! कॅलहाडसला एक प्रश्न पडला. रोमची प्रगत आणि समृद्ध संस्कृती एका अनाकलनीय मार्गाने जाऊन नामशेष झाली. वीसाव्या शतकातला प्रगत माणूसही असाच प्रचंड गतीने सर्वनाशाकडे ओढला जातोय का ?--या प्रश्नाचे उत्तर शोधायला कॅलहाडस गेला. आपल्या प्रयोगशाळेतल्या उंदरांच्यावर त्याने एक मजेशीर प्रयोग केला.

कॅलहाडसने आठ निरोगी उंदीर घेतले. त्या उंदरांना त्याने १०० चौरस फूटाच्या एका पिंजऱ्यात ठेवले. त्या पिंजऱ्याचे तपमान उंदरांना आवडेल इतके उबदार ठेवलेले होते. त्या पिंजऱ्यात उंदरांना आवडेल असे मुबलक अन्न आणि थंडगार पाणी ठेवलेले होते. त्या पिंजऱ्यात ना दगदग, ना चिंता, ना त्रास, त्या आठ उंदरांचा जीवनक्रम अगदी मजेत सुरू झाला. यथाकाल त्या उंदरांना मुले झाली. नातू झाले, पणतू झाले. तीन वर्षात त्या पिंजऱ्यातील उंदरांची संख्या झाली सोळाशे ! पण शास्त्रीय भाषेत बोलावयाचे तर ते सोळाशे उंदीर आता उंदीर उरलेच नव्हते. ते उरले होते फक्त मांसाचे जीवंत गोळे ! आईवडिलांना लहान पिल्लांची ओढ नव्हती. लहान पिल्लांना मोठ्या उदरांचा धाक नव्हता. आपापसातील भांडणे

आणि प्रेम सारे काही केव्हाच संपलेले होते. त्या उंदरांची संख्या चोवीसशे झाली त्या वेळी तर एक चमत्कार झाला. त्यानंतर जन्माला येणाऱ्या कोणत्याही उंदराच्या मनात लैंगिक आकर्षणच उरले नाही. त्या तरुण उंदरांच्या मनाला कसली तरी उदासीनता वेढून बसली. शारीरिक दृष्ट्या ते उंदीर निरोगी आणि समर्थ होते. पण जननशक्तीसाठी लागणारे मानसिक सामर्थ्य ते उंदीर गमावून बसले होते. त्या चोवीसशे उंदरांची ती वसाहत या वर्षाअखेर नामशेष झालेली असेल. कारण जननशक्ती गमावून बसलेले त्या तरुण पिढीतले शेवटचे उंदीर या वर्षाअखेर या जगाचा निरोप घेतील.

खरे पाहता उंदरांचा हा प्रयोग माणसांना लागू होईलच असे नाही. पुन्हा येवढ्या एका एकाकी प्रयोगावरून काही फार मोठे अनुमान काढणेही धोक्याचे असते. कॅल्हाउसचे या प्रयोग मालिकेतील काही नवे प्रयोगही आता सुरू झाले

## कोंबडे झाकू नका...

भारतातल्या कोणत्याही वृत्तपत्राने ही बातमी छापली नाही. सहा महिन्यापूर्वीची गोष्ट. रशियातल्या नामवंत शास्त्रज्ञांना कॅनडामध्ये भाषणासाठी बोलावण्यात आले होते. हे शास्त्रज्ञ फार सफाईदारपणे इंग्रजीत बोलताना पाहून अनेक अमेरिकन शास्त्रज्ञांना आश्चर्य वाटले. त्यांनी त्या रशियन शास्त्रज्ञांना प्रश्न विचारला, इ. स. २००१ मध्ये शास्त्रीय जगात विचार विनिमयासाठी कोणती भाषा वापरली जाईल? त्यावर रशियन शास्त्रज्ञ म्हणाले, "अणुविज्ञान, अवकाश प्रवास या अनेक क्षेत्रांत रशिया आज आघाडीवर आहे. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन या देशात मिळून जेवढे लोक विज्ञान क्षेत्रात संशोधन करतात त्यांच्या चौपट लोक आज रशियात, या क्षेत्रात काम करतात. इ. स. २००१ मध्ये शास्त्रीय जगाची भाषा रशियन असेल अशी कल्पना म्हणून करून घेऊ नका! आम्ही नुकतेच चीनमध्ये गेलो होतो. चीन ज्या गतीने विज्ञानक्षेत्रात काम करतो आहे तो वेग फार मोठा आहे. आजच आपणा–सर्वांपेक्षा दुप्पटीने अधिक चीनी लोक विज्ञान क्षेत्रात आहेत. चीन हा वेग कमी करणार नाही. त्यातून २००१ मध्ये चीनची लोकसंख्या शंभर कोटी असेल. त्या वेळी चीनमध्ये किती तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ असतील याचा नुसता वरवरचा हिशोब केलात तरी तुमचा प्रश्न तुम्ही मला विचारला नसता. इ. स. २००१ मध्ये विज्ञानक्षेत्राची भाषा रशियन वा इंग्रजी नसेल तर चिनी असेल!"

––भारतीय वृत्तपत्रांनी ही बातमी न छापल्याने आपला खरोखरच काही फायदा झाला का?

आहेत. पण कॅलहाडस मात्र स्वतः पुरते असे काही अनुमान काढून आत्ताच मोकळा झाला आहे. तो म्हणतो, "माझ्या प्रयोगातील उंदरांपेक्षा वेगळे भवितव्य माणसालाही नसेल. इ. स. २०४२च्या सुमारास पृथ्वीवरील माणूसही कदाचित् याच मार्गाने नामशेष होईल–कारण मानव चिवट आहे. खूप खूप चिवट आहे. हिरोशिमा नागासकीसारख्या अणुयुद्धात तो जीवंत राहिला. व्हिएतनाममधील अग्नीप्रलयातून तो अधिक ताकदवान होऊन बाहेर पडेल. ज्याच्यासाठी वेडेपिसे व्हावे, अस्वस्थ व्हावे, सर्वस्व झुगारून त्याच्यामागे बेहोशीत धावावे असे अव्हान जोवर समोर आहे तोवर माणूस माणूस म्हणून ताठ मानेने या जगात उभा असेल. मात्र जीवनात जेव्हा फार मोठी सुखासीनता आणि वैपुल्य येईल, समोरची आव्हाने संपतील, जीवनकलह थांबेल तेव्हा अगदी नकळत माझ्या प्रयोगातीलउंदरांप्रम ाणेच मानवजातही या जगाचा निरोप घेईल. ☐

## अपोलो सोळा

"जगातल्या कोणत्याही कॅमेऱ्याला तुझे सौंदर्य टिपता येणार नाही. खरं सांगू, या फोटोतल्यापेक्षा प्रत्यक्षात तू खूप सुंदर दिसतेस!"––प्रेमात पडलेली माणसे काय वाटेल ते बोलतात. अपोलो सोळामधील आपल्या चांद्रवीरांचे बहुधा असेच काहीसे झाले असावे. कारण गेल्या आठवड्यात अमेरिकन पत्रकारांना या चांद्रवीरांनी चंद्रावर टिपलेले फोटो व चलत् चित्रे दाखविली. हे फोटो खरोखरच, अत्युकृष्ठ होते. अप्रतीम होते. मात्र आपण चंद्रावर जे काही अवर्णनीय सौंदर्य पाहिले त्याचा शंभरावा भागही यात टिपलेला नाही असा दावा चांद्रवीरांनी केला! अमेरिकन शास्त्रज्ञांनी मात्र भावनात्मक वेड अशा शब्दात चांद्रवीरांचे हे म्हणणे उडवून लावले. कदाचित् चंद्रावरच्या वातावरणात माणसाच्या मनाचा तोल थोडासा बिघडून माणूस अधिक भावनाप्रधान बनत असेल!

हा प्रेमात पडण्याचा काव्यात्म प्रकार थोडा बाजूला ठेवला तर अपोलो सोळांनी खालील वैज्ञानिक कामगिरी पार पाडली.

(१) अपोलो पंधरामधील प्रवाशांच्या हृदयावर बराच ताण पडला होता. हा त्रास शरीरातील पोटॅशिअम् संपल्याचा परिणाम असावा या कल्पनेने अपोलो सोळामधील प्रवाशांच्या जेवणामध्ये मोठ्या प्रमाणात पोटॅशिअम मिसळलेले होते. या बदललेल्या रेशनचा योग्य तो उपयोग झाला. यापुढील अपोलो प्रवाशांना अशाच स्वरूपाचे अन्न आता खावे लागेल. अपोलो सोळामधील चांद्रस्थाने कल्पनेपेक्षाही अधिक यशस्वी कामगिरी पार पाडली. चंद्रपृष्ठावरील खाचखळगे न जुमानता जलद गतीने प्रवास करावयास अपोलो सतरामध्येही आता सर्वस्वी अशाच स्वरूपाचे चांद्रयान ठेवले जाईल.

१० जून १९७२

(२) चंद्रावरच्या प्राचीन उंचवटयाचे (Ancient High Land) चुंबकीय क्षेत्र हे चंद्रावरच्या समुद्रापेक्षा (Lowlying Lunar Seas) पाच ते दहा पटीने अधिक आहे याची अपोलोने खात्री करून घेतली. या माहितीवरून डॉ. पामर डायॉल यांनी खालील अनुमाने काढली. (अ) चंद्राच्या बालपणी चंद्राचे चुंबकीय क्षेत्र आजच्यापेक्षा अनेक पटीने अधिक होते. (ब) द्रवरूप चंद्राचे घनीकरण फार झपाटयाने झाले. (क) पृथ्वीप्रमाणेच चंद्राच्या अंतरंगात त्याच्या मध्यबिंदूभोवती द्रवरूप धातू साठवलेला आहे. पृथ्वी वा चंद्र स्वतःच्या आसाभोवती फिरत असताना या द्रवरूप धातूवर जे ताण पडतात, त्यामुळे पृथ्वी वा चंद्र यांच्या पृष्ठभागावर चुंबकीय क्षेत्रे निर्माण होतात.

(३) अपोलो सोळाने आणलेला एक दगड आत्तापर्यंतच्या अपोलोनी आणलेल्या दगडादेक्षा पाच ते दहा पट अधिक किरणोत्सर्गी आहे. या दगडाच्या अस्तीत्वाबद्दलचे कोणतेही स्पष्टीकरण शास्त्रज्ञ आज देऊ शकत नाहीत आणि यावेळी गोळा केलेल्या सर्वच दगडांनी शास्त्रज्ञांचा पूर्ण अपेक्षाभंग केला आहे. अपोलो सोळा ज्या के. ले. प्लेन्श या विभागात उतरले होते त्या विभागातील दगड हे ज्वालामुखीपासून बनलेले असणार याबद्दल शास्त्रज्ञांची खात्री होती. पण हे दगड सर्वस्वी वेगळया स्वरूपाचे आहेत. अॅल्युमनियमसारखे हलके धातूही या दगडात मोठया प्रमाणात मिसळलेले आहेत.—या दगडामुळे चंद्राचा 'भू गोल' शास्त्रज्ञांना बदलावा लागेल. पण या कामाला अजून खूप दिवस लागतील, कारण अपोलो सोळाने आणलेल्या २१३ पौंड दगडापैकी फक्त दहा पौंड दगडाचे शास्त्रज्ञांनी आत्तापर्यंत पृथःकरण केले आहे. □ □ □

---

## फिडेल, चे आणि क्रांती....

पृष्ठ ४८ वरून

त्याचवेळी छिबास याची ओर्टोडोक्सो पार्टी पुढे येत होती. फिडेल त्या पक्षाचा सभासद बनला. पण अध्यक्षीय निवडणुकींच्या आधीच बाटीस्टाचा उठाव झाला.

बाटीस्टाने सत्ता हाती घेतल्यावर फिडेलने त्याच्याविरूद्ध कोर्टात अर्ज केला. बाटीस्टाने घटनेची पायमल्ली केल्याने घटनेच्याच तरतुदीनुसार त्याला शंभर वर्षांची शिक्षा व्हावी असा त्याचा अर्ज होता. अर्ज अर्थातच फेटाळला गेला.

क्यूबन जनतेला बाटीस्टाच्या राजवटीचा पूर्वीचा अनुभव होताच. पुढे काय वाढून ठेवले आहे याची दुश्चिन्हे दिसत होतीच. लोकशाही मार्गाला तर बाटीस्टानेच धाब्यावर बसविले होते. कायद्याचाही मार्ग बंद झाला होता.

अशा परिस्थितीत कोणता ध्येयवेडा बंडखोर तरुण काळा डगला अंगावर चढवून वकिली करीत आयुष्याची महत्वाची वर्षे फुकट घालवील ?

(क्रमशः)

# हयवदन

## गिरीश कर्नाड यांचे नवे नाटक

पुष्पा भावे

'थिएटर युनिट' व 'अनिकेत' या संस्थांनी श्री. गिरीश कर्नाड यांच्या 'हयवदन' या मूळ कन्नड नाटकाचा हिंदी अवतार सादर केला. [या नाटकाला 'शांतता ! कोर्ट..' सारखे कमलादेवी चट्टोपाध्याय पारितोषिक मिळाले आहे.] मुंबईकर रसिकांना श्री. कर्नाड यांच्या 'ययाति,' 'तुघलक' या नाटकांचा परिचय झालेला आहे. 'माणूस'च्या वाचकांनाही वरील दोन्ही नाटकातील श्री. कर्नाड यांच्या आगळ्या नाट्यव्यक्तिमत्त्वाची ओळख मी करून दिलेली आहे. नाटककार म्हणून श्री. कर्नाड यांची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील : त्यातील चटकन् जाणवणारे वैशिष्ट्य हे, की ते आपल्या नाटकासाठी छोटे कथाबीज निवडून त्याचा अनेकरीतीने आविष्कार घडविण्याचा यत्न करतात. हा आविष्कार घडवीत असताना नाटक हे दृश्यश्राव्य माध्यम आहे याचे नेमके भान त्यांना असते; त्यामुळे त्यांच्या नाटकाच्या रचनेमध्ये नाट्य शब्दाचे दास्यत्व कधीही पत्करत नाही. [कानडी भाषा व वाङ्मयाशी परिचय असलेल्या व्यक्तींच्या मनात कदाचित एक शंका निर्माण होईल. श्री. कर्नाड यांची भाषा फार औपचारिक व संस्कृतप्रचुर आहे म्हणून ते पौराणिक विषय निवडतात, असेही एक मत प्रतिपादन केले जाते. या जड भाषेचा व दृश्यमाध्यमाला प्राधान्य देण्याचा मेळ कसा घालावयाचा या प्रश्नाचे उत्तर मी देऊ शकणार नाही कारण माझ्यासमोर आहेत इंग्रजी, मराठी वा हिंदी भाषांतरे आणि त्या भाषांतरांचे प्रयोग पाहताना ही अडचण निर्माण होते असे मला वाटत नाही.]

'हयवदन' हे श्री. कर्नाड यांचे नवे नाटक लवचिक बांधणीचे, लोकनाट्याच्या सुटसुटीत स्वरूपाचा वापर करणारे आहे. 'हयवदन' हे शीर्षक ज्यामुळे निर्माण झाले त्या अश्वमुखी माणसाच्या कथेची योजना नाटककाराने एखाद्या दृश्यधृपदासारखी केली आहे. पुराणातील विचित्र मानव-पशु आकृतींचे उल्लेख हे केवळ उत्क्रांतिच्या अभ्यासकांनाच लक्षणीय वाटावेत असे नाहीत. विशेषत: आजच्या मनोविश्लेषणात्मक साहित्यकृतीमध्ये, या विलक्षण वाटणाऱ्या पुराणकथांचा प्रतिमा-

त्मक वापर करण्याचा कल दिसतो. अश्व हा आधुनिक मानसशास्त्रामध्येच मानवाच्या पार्थिवतेचे समर्थ प्रतीक म्हणून वापरला आहे असे नाही; संस्कृत वाङ्मयाविषयी झालेल्या नव्या संशोधनातूनही (डॉ. डांगी यांनी अश्वमेधाच्या संस्काराचा केलेला नवा विचार) अश्वाचे प्रतीकात्मक स्वरूप उभे राहाते. हे लक्षात घेता शरीर स्वभाव व संस्कारित स्वभाव या शाश्वत द्वंद्वावर आधारलेले नाटक 'हयवदन' हे शीर्षक घेऊन का येते ते स्पष्ट व्हावे. पण या शीर्षकामागचा श्री. कर्नाड यांचा विचार केवळ चिंतनात्मक नसून त्याला नाटयात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. नाटकाच्या प्रारंभी हयवदनाने येऊन आपली कथा सांगणे, या कथेत अश्वारूढ पुरुषापेक्षा अश्वाच्या देखणेपणाच्या प्रभावाचा असलेला महत्त्वाचा उल्लेख, हयवदनाच्या जन्माची कथा, त्याने संपूर्ण मनुष्यत्वासाठी प्रयत्न करणे आणि नाटकाच्या शेवटी त्याचा संपूर्ण अश्व होणे—त्याची मनुष्यवाणी नष्ट होणे, या सूत्राचा आणि नाटकातील देवदत्त, कपिल, पद्मिनी यांच्या कथेचा अर्थपूर्ण संबंध नाटककाराने प्रस्थापित केला आहे. परंतु तसे करताना या दोन्ही सूत्रांमधील दुवे कोठेही अनाटयात्मक जडपणे जोडलेले नाहीत.

## द्विसूत्री कथानक

नाटकाच्या प्रारंभी हयवदन आपले मनुष्यत्व मिळविण्यासाठी कालीमातेकडे जातो आणि रंगमंचावर देवदत्त (श्री. अमोल पालेकर) व कपिल (श्री. अमरेश पुरी) हे दोन मित्र आपल्याला दिसतात. देवदत्त शरीराने दुबळा, काव्यात रममाण झालेला आहे, तर कपिलच्या पीळदार शरीरातून पार्थिव जीवनाचा उत्साह ओसंडून जातो आहे. मानवी व्यक्तिमत्त्वाची दोन रूपे असणारे हे मित्र जीवाला जीव देणारे आहेत. देवदत्त एका रूपवती स्त्रीच्या दर्शनाने विव्हल झालेला आहे. कपिल त्याचा दूत होऊन पद्मिनीचा शोध घेत येतो. पद्मिनी (सौ. सुनीला प्रधान) आणि कपिल यांच्या पहिल्या चकमकीतूनच देवदत्ताच्या मनातील प्रियेपेक्षा पद्मिनी वेगळी आहे हे प्रेक्षकांच्या आणि कपिलच्याही ध्यानात येते. भागवताकरवी (सूत्रधार) मंगलाष्टके म्हणून पुढील सारे एका क्षणात नाटककाराने सुचविले आहे. देवदत्त व पद्मिनी यांच्या पहिल्याच प्रवेशात लक्षात येते, की मातीची घडलेली पद्मिनी कपिलच्या देहाचे आकर्षण बाजूला सारू शकत नाही. अत्यंत वेगाने घडणाऱ्या पुढील कथानकामध्ये देवदत्ताला पद्मिनीच्या मनाचा कल उमजतो व तो कालीमातेपुढे आपले मस्तक धडावेगळे करतो. मित्रप्रेमाने विद्ध झालेला कपिलही त्याचे अनुकरण करतो. या दोघांच्या विरहाने व्याकुळ झालेल्या परंतु स्वतःचा स्वार्थ न झाकणाऱ्या पद्मिनीवर कालीमाता (दीना पाठक) प्रसन्न होते आणि दोघांनाही प्राणदान देते. कालीमातेने सांगितल्याप्रमाणे कपिल व देवदत्त यांची मस्तके धडावर लावताना पद्मिनी अदलाबदल करते. देवदत्ताला कपिलचे पीळदार शरीर लाभते तर कपिलला देवदत्ताचे दुबळे शरीर लाभते. काय झाले हे लक्षात येताच या दोन मित्रांची प्रतिक्रिया आनंदाची असते. पण घरी परतायची वेळ येते तेव्हा पद्मिनी कोणाची हा यक्षप्रश्न निर्माण होतो. ज्या शरीराशी नाते जोडले ते शरीर कपिलपाशी तर

मानवी व्यक्तिमत्त्वाचे उत्तमांग मानले गेलेले शीर देवदत्तापाशी. अर्थातच ऋषींचा न्याय देवदत्ताच्या बाजूचा असतो. पद्मिनीच्या दैहिक आकर्षणाचा विजय होतो. परंतु जसजसे दिवस जातात तसतसे देवदत्ताचे शरीर दुबळे होते व कपिलचे पूर्ववत दणकट होते. शेवटी ज्याच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्याचे शरीर आकार घेते. तेव्हा पद्मिनीची निराशा होते. पूर्ववत् झालेल्या कपिलकडे ती येते; देवदत्त तिचा शोध काढीत येतो. या दोघांचे एका मादीसाठी वन्यपशूंप्रमाणे द्वंद्वयुद्ध होते. त्या दोघांच्या मृत्यूनंतर पद्मिनी सती जाते. तिचा मुलगा रानात वाढतो आणि एका नटावरोबर सुत्रधाराकडे परततो. त्याचवेळी संपूर्ण मनुष्य होण्याऐवजी संपूर्ण अश्व झालेला हयवदन तिथे येतो. हयवदनाला अश्वाचे खिंकाळणे लाभते तर त्या छोटचा मुलाला त्याचे हरवलेले हास्य लाभते.

या द्विसूत्री कथेचा नाटचात्मक अविष्कार श्री. कर्नाड यांनी अत्यंत चाणाक्षपणे केला आहे. कपिला व देवदत्त यांच्या शरीराची अदलाबदल होण्याचा दृश्य परिणाम प्रेक्षकाला धक्का देतो, अधिक तीव्रपणे 'मी' पणाचा विचार करायला प्रवृत्त करतो. त्याहूनही विलक्षण आहे ती देवदत्ताच्या मुलासाठी आणलेल्या दोन बाहुल्यांची योजना. पद्मिनी व देवदत्त यांच्या संसाराचे बदलते रंग, पद्मिनीच्या स्वप्नात येणारा कपिल हे सारे प्रेक्षक या बाहुल्यांकरवी पाहतो. तर प्रारंभी देवदत्ताच्या रानदांडग्या स्पर्शाविषयी तक्रार करणाऱ्या बाहुल्या नंतर त्याचा स्पर्श बायकी असल्याचा उल्लेख करतात तेव्हा देवदत्तातील बदल ठामपणे प्रस्थापित होतो. दिग्दर्शक श्री. सत्यदेव दुबे यांनी या दोन बाहुल्या निवडताना कपिल-देवदत्त यांच्यातील शरीर विरोधाचे पुन्हा दर्शन घडवले आहे. त्यातील एक बाहुली (कु. प्रिया तेंडुलकर) फारच छान अभिनय करीत होती. तिचा चेहराच इतका संवेदनाक्षम आहे, पहिलेच काम असून ती ज्या सहजपणाने रंगमंचावर वावरत होती ते पाहता तिच्या भविष्यकालीन अभिनयाविषयी अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. श्री. अमोल पालेकर व श्री. अमरेश पुरी यांनी आपल्या अभिनयातून भूमिकेच्या प्रतिकात्मक स्वरूपाचे सार्थ दर्शन घडवले. पद्मिनीची भूमिका करणाऱ्या सौ. सुनीला प्रधान यांनी या नाटकात विशेष चांगले काम केले. खरे पाहता या नटीचा अभिनय मला कधीच प्रायोगिक रंगभूमीला योग्य असा वाटला नव्हता. परंतु या नाटकात केवळ सुंदर न दिसता त्यांनी आपल्या आंगिक अभिनयातून कपिलाविषयीचे नैसर्गिक आकर्षण धीटपणे व्यक्त केले आणि ते करीत असताना हे आकर्षण एका स्त्रीचे एका परपुरुषाविषयीचे आकर्षण नसून मातीचे मातीविषयीचे आकर्षण आहे हा अर्थही त्यांनी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला. या अभिनयाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

प्रस्तुत नाटकाचे दिग्दर्शन हो अत्यंत अवघड गोष्ट श्री. सत्यदेव दुबे यांनी आपल्या पूर्वलौकीकाला साजेश्या समजुतीने केली आहे. फक्त नाटकाचा शेवट थोडा लांबल्यासारखा वाटला. या नाटकातील वेषभूषा दीपा श्रीराम (सौ. लागू)

यांनी विलक्षण कल्पकतेने (आणि तरीही कोणताच हव्यास न बाळगता) साधली आहे. विशेषत: कपिलला मातीचा रंग व हिरवा रंग अशा रंगसंगतीतील वेशभूषा व देवदत्ताला रेशमी पांढरी वेशभूषा देऊन त्यांनी मानवाचे मातीचे पाय व मनातील आकाशाला भिडणारी स्वप्ने यातील विरोध नेमका प्रस्थापित केला. पद्मिनीची वेशभूषा निश्चित करतानाही हालचालीला मोकळेपणा राहूनही तिचा रूपगर्व व्यक्त होईल अशी काळजी त्यांनी घेतली आहे. वेषाच्या रेषा व दागिन्यातील साखळ्या यांचा त्यांनी केलेला वापर कोणाही व्यावसायिक वेषसंकल्पकाला साजेसा होता.

## बिनसलेले संगीत


या नाटकाचे संगीतदिग्दर्शन श्री. विजय केळकर यांनी केले आहे. संपूर्ण नाट्यस्वरूपाला सार्थता देईल अशी संगीतयोजना करण्यात त्यांना अपयश आले आहे. किंवा त्यांनी आदिवासी पद्धतीची वाद्ये व सुसंस्कृत वातावरणातील वाद्ये यांचा आधार घेऊन नाट्यबीजातील अंतर्विरोध व्यक्त करण्याचाही यत्न केलेला नाही. श्री. चंद्रशेखर कामेरकर यांनी सूत्रधार – 'भागवत' म्हणून गाणे म्हणणे प्रेक्षकांच्या कानावर निव्वळ अन्याय होतो. पार्श्वसंगीतामधील काही गाणी अलगपणे चांगली वाटली तरी एकूण परिणाम घडविण्यास श्री. केळकर यांचे संगीत अपुरे पडले. एखाद्या कल्पक संगीतदिग्दर्शकाच्या हाती (उदा : श्री. अशोक रानडे) हे नाटक जाते तर याही अंगाने अविष्काराला मोलाची मदत केली असती.

परंतु हा एवढा दोष वगळता श्री. कर्नाड यांचे 'हयवदन' हे नवे नाटक दृश्यश्राव्यमाध्यमाचा मूलभूत विचार करायला लावणारे नाटक आहे. त्यातील वरवरचा सोपेपणा फसवा आहे. छोट्याशा कथेतून नाटककाराने इतक्या प्रभावी दृश्यप्रतिमांची योजना केली आहे, की त्यामुळे मानवी अस्तित्त्वातील मूलभूत द्वंद्व नाट्यरूपात साकार होते. नाटक पाहून घरी परतताना वरवर सहज सोपी वाटणारी पुराणकथा एका व्यमिश्र स्वरूपात आपल्यासमोर उभी रहाते. तिचे स्वरूप केवळ आशयात्मक नसते. हयवदनाचे अर्धमनुष-अर्धअश्व रूप, नंतरचे संपूर्ण अश्वरूप, कपिले-देवदत्त यांच्यातील 'अदला-बदला', बाहुल्यांच्या अंगकाठातील विरोध, त्यांनी एकमेकात लढून नाहीसे होणे, देवदत्ताने प्रेमविव्हल अवस्थेत चुकीची प्रतिज्ञा करणे व ती नंतर ती खरी होणे अशा एक ना अनेक सूत्रांच्या विवेचनातून 'हयवदन' या नाटकाचे अर्थगर्भ स्वरूप डोळ्यांसमोर येते.

श्री. गिरीश कर्नाड यांची नाट्यमाध्यमाची जाण विलक्षणच आहे. असे ऐकतो, की लवकरच 'हयवदन'चे मराठी रूपांतर (श्री. विजय तेंडुलकरकृत) रंगमंचावर येत आहे. नाटक या अविष्कारमाध्यमाविषयी स्वारस्य असणाऱ्या प्रत्येकाने हे नाटक पाहिलेच पाहिजे. त्या नाटकाच्या वरवरच्या कथाकथनाच्या सोंगापलीकडे जाऊन त्यातील नाटकाचा अनुभव घेतला पाहिजे. ◻ ◻ ◻

# पृथ्वीराज

## हिअर वॉज अ मॅन
## हिअर वॉज ॲन ॲक्टर



**अरुणा अंतरकर**

'One after one, giants are leaving the stage' मीनाकुमारीवरच्या एका सुंदर लेखाचा शेवट या चटका लावणाऱ्या वाक्यात झाला होता. आणि या वाक्याची शाई वाळत्येय, तोवरच त्याची भयानक प्रचिती आली. पृथ्वीराज कपूर यांच्यावर काळानं झडप घातली होती.

चित्रसृष्टीच्या खजिन्यातली अनमोल रत्नं लुटायची काळाला सध्या चटकच लागली आहे म्हणा ना! बिमल रॉय, गुरु दत्त, जयकिशन, मधुबाला, मीनाकुमारी एकेक नाव म्हणजे एक एक सुवर्णयुग होतं. या मालिकेत साजून दिसेलसं आणखी एक नाव पृथ्वीराजच्या रूपात काळानं उचललं, आणि तत्क्षणी 'भव्यता' हा शब्दच शब्दकोशातून पुसला गेल्यासारखं वाटलं.

तसं पहाता नव्या पिढीला पृथ्वीराजची ओळख होती ती मुख्यत: राज कपूरचे वडील म्हणून. नाही म्हणायला तिने 'रुस्तुम सोराब', 'जिंदगी', 'आवारा' यासारखे त्याचे थोडेफार चित्रपट पाहिले होते. पण एखादा 'मुगले आझम' सारखा अपवाद वगळता बाकीच्या चित्रपटातल्या पृथ्वीराजच्या भूमिका दुय्यम स्वरूपाच्या आणि बहुश: उपेक्षणीय होत्या. त्यांचं भव्य व्यक्तिमत्त्व त्यातूनही जाणवायचं. पण पृथ्वीराजचा खरा अभिनय त्यात पहायला मिळाला नाही. 'प्यार किया तो डरना क्या' 'रुस्तुम सोहराब' 'सिकंदरे आजम' 'एक नन्ही मुन्ही लडकी थी' आणि राज कपूरचा 'कल आज और कल' हे त्याचे नव्या काळातले चित्रपट.

ऐतिहासिक चित्रपट असो की सामाजिक – पृथ्वीराजच्या वाट्याला नेहमी करारी बाण्याच्या भूमिका यायच्या. ऐतिहासिक भूमिकात हमखास जमून जाणारं त्याचं प्रभावी व्यक्तिमत्त्व त्याला विविध प्रकारच्या भूमिकांपासून वंचित ठेवायचं. त्याच्या अभिनयात अशोककुमार, बलराज सहानी वा मोतीलाल यांच्या जवळची सहजता आणि सखोलता नसे. तरीही हा नट अभिनयावर मनापासून प्रेम करणाऱ्यातला आहे हे जाणवे. मुळात रंगभूमीबद्दल ओढ असणारा हा नट पडद्यावर त्याच पद्धतीने काम करे. तेच जोरदार बोलणे, तशाच आवेशयुक्त हालचाली. ऐतिहासिक वा पोशाख चित्रपटात हे सारे साजून दिसे. पण सामाजिक चित्रपटात ते कधी कधी कृत्रिम वाटे. पण एक गोष्ट याबरोबरच कबूल केली पाहिजे. पृथ्वीराज पडद्यावर कधीही 'डल' वाटला नाही. फार काय जुन्या काळातला जीर्ण म्हातारा नटही वाटला नाही. या वयातलाही त्याचा पडद्यावरचा सहज वावर आणि खानदानी रुबाबातल्या मोहक हालचाली नव्या प्रेक्षकालाही मोहित करत. तो पडद्यावर येई तेव्हा शान, रुबाब, खानदान, मर्दानी सौंदर्य इत्यादी शब्दांचा खरा अर्थ समजल्यासारखा वाटे. 'मुगले आझम'मध्ये त्याला शहेनशहा अकबराच्या रूपात पाहिल्यावर अकबराचं चित्र पाहण्यासाठी कधी इतिहासाचं पुस्तक उघडावंसं वाटलं नाही. न्यायप्रेमी अकबराची ही भूमिका पृथ्वीराजनं इतक्या तडफदारपणं वठवली, की 'मुगले आझम' हा सर्वस्वी पृथ्वीराजचा चित्रपट असल्याचं एकमुखानं मान्य केलं गेलं.

पृथ्वीराजची संवादाची फेकही छान असे. 'सलिम, तुझे बदलना ही होगा!' यासारखी त्याची सिंहगर्जना सलीमबरोबर प्रेक्षकालाही दचकावून सोडी. संवादांना साजेलशी अभिव्यक्तीदेखील साठीच्या घरात असतानाही त्याच्या चेहऱ्यावर

छान उमटे. पण हल्ली त्याचा आवाज मात्र साफ बिघडला होता. 'पृथ्वीराजचे संवाद रेकॉर्ड करताना साऊंड मशिन मोडलं' अशा प्रकारची थट्टाही ऐकू येई. पण मुळात त्याचा आवाज अतिशय दमदार होता, तो रंगभूमीवरच्या सतत प्रयोगांनीच बिघडला म्हणे. मध्य प्रदेशातल्या एका प्रयोगात आवाज बदसूर लागला, तेव्हा नटराजावर परमेश्वराइतकी श्रद्धा ठेवणाऱ्या या नटश्रेष्ठाने तत्क्षणी शस्त्रं खाली ठेवली.

फार थोड्या नटांना व्यक्तिमत्त्व असतं. पडद्यावर राजा-महाराजांच्या वा न्यायाधिशांच्या भूमिका वठवणारी ही माणसं खाजगी जीवनात बहुश: स्वत:चे कुरुप मुखवटेच प्रकट करताना दिसतात. पृथ्वीराजच्या बाबतीत असं नव्हतं. त्याचं व्यक्तिमत्त्व देखण्या रूपानं शोभायचं, तसंच बुद्धिमत्ता आणि संस्कारसंपन्नता यांच्यामुळंही. आत्ता तो साठीच्या घरात असतानाची गोष्ट. ज्या वेळेला जुन्या दिवसांच्या आठवणी काढीत 'हरी हरी' करायचे, उदासवाणे गतस्मृतींचे सूर आळवायचे, त्या काळात पृथ्वीराज तबला शिकत होता, भरतनाट्यमचे धडे गिरवीत होता, आणि त्याच वेळी एका पंडिताची शिकवणी ठेवून संस्कृतची घोकंपट्टी करीत होता.

## एकेकाळचे दैवत

असा नट एका जमान्याचं आराध्यदैवत बनला असल्यास नवल नाही. 'अलिकडच्या त्याच्या सिनेमातल्या भूमिका फारशा प्रभावी नव्हत्या' असं मी अत्यंत सौम्यपणं एका जुन्या परिचिताजवळ बोलून दाखवताच त्याची स्फोटक प्रतिक्रिया पाहण्यासारखी होती. 'सो व्हॉट ?' पन्नाशी उलटलेला तो गृहस्थ उसळून म्हणाला, 'अलिकडे चित्रपटच बिघडले आहेत. हल्लीच्या सिनेमावाल्यांनी काय पृथ्वीराजला डायरेक्ट करावं ?' तात्पर्य काय, कोणे एके काळी पृथ्वीराज या नावाला दिलीपकुमार आणि राजेश खन्ना या नावांचं मोल होतं.

याच गृहस्थांनी सांगितलेली पृथ्वीराजची आणखी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. 'पृथ्वीराजचे संवाद रंगभूमीवरही कळत नसत. ते त्यांचं वैशिष्ट्यच होतं म्हणा ना ! उच्चार नैसर्गिक आणि बोली भाषेप्रमाणे असावेत असा पृथ्वीराजचा कटाक्ष असे. बोली भाषेतले सगळेच शब्द आपण थोडेच शुद्ध उच्चारतो ? गंमत म्हणजे पृथ्वीराजची संवादांची ही स्टाइल त्या काळच्या प्रेक्षकांना बेहद्द आवडे.'

उच्च प्रेक्षकवर्ग तर आपल्या जमान्यात पृथ्वीराजला लाभलाच होता; पण खालचा वर्गही त्याच्यावर जीव ओवाळून टाकी. पुण्याच्या 'अलका' टॉकीजसमोर आजच्या 'राजदरबार' हॉटेलच्याच जागेत एक जुनं हॉटेल होतं. इथला एक वेटर पृथ्वीराजचं 'नवं पिक्चर' लागलं, की आठवडाभर थिएटरची भाविकपणं वारी करायचा. यावरून मालक–नोकराचं जंगी वाजायचं. अखेर सुज्ञपणं माघार घेऊन

'मालकच पुढं पुढं पृथ्वीराजचा नवा चित्रपट लागला, की या वेटरची आठवड्याभराची रजा मंजूर करायचा. नंतर कित्येक दिवस तमाम नोकरवर्ग आणि गिऱ्हाईक यांना पृथ्वीराजच्या शैलीदार, दणकेबाज सवादांची जी प्रस्तुत वेटरकृत मेजवानी मिळायची, ती तिथल्या मटणरश्शाहून खमंग असायची म्हणे !

या पृथ्वीराज–प्रेमाची अखेरची पायरी म्हणजे, पृथ्वीराजचे चित्रपट कमी होऊ लागताच या वेटरनं चित्रपट पहायचंच सोडून दिलं ! राज आणि शम्मी हे दोघेजण त्यावेळी पडद्यावर चांगलेच गाजत होते. पण या वेटरच्या मते 'बाप तो बापच ! त्याची खानदान त्याच्या पोरांमधे बिलकुल नाही !'

राजबिंड्या रूपाची देणगी पृथ्वीराजला देवदत्त असली तरी रंगभूमीवर आणि पडद्यावर मिळालेलं अफाट यश मात्र त्याच्या जिद्दी स्वभावाचं, अपरंपार मेहेनतीचं फळ होतं. बी. ए. ची पदवी मिळवलेल्या पृथ्वीराजला तरुणपणी या दोन्ही क्षेत्रांचं आकर्षण उत्पन्न झालं. रोनाल्ड कोलमन, जॉन गिल्बर्ट, डग्लस फेअरबँक्स, व्हॅलेंटिनो, ग्रेटा गार्बो यांचे चित्रपट पाहून, आरशासमोर त्यांची नक्कल करताना एके दिवशी त्याला साक्षात्कार झाला : 'अरे ! आपल्याजवळही नटाचा चेहेरा आहे बरं का !'

## चित्रसृष्टीत प्रवेश

त्या वर्षी पृथ्वीराज कायद्याच्या परीक्षेला बसला होता. पण एका विषयानं दगा दिला, तेव्हा या भावी वकीलानं काळ्या झग्याचा मोह सोडून, तडक मुंबईला धाव घेतली. खिशात ७५ रुपये, दोन प्रमाणपत्रं, दोन-चार जुजबी कपडे, हॉकी स्टिक व या जोडीला दांडगा आत्मविश्वास आणि ईश्वरावरचा हवाला ही त्याची त्या वेळची पुंजी होती.

त्यानंतर मग दररोज स्टुडिओच्या पदयात्रा सुरू झाल्या. दोन-चार ठिकाणी स्टुडिओंच्या पठाणांनीच वाटाण्याच्या अक्षता दिल्यावर पृथ्वीराजनं 'शारदा' स्टुडिओत युक्तीच्या बळावर प्रवेश करून घेतला. देखण्या रूपाचा पासपोर्ट जवळ असलेल्या या तरुणाचा चित्रसृष्टीत प्रवेश व्हावा तो 'चॅलेंज' या अन्वर्थक शीर्षकाच्या चित्रानं, हा योगायोग कोणत्याही हिंदी चित्रपटात शोभून दिसण्यासारखा आहे.

पण गंमत म्हणजे 'अरे तुझ्या चेहेऱ्यावरच यश लिहिलेलं आहे !' म्हणून पृथ्वीराजला हरबऱ्याच्या झाडावर चढवणाऱ्या अर्देशर इराणींनी त्याला दिलं ते एक्स्ट्राचं काम आणि तेही बिनपगारी ! पृथ्वीराज मात्र त्या संध्याकाळी चौपाटीवर आपण 'फिल्म अॅक्टर' झाल्याच्या आनंदात तरंगत फिरत होता !

आपलं काम संपल्यावर, भावी काळात चित्रसृष्टी गाजवणारा हा नट स्वत: अन्न शिजवून खायचा, विवेकानंद आणि 'यंग इंडिया' वाचीत वा दुसऱ्या दिवशीचे संवाद पाठ करीत बसायचा, हा किस्सा आजच्या जमान्यात अद्भुत वाटेल, पण तो खोटा असेल असं पृथ्वीराजच्या बाबतीत तरी वाटत नाही.

आपल्या अभिनय कारकीर्दीत 'न्यू थिएटर्स'पासून 'रणजित'पर्यंतच्या साऱ्या विख्यात संस्थाकडे पृथ्वीराजने कामे केली. 'अरेबियन नाइट्स्'मधल्या तलवार बहादुरापासून शेक्सपीअरच्या हॅम्लेट–सीझरपर्यंतची पात्रं त्यानं सजवली. शिकंदर, वाल्मिकी, कौटिल्य, मीरेचा पति, राणा कुंभ—अशा विविध व्यक्तीरेखा त्याच्या वाट्याला आल्या. 'मी खरा निधर्मी! निरनिराळ्या संस्कृती नि इतिहास मीच खरा पचवलाय्!' असं पृथ्वीराज अभिमानानं म्हणे. एरवी सिकंदर आणि पौरस ('सिकंदरे आझम' या नव्या चित्रपटात)–अशी तोलामोलाची पात्रं रंगवायचं भाग्य अन्य किती नटांना लाभलं असेल? अशा जबरदस्त, Larger than life स्वरूपाच्या भूमिकांत पृथ्वीराजनं जी कीर्ति मिळवली ती पुढं तीन दशकं त्याच्या कामी आली. पृथ्वीराज कोणत्याही रूपात समोर येवो, तो ऐतिहासिक थाटांतच वावरायचा आणि त्याच्या प्रेक्षकाला तो याच स्वरूपात हवा असायचा. त्याची सामाजिक कामं 'मिळमिळीत' ठरायची ती म्हणूनच. 'जिंदगी'सारख्या एखाद्या चित्रपटात मात्र वैजयंतीमाला, राजेंद्रकुमार, राजकुमार यांना मागे सारून या 'ओल्ड लायन'नं चित्रपट खाल्ल्याची कबुली 'फिल्मफेअर'चा विचक्षण समीक्षक देताना दिसतो.

## एक स्वप्न

हिंदी रंगभूमीला संजीवनी देणाऱ्या या नटाला एकच खंत वाटायची. लोकांच्या डोळ्यापुढं आपलं पडद्यावरचं कर्तृत्व राहिलं पण रंगभूमीचं राहिलं नाही! केवळ सात नाटकांचे अविरत २६६२ प्रयोग करणाऱ्या, रंगभूमीच्या पडत्या काळात एक शिस्तबद्ध नाटककंपनी अत्यंत चोखपणे चालवून, तितक्याच ताठ मानेनं बंद करणाऱ्या या कलावंताची ही व्यथा शेवटपर्यंत दुखण्याच्या रूपात राहिली. गंधर्वनगरीत मिळालेला पैसान् पैसा पृथ्वीराजनं स्टेजवर ओतला. त्यासाठी काय वाटेल त्या दर्जाच्या चित्रपटातलं काम तो स्वीकारीत असे. आणि याची टोचणी म्हणून की काय तो त्या चित्रपटाच्या उद्घाटनाला कधी जात नसे, की राहिलेले हप्ते वसूल करीत नसे. आयुष्यभर नाटक जपणाऱ्या या नटानं साठाव्या वर्षात पदार्पण करताना एकच स्वप्न पाहिलं होतं, '१९७९ साली मी माझ्या अभिनय कारकिर्दीची सुवर्णजयंती साजरी करेन. त्या वेळी मी नव्या उत्साहाने कामाला लागेन. त्या वेळी पुन्हा एकदा मी नाटककंपनी काढलेली असावी, भारतातल्या प्रत्येक गावात एक थिएटर निघालेलं असावं आणि तिथं मला नाटकं करायला मिळावीत, एवढीच माझी इच्छा शिल्लक राहिली आहे!'

वयाच्या साठाव्या वर्षी ज्यांना अशी स्वप्नं पहाता येतात ते कलाकार कधीच जुने होत नाहीत, कधीच टाकाऊ होत नाहीत. काळावर मात करून ते लोकांच्या स्मरणात रहातात. पृथ्वीराजही चित्रसृष्टीच्या इतिहासात आणि जनमानसात असंच स्थान टिकवून राहील यात शंका नाही. लक्ष्मीला अंकित करणारी तीन मुलं

असताना अखेरपर्यंत स्वतःच्या कमाईवर जगणारा, मुलांचे शाही बंगले सोडून समुद्र-किनाऱ्यावरच्या आपल्या साध्यासुध्या 'कॉटेज'मध्ये राहणारा हा नट मुलांच्याबद्दल काही विचारलं तर मिस्किलपणं म्हणायचा, 'त्यांना सांगणार नसाल तर सांगतो. ते चांगले नट आहेत; पण त्यांना अजून पूर्णत्वाला पोचायचंय्. एक मात्र खरं–दे आर वाइज फुल्स !' आपल्या मुलांसाठी त्यानं कधी कुठं वशिला लावला नाही. राजकपूरला उमेदवारीच्या काळात त्यानं क्लॅपर बॉयपासून निरोप्यापर्यंत सारी कामं करायला लावली. आज पृथ्वीराजला राज कपूरचा बाप म्हणून ओळखलं जातं ही वस्तुस्थिती आहे. पण मुलांच्या नावानं ओळखलं जाण्याचं समाधान कितीशा कर्तृत्ववान् पित्यांच्या वाटचाला येतं ह्याचा आढावा घेतला तर, असं ओळखलं जाणं हे पृथ्वीराजचं भाग्यच म्हणायला हवं.

'कल, आज और कल'मध्ये एक मार्मिक प्रसंग आहे. पृथ्वीराजला त्याची पडद्यावरची (आणि आता आयुष्यातली) नातसून बबिता त्याला घरचा माळी समजते. एका अर्थी कपूर घराण्याची आज बहरलेली फुलबाग फुलवण्याचं काम त्यानंच केलं नाही का ?

कलाकार आणि व्यक्ती ही पृथ्वीराजची दोन्ही व्यक्तिमत्वं एकमेकात दूध-साखरे-सारखी मिळून गेली होती हे सांगताना त्याचे निकटचे सहकारी के. ए. अब्बास म्हणतात : 'He is playful calf in a lion's skin, a child sporling a beard.. an actor with many faces but one heart full of love...a god who can laugh and even wink at passing 'apasra'!'

चांगल्या कलावंतांची सरकारकडून क्वचितच कदर होते. सुदैवानं पृथ्वीराजच्या वाट्याला राज्यसभेचं सभासदत्व, सांस्कृतिक शिष्टमंळांचे दौरे, पद्मभूषण, साहित्य अकादमीचं पारितोषिक, दादासाहेब फाळके अॅवार्ड–सारं काही आलं. शिवाय त्याच्याच तोलामोलाच्या इतर कलावंतांच्या मृत्यूची एका शब्दानंही दखल न घेणाऱ्या पंतप्रधान, राष्ट्रपति, नभोवाणी-मंत्री इत्यादि खाशा स्वाऱ्यांकडून औपचारिक का होईना, पण दुखवट्याचे चार शब्द आले. एखाद्या कलावंतांच्या वाट्याला असं सुखासमाधानाचं मरण येणं ही गोष्ट दुर्मिळच. 'रंगभूमी आणि रजतपट–दोन्हीवर माझं प्रेम आहे. पण या दोहोंहून मी अधिक प्रेम करतो ते आयुष्यावर !' असे कृतार्थ उद्‌गार काढणाऱ्या नटानं आयुष्य खऱ्या अर्थानं जगून जीवनाच्या रंगभूमीवरून 'एक्झिट्' घेतलं. एका सफळ जीवनाचा याहून अखेर चांगला शेवट कोणता म्हणायचा ? पृथ्वीराजच्या लाडक्या शेक्स-पीअरच्याच भाषेत बोलायचं तर, 'हिअर वॉज अ मॅन, हिअर वॉज अॅन अॅक्टर !' अशा थाटाची सलामी त्याला इहलोकी मिळाली आणि परलोकीही मिळेल यात शंका नाही !

□ □ □

पृष्ठ ४ वरून

तास लवकर छापायला जाणार असल्याने वृत्तपत्र कचेरीतील रात्रपाळीच्या संपादक वर्गालाही गैरसोईच्यावेळी–जेव्हा वहाने वगैरे मिळणे कठीण असते अशावेळी–जावे लागणार नाही. पण ही सारी सोय पाहयला बड्या वृत्तपत्रांचे व्यवस्थापक तयार नाहीत. त्यांची भाषा आहे मग्रुरीची.

हा संप फार काळ चालू राहावा अशी त्यांच्यापैकी काहींची इच्छा होती. त्यामुळे तोटा होण्याऐवजी फायदा होईल अशी त्यांची धारणा होती. यात टाईम्स व एक्सप्रेस गटांच्या वृत्तपत्रांच्या खपाच्या स्पर्धेचाही काही स्वार्थ लपलेला होता अशी एक खात्रीलायक बातमी होती.

वृत्तपत्र विक्रेत्या मुलांना या संपाचा धडा शिकवण्यासाठी स्वतःचीच अशी वितरण व्यवस्था करण्याचा एका बड्या वृत्तपत्राच्या व्यवस्थापकांचा विचार चालू होता अशी कुणकुण माझ्या कानावर आली होती.

संपामुळे काही वर्तमानपत्रांचा तोटा जरूर झाला पण काही फायदाही झाला. वृत्तपत्रीय कागदाची फारच प्रचंड प्रमाणावर बचत झाली आहे. उदा. 'टाईम्स ऑफ इंडिया' या वर्तमानपत्राचा मुंबईतील दर दिवशी १ लाख १८ हजार प्रति एवढा खप होतो, पण गेल्या रविवारी त्यांनी फक्त १५ हजार प्रति छापल्या तर सोमवारी ३ हजार आणि मंगळवारी फक्त २ हजार प्रति छापल्या.

दुसरी एक गम्मत म्हणजे इंग्रजी व गुजराती वर्तमानपत्रे नाहीत म्हणून अनेक अ-मराठी लोकांनी 'नवाकाळ', 'मराठा' घ्यायला सुरुवात केली होती. कारण त्या पेपर्सनी संघाच्या मागण्या सर्वात आधी मान्य केल्या होत्या. अनेक गुजराती व पारशी लोकांच्या हातात ही मराठी वर्तमानपत्रे पाहून जरा गम्मत वाटली. तर एस्. एस्. सी.चा निकाल सहा तारखेला असल्याने व संप त्यावेळी चालूच राहील असे वाटल्याने एस्. एस्. सी.ला बसलेल्या मुलांमध्ये नाराजी पसरली होती. त्यात भर पडण्याचे कारण असे, की ज्या वर्तमानपत्रांचे वितरण चालू झाले होते ती वर्तमानपत्रे एस्. एस्. सी.चा निकाल वृत्तपत्रीय कागदाच्या टंचाईमुळे छापू शकत नव्हती. मग आली का पंचाईत !

काही वर्तमानपत्रांनी त्यांच्या ऑफिसच्या आवारात वर्तमानपत्रे विक्रीसाठी ठेवली त्यामुळे त्या त्या विभागातील लोकांची वृत्तपत्रे घेण्यासाठी झुंबड उडाल्याचे काही ठिकाणी दृष्य दिसले.

चर्चगेट येथे रस्त्यावर वृत्तपत्रे विकणाऱ्या उत्तर भारतीय विक्रेत्यांच्यात व संपावरील मुलांमध्ये थोडी बाचाबाची व मारामारी झाली. त्यांचे अंक रस्त्यावर भिरकवण्यात आले.

विस्कळीत व 'फ्लोट' असणाऱ्या या विक्रेत्यांचा संप आज तरी १०० टक्के यशस्वी झाला आहे. संघटनेची ही पहिलीच लढाई. जोर असाच राहिला तर अनेक गाऱ्हाण्यांना वाचा फुटेल. काही मागण्याही पुढे येतील. मात्र अडीअडचणीमुळे या व्यवसायात असलेली मुले चांगली नोकरी मिळताच हा व्यवसाय सोडून जातात. म्हणूनच त्यांच्यात विस्कळीतपणा आहे व हा 'फ्लोट' असणारा वर्ग समजला जातो. तेव्हा त्यांचे संघटन कसे टिकेल हे सांगता येत नाही. पण आजवर साधी चौकशीही न केली गेलेला हा विक्रेता आता संघटित झाला आहे. ६८ साली मुंबई-तील साऱ्या वर्तमानपत्रांचा ४५ दिवस संप चालू होता. त्याचा या विक्रेत्यांना जबरदस्त फटका बसला पण त्यांची कोणी विचारपूस केली नाही. आज संप झाल्या-बरोबर वाचकांनाही जाग आली. त्यांना पगारी नोकर म्हणून ठेवले जाणे, तसेच मधल्या दलालांना हाकलवून सहकारी तत्त्वावर वृत्तपत्र विक्रेत्यांचे स्टॉल चालविले जाणे आवश्यक आहे.

संघटना होताच, कॉ. एस्. वाय्. कोल्हटकर; श्री. बाळ ठाकरे श्री. जॉर्ज फर्नांडिस आदि मंडळी पाठींब्यासाठी पुढे आली. मात्र त्या आधी विक्रेत्यांची काळजी कोणालाच नव्हती.

वृत्तपत्र विक्रेत्या मुलांना जेव्हा ठिकठिकाणी भेटलो तेव्हा त्यांच्या याबाबतच्या प्रतिक्रिया तिखट होत्या. काहींना ही मंडळी 'आयत्या बिळावर नागोबा' प्रमाणे वाटली. एजन्टस बद्दलच्या त्यांच्या प्रतिक्रियाही कडवट वाटल्या. नेहमी छळणारा, भरपूर श्रमाच्या मोबदल्यात कमी पैसे देणारा, अंगावर खेकसणारा, तो एजंट, असे त्यांचे थोडक्यात वर्णन केले गेले.

अनेक मुलांमध्ये तर एजन्टसबद्दल अतोनात राग दिसला. त्यांना खाऊ की गिळू असं त्यांना झाले होते. माझे 'आर्थिक नुकसान होत आहे त्याची पर्वा नाही पण त्या × × × नुकसान होत आहे त्यामुळे मी खुष आहे, असे एका विक्रेत्याने मला सांगितले. अडीअडचणीमुळे ही मुले हे सारे सहन करून वर्तमानपत्रे वाटत आहेत.

या संपाचा आणखी एक असा फायदा झाला, की आता तरी वृत्तपत्र-व्यवस्था-पक, एजन्टस् व वाचक त्या मुलांची दखल घेतील का.

□ □ □

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगांवकर

क्यूबा सोडताना फिडेल कास्ट्रोने लिहिले होते–
'आम्ही परत येऊ !
स्वातंत्र्य आणि समता यांची ज्योत
जेव्हा आम्ही आणू शकू तेव्हाच
आम्ही परत येऊ !
शांततामय लढ्याचे सर्व दरवाजे आता
बंद झाले आहेत.
आता उपाय एकच–बंदूक.'

आणि एका वर्षाच्या आतच
क्यूबन जनतेला दिलेले आश्वासन
फिडेलने खरे करून दाखवले.

---

# फिडेल
# चे
# आणि क्रांती

---

लेखांक तीन

## पुढील अंकी